(इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

<u>सुधारित</u>

<u>प्रकाशनयोग्य</u>

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात

फौजदारी अपिलीय अधिकारिता

<u>विशेष अनुमती याचिका (फौ.) क्र. ५१९१/ २०२१</u>

<u>मध्ये</u>

<u>किरकोळ अर्ज क्र. १८४९/२०२१</u>

सतेंदर कुमार अंतील .... अपीलकर्ता

विरुद्ध

केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग आणि इतर .... उत्तरवादी

सह

<u>विशेष अनुमती याचिका (फौ.) क्र. ५१९१/२०२१</u>

<u>मध्ये</u>

<u>किरकोळ अर्ज डायरी क्र. २९१६४/ २०२१</u>

<u>न्यायनिर्णय</u>

<u>न्या. एम. एम. सुंद्रेश</u>

> " स्वातंत्र्य ही माणसाच्या सर्वात आवश्यक गरजांपैकी एक आहे. हे प्रगल्भ संस्कृतीचे नाजूक फलित आहे असे म्हटले जाते. हे सुसंस्कृत अस्तित्वाचे परमसार आहे आणि आधुनिक माणसाची अत्यावश्यक गरज आहे."
>
> - "एसेज ऑन फ्रिडम अँड पॉवर" मध्ये जॉन इ. इ. डी.

१. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या (यापुढे संक्षिप्ततेसाठी 'संहिता' असे संबोधण्यात येईल) कलम १७० च्या निर्वचनाचा चुकीचा अर्थ लावून, अंतिम अहवाल दाखल केल्यानंतर जामीन मागणाऱ्या खटल्यांमध्ये सातत्याने होणारी वाढ लक्षात घेऊन भविष्यासाठी मार्गदर्शक तत्वे म्हणून वापरल्या जाणाऱ्या या गुन्ह्यांच्या प्रकारांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न या न्यायालयातर्फे करण्यात आला. ज्येष्ठ विद्वान वकील सिद्धार्थ लुथरा आणि विद्वान सहायक महाधिवक्ता श्री. एस. व्ही. राजू यांचे सहाय्य घेण्यात आले. हस्तक्षेपासाठी अर्ज मंजूर केल्यानंतर, दिनांक ०७/१०/२०२१ रोजी योग्य आदेश पारित करण्यात आला. सदर आदेश खालीलप्रमाणे उद्धृत केला आहे.

"आम्हाला विद्वान सहायक महाधिवक्ता श्री. एस. व्ही. राजू आणि विद्वान

ज्येष्ठ वकील सिद्धार्थ लुथरा यांचे साहाय्य पुरविण्यात आले आहे आणि विद्वान ए.एस.जी. यांनी केलेल्या सूचनांबाबत एकमत आहे. सूचनांच्या अनुषंगाने गुन्ह्यांचे वर्गीकरण करण्यात आले आणि आणि संबंधित न्यायालयांच्या स्वेच्छानिर्णयास अटकाव न करता व वैधानिक तरतुदी लक्षात घेऊन जामीन मंजूर करण्यासाठी मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

आमचा मार्गदर्शक तत्वे स्विकारण्यास आणि खालील न्यायालयांच्या फायद्यासाठी त्यांना न्यायालयाच्या आदेशाचा भाग बनविण्याकडे कल आहे. सदर मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे आहेत:

<u>गुन्ह्यांचे वर्गीकरण / प्रकार :</u>

अ) सात वर्षे किंवा त्यापेक्षा कमी कारावासाची शिक्षा होऊ शकणारे गुन्हे जे ब आणि ड वर्गात मोडत नाहीत.

ब) मृत्यदंड, आजीवन कारावास किंवा ७ वर्षापेक्षा जास्त कारावासाची शिक्षा होऊ शकणारे गुन्हे.

क) एनडीपीएस (कलम ३७), पीएमएलए (कलम ४५), युएपीए (कलम ४३ ड(५)), कंपनी कायदा २१२(६) इत्यादी, जामिनासाठी कठोर तरतुदी असलेल्या विशेष कायद्यांतर्गत दंडनीय गुन्हे.

ड) आर्थिक गुन्हे जे विशेष कायद्यात समाविष्ट नाहीत.

आवश्यक अटी -

१) तपासादरम्यान अटक झाली नाही.

२) संपूर्ण तपासकार्यात सहकार्य करण्यासह जेव्हा जेव्हा चौकशी अधिकाऱ्याने बोलावले तेव्हा त्यांचेसमोर हजर झाला.

(अशा आरोपीला आरोपपत्रासोबत हजर करण्याची गरज नाही (सिद्धार्थ विरुद्ध यूपी राज्य. २०२१ एससीसी ऑनलाईन एससी ६१५)

वर्ग अ

दोषारोपपत्र/ तक्रार दाखल केल्यानंतर घ्यावयाची दखल :

१) सर्वसामान्यपणे प्राथमिक समन्स/ वकिलामार्फत हजर राहण्याची परवानगी देण्यासह.

२) समन्स बजावूनही असा आरोपी हजर झाला नाही, तर प्रत्यक्ष उपस्थितीसाठी जमानतयोग्य अधिपत्र निर्गमित केले जाऊ शकते.

३) जमानतयोग्य अधिपत्र निर्गमित करूनही हजर न राहिल्यास, एन.बी.डब्ल्यू.

४) जर एन.बी.डब्ल्यू. बजावण्यापूर्वी, आरोपीच्या वतीने पुढील सुनावणीच्या दिवशी प्रत्यक्ष हजर राहण्याच्या हमीवर असा अर्ज दाखल केल्यास आरोपीच्या प्रत्यक्ष उपस्थितीचा आग्रह न धरता एन.बी.डब्ल्यू. हे

रद्द किंवा जमानतयोग्य अधिपत्र/ समन्समध्ये रूपांतरित केले जाऊ शकते.

५) जामीन अर्जावर निर्णय होईपर्यंत, असा आरोपी प्रत्यक्ष हजर झाल्यावर अशा आरोपीच्या जामीन अर्जावर आरोपीला प्रत्यक्ष कोठडीत न ठेवता किंवा अंतरिम जामीन मंजूर करून निर्णय घेता येईल.

<u>वर्ग ब/ ड</u>

जामीन अर्जाच्या प्रक्रियेच्या अनुषंगाने आरोपी न्यायालयात हजर झाल्यावर गुणवत्तेच्या आधारे निर्णय घेतला जाईल.

<u>वर्ग क</u>

एनडीपीएस कलम ३७, पीएमएलए कलम ४५, युएपीए कलम ४३ ड(५), कंपनी कायदा २१२(६), पोस्को इत्यादी, कायद्यांतर्गत जामिनाच्या तरतुदींची पूर्तता करण्याच्या अतिरिक्त अटीसह वर्ग ब आणि ड प्रमाणेच.

'अ' वर्गात पोलीस प्रकरणे आणि तक्रार प्रकरणे या दोन्ही बाबींचा समावेश आहे, हे सांगण्याची आवश्यकता नाही.

न्यायचौकशी न्यायालये आणि उच्च न्यायालये जामीन अर्जांवर विचार करताना वरील मार्गदर्शक तत्वे लक्षात घेतील.

विद्वान सहाय्यक महाधिवक्ता यांनी असा सावधानतेचा इशारा दिला आहे

की, ज्या ठिकाणी आरोपी तपासात सहभागी झाला नाही किंवा तपासी अधिकाऱ्यांसमोर हजर झाला नाही किंवा न्यायचौकशी पूर्ण होण्यासाठी आरोपीची न्यायालयीन कोठडी आवश्यक आहे असे न्यायालयाला वाटते तेव्हा समन्सला उत्तर दिले नाही, जेथे संभाव्य वसुलीसह पुढील तपासाची आवश्यकता आहे. वरील दृष्टिकोन हा त्यांना फायदा देऊ शकत नाही, ज्यासोबत आम्ही सहमत आहोत.

लुथरा यांनी सादर केलेला एक पैलूही आम्ही लक्षात घेऊ शकतो की, जामिनावर विचार करण्याची नोटीस बजावताना, तपासादरम्यान आरोपींच्या वर्तनाचा विचार करून न्यायचौकशी न्यायालय हे अंतरिम जामीन देण्यास प्रतिबंधित नाही, ज्यामुळे अटकेची आवश्यकता नाही. या पैलू बाबतीतही आम्ही आमची परवानगी देऊ आणि साहजिकच जामीन अर्जावर अंतिमतः विचार करण्यासाठी वैधानिक तरतुदी ह्या मार्गदर्शक ठरतील.

आम्ही स्वीकारलेल्या विद्वान सहायक महाधिवक्ता यांच्या सूचनांमध्ये, विशेष अधिनियमांमध्ये समाविष्ट नसलेल्या गुन्ह्यांचा स्वतंत्र संच “आर्थिक गुन्हे” म्हणून वर्गीकृत केला आहे. या संदर्भात श्री. लुथरा यांच्या युक्तिवादावर असे म्हणणे पुरेसे आहे की, संजय चंद्रा वि. सि.बी.आय., (२०१२) १ एससीसी ४० या प्रकरणामध्ये या न्यायालयाने परिच्छेद ३९

मध्ये असे निरीक्षण नोंदवले आहे की, जामीन मंजूर करायचा किंवा नाही हे ठरवताना

अ) आरोपाचे गांभीर्य आणि

ब) शिक्षेची तीव्रता, या दोन्ही बाबी विचारात घ्याव्या लागतील.

त्यामुळे आर्थिक गुन्हे हे उपरोक्त मार्गदर्शक तत्वांमधून पूर्णपणे काढून टाकले जातात असे नाही, तर ते गुन्ह्यांचे वेगळे स्वरूप निर्माण करतात आणि त्यामुळे आरोपाचे गांभीर्य लक्षात घ्यावे लागते, पण त्याचबरोबर कायद्याने ठोठावलेल्या शिक्षेची तीव्रता हा देखील एक घटक ठरेल.

आम्ही विद्वान वकिलांनी केलेले साहाय्य आणि विद्वान सहायक महाधिवक्ता यांनी स्विकारलेल्या सकारात्मक दृष्टिकोनाचे कौतुक करतो.

विशेष अनुमती याचिका निकाली काढण्यात आली आहे आणि सदर प्रकरण पुढे सूचीबद्ध करण्याची आवश्यकता नाही.

या आदेशाची प्रत विविध उच्च न्यायालयांच्या प्रबंधकांना पाठविण्यात यावी जेणेकरून ते पुढे न्यायचौकशी न्यायालयांना पाठवतील आणि जेणेकरून अनावश्यक जामीन प्रकरणे या न्यायालयपर्यंत येणार नाहीत.

केवळ याच उद्देशाकरिता आम्ही ही मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत परंतु, ते न्यायालयाच्या अधिकारांना अटकाव करीत नाहीत.”

२. किरकोळ अर्ज क्रमांक १८४९/२०२१ आणि किरकोळ अर्ज डायरी क्रमांक २९१६४/२०२१ असे आणखी दोन अर्ज हे वर्ग 'क' च्या संदर्भात आणखी स्पष्टीकरण मागणेसाठी दाखल करण्यात आले होते, ज्यात नकळतपणे आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायदा, २००२ च्या कलम ४५ हा काढून टाकलेला असला तरी, तो त्यामध्ये अस्तित्वात होता आणि त्यानुसार दिनांक १६.१२.२०२१ रोजी आदेश पारित करण्यात आला :

> "पक्षकारांतर्फे उपस्थित विद्वान ज्येष्ठ वकिलांनी असे कथन केले की, ते दिनांक ०७.१०.२०२१ रोजीच्या आमच्या आदेशाच्या आशयाचा आवश्यक असलेला काही प्रमाणात मेळ बसवण्यासाठी प्रयत्न करतील.
>
> आम्ही हे स्पष्ट करतो की, आमचा उद्देश हा जामिनाची प्रक्रिया सुलभ करण्याचा होता आणि त्यास निर्बंधित करण्याचा नाही. हा आदेश कोणत्याही प्रकारे अतिरिक्त निर्बंध लादत नाहीत, परंतु, तो जामिनाची व्याप्ती वाढविण्याच्या न्यायिक विचारसरणीला मदत करतो.
>
> या टप्प्यावर, आम्हाला असे म्हणणे पुरेसे आहे की, अशा वेळी 'क' वर्गाचा उल्लेख करताना, अनवधानाने आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याच्या (पीएमएलए) कलम ४५ चा उल्लेख करण्यात आला आहे, जो या न्यायालयाने रद्दबातल ठरविला आहे. विद्वान सहायक महाधिवक्ता हे कथन करतात की, दुरुस्ती केली गेली आणि ते आव्हान या न्यायालयाच्या

दुसऱ्या खंडपीठासमोर प्रलंबित आहे. हा त्या खंडपीठाद्वारे विचारात घेतला जाणारा विषय असेल.

केवळ काही गुन्ह्यांचे आर्थिक गुन्हे म्हणून वर्गीकरण करून जे अदखलपात्र असू शकतात, याचा अर्थ आमच्या आदेशास वेगळा अर्थ द्यावा लागेल, असा होत नाही, अशी सावधानता बाळगण्याचा इशाराही आम्ही देत आहोत.

आम्ही हे देखील स्पष्ट करू इच्छितो की, तपासादरम्यान, केवळ आरोपपत्र दाखल केल्यामुळे आरोपीला अटक करण्याचे कोणतेही कारण नसेल तर, वस्तुतः याचिकाकर्त्याला अटक करण्याचे कारण नाही, हा पैलू आम्ही दिनांक १६.०८.२०२१ रोजीच्या फौजदारी अपील क्रमांक ८३८/२०२१ सिद्धार्थ वि. उत्तर प्रदेश राज्य आणि इतर, न्यायनिर्णयामध्ये स्पष्ट केला आहे."

३. या न्यायालयाला जामीन देण्यासंबंधीच्या इतर बाबी हाताळण्यासाठी प्रभावित करताना निर्देश/ स्पष्टीकरणे मागणी करणारे आणखी काही अर्ज या न्यायालयापुढे दाखल करण्यात आले आहेत. आम्ही, श्री. अमित देसाई, विद्वान ज्येष्ठ वकील सिद्धार्थ लुथरा आणि विद्वान अतिरिक्त महाधिवक्ता श्री. एस. व्ही. राजू यांचे म्हणणे ऐकले.

४. वेळोवेळी विविध निर्देश निर्गमित करूनही, विविध गुन्ह्यांशी संबंधित विशेष अनुमती याचिका, विशेषतः जामीन अर्ज फेटाळण्याबाबत या न्यायालयात दाखल होत

असल्याचे निदर्शनास आल्याने, आम्हाला ह्या पद्धतीचा वापर करणे योग्य वाटते. आम्ही हे स्पष्ट करू इच्छितो की, निर्देशांसह आमच्या सर्व चर्चा ह्या मार्गदर्शक तत्वे म्हणून कार्य करण्यासाठी आहेत, कारण, जामीन अर्जाशी संबंधित प्रत्येक खटल्याचा निर्णय हा साहजिकच त्याच्या स्वतःच्या गुणवत्तेनुसार घ्यायचा आहे.

सद्यस्थिती

५. भारतातील कारागृहे ही न्यायचौकशी अधीन कैद्यांनी भरलेली आहेत. आमच्यासमोर ठेवलेल्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, कारागृहात असणाऱ्या २/३ पेक्षा जास्त सहवासी कैदी हे न्यायचौकशी अधीन कैदी असतात. या प्रवर्गातील कैद्यांपैकी, बहुसंख्य कैद्यांवर दखलपात्र गुन्हा दाखल असूनही, सात वर्षे किंवा त्यापेक्षा कमी शिक्षा होऊ शकणाऱ्या गुन्हयांचा आरोप असूनही त्यांना अटक करण्याची ही गरज भासणार नाही. ते केवळ गरीब आणि अशिक्षित नाहीत तर त्यात महिलांचाही समावेश असेल. अशाप्रकारे, त्यांच्यापैकी अनेकांना वारसाहक्काने गुन्हा करण्याची संस्कृती मिळाली आहे. या न्यायालयाने निरीक्षण केल्याप्रमाणे, अटक हा एक कठोर उपाय असूनही, त्यामुळे स्वातंत्र्यावर गदा येते आणि म्हणूनच त्याचा कमीत कमी वापर केला जातो, हि वस्तुस्थिती असली तरी तपास यंत्रणेच्या वतीने वसाहतवादी भारताची मानसिकता निश्चितपणे दर्शवते. लोकशाहीमध्ये, हे पोलीस राज्य आहे, असे मत कधीच होऊ शकत नाही, कारण दोघेही वैचारिकदृष्ट्या एकमेकांच्या विरुद्ध आहेत.

<u>'न्यायचौकशी' ची व्याख्या</u>

६. संहितेमध्ये न्यायचौकशी या शब्दाची व्याख्या दिलेली नाही. या शब्दाचा विस्तारित अर्थ जामिनावर सुटण्याच्या हेतूने, तपासाचा टप्पा आणि त्यानंतरचा समावेश करण्यासाठी असा द्यावा लागेल. या दोन टप्प्यांमध्ये प्राथमिक विचार अर्थातच वेगळे असतील. पहिल्या टप्प्यात सखोल तपासासाठी अटकेनंतर पोलीस कोठडीची आवश्यकता असू शकते, तर उत्तरार्धात मुख्यत्वेकरून खटल्याच्या स्वरूपात न्यायालयासमोरील कार्यवाही महत्वाची ठरते. जर आपण वरील फरक लक्षात घेतला तर, तपास पूर्ण झाल्यावर,अर्थातच इतर घटकांबरोबरच विस्तारासाठी अधिक अनुकूल विचारासाठी त्याचा परिणाम काढला जाईल.

७. त्याचप्रमाणे, शिक्षा निलंबनाच्या जामिनावर विचार करताना अपील किंवा पुनरिक्षण देखील न्यायचौकशीचा एक पैलू समजला जाईल.

<u>'जामिनाची' व्या ख्या</u>

८. जरी जामीन हा शब्द पुष्कळदा वापरला गेला आहे की, "जामीन" या शब्दाची व्याख्या संहितेत केलेली नाही. जामीन म्हणजे आरोपीकडून वैयक्तिक मुचलक्याची हमी देण्यापलीकडे काहीही नाही. याचा अर्थ न्यायालयाच्या आदेशाने किंवा पोलिसांकडून किंवा तपास यंत्रणेने आरोपी व्यक्तींची सुटका करणे असा होय.

९. न्यायालयीन प्रक्रियेत कोणत्याही हस्तक्षेपाचे समर्थन करताना संशयितांवर

लादण्यात आलेल्या खटल्यापूर्वीच्या निर्बंधांचा हा संच आहे. त्यामुळे, संशयिताने तपास आणि खटला या दोन्हींमध्ये सहकार्य करू, असे आश्वासन देणे सशर्त आहे. “जामीन” या शब्दाची व्याख्या ब्लॅक्स लॉ डिक्शनरी, ९ वी आवृत्ती, पान १६० मध्ये करण्यात आली आहे -

> “रोख रक्कम किंवा बंधपत्र सारखी सुरक्षा, मुख्यत्वेकरून भविष्यात न्यायालयात हजर राहणे आवश्यक असलेल्या कैद्याच्या सुटकेसाठी न्यायालयाकडून सुरक्षेची मागणी केली जाते.”

१०. व्हार्टन्स लॉ लॅक्सिकॉन, १४ वी आवृत्ती, पान १५० मध्ये जामीनाची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे :

> “अटक केलेल्या किंवा तुरुंगात टाकलेल्या व्यक्तीला एका ठराविक दिवशी आणि ठिकाणी त्याच्या उपस्थितीसाठी तारण घेतले जाते, त्या तारणालाच जामीन म्हणतात. कारण अटक केलेला किंवा तुरुंगात ठेवलेला पक्षकार अशा लोकांच्या हातात दिला जातो, जे स्वतःला बांधून घेतात किंवा आवश्यकतेनुसार त्याच्या उपस्थितीसाठी जामीन राहतात, जेणेकरून त्याला तुरुंगात टाकण्यापासून संरक्षण मिळू शकेल आणि जर त्यांना तो पळून जाईल अशी भीती वाटत असेल, तर त्याला हजर करण्याची कायदेशीर शक्ती त्यांच्याकडे आहे. ”

<u>जामीन हा नियम आहे</u>

११. जामीन हा नियम आहे आणि तुरुंग हा अपवाद आहे, ह्या तत्वास या न्यायालयाच्या वारंवार केलेल्या अधिघोषणेद्वारे चांगली मान्यता मिळाली आहे. हे पुन्हा भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ च्या निकषावर आहे. या न्यायालयाने **निकेश ताराचंद शहा वि. युनियन ऑफ इंडिया,** (२०१८) ११ एससीसी १, या प्रकरणामध्ये निकाल दिला की :

> "१९. गुरबक्ष सिंग सिब्बीया वि. पंजाब राज्य या संदर्भाने [गुरबक्ष सिंग सिब्बीया वि. पंजाब राज्य, (१९८०) २ एससीसी ५६५ : १९८० एससीसी (क्रि.) ४६५] मध्ये, जामीन मंजूर करण्याचा उद्देश खालीलप्रमाणे मोठ्या समाधानकारकरीतीने मांडण्यात आला आहे : (एससीसी पीपी. ५८६-८८, परिच्छेद २७-३०)
>
> "२७. सामान्य जामिनाच्या अधिकाराशी संबंधित निर्णयांचा संदर्भ घेणे आवश्यक नाही कारण तो अधिकार अटकपूर्व जामीनाच्या अधिकाराशी अचूक समांतर नाही. तथापि, हा एक कुतूहलाचा विषय आहे की, (नागेंद्र नाथ चक्रवर्ती, नागेंद्र नाथ चक्रवर्ती, १९२३ एससीसी ऑनलाईन कॅल ३१८ : एआयआर १९२४ कॅल ४७६ : १९२४ क्रि. एलजे ७३२ मध्ये] कोलकाता उच्च न्यायालयाद्वारे असा निकाल दिला होता की, जामीनाचा उद्देश हा आरोपीची खटल्याच्या वेळी उपस्थिती सुनिश्चित

करणे हा आहे आणि जामीन मंजूर करायचा की नाकारायचा या प्रश्नाच्या उत्तरासाठी लागू करण्याची योग्य चाचणी अशी आहे की, पक्षकार त्याच्या खटल्यासाठी उपस्थित राहील याची कितपत शक्यता आहे आणि की, शिक्षा म्हणून जामीन रोखला जाणार नाही हे निर्विवाद आहे. आणखी दोन प्रकरणांमध्ये म्हणजे “मेरठ कट प्रकरणांमध्ये” जामिनाच्या अधिकाराबाबत लक्षणीयरित्या निरीक्षणे नोंदविली आहेत, ज्याचा विशेष उल्लेख करणे आवश्यक आहे. के.एन.जोगळेकर वि. एम्पेरर [के.एन. जोगळेकर वि. एम्पेर, १९३१ एससीसी ऑनलाईन ऑल ६० : एआयआर १९३१ ऑल ५०४ : १९३२ क्रि. एलजे ९४] मध्ये संहितेच्या सध्याच्या कलम ४३९ शी सुसंगत असलेल्या कलम ४९८ चा परामर्श घेताना असे निरीक्षण नोंदविले की, त्या कलमानुसार सत्र न्यायाधीश किंवा उच्च न्यायालयाला जामीन मंजूर करण्याचे व्यापक अधिकार देण्यात आले आहेत आणि सध्याच्या कलम ४३७ शी सुसंगत असलेल्या पूर्वीच्या कलम ४९७ मधील निर्बंधामुळे ते अधिकार कमकुवत होत नाहीत. कलम ४९८ ने प्रदान केलेल्या स्वेच्छानिर्णयाचा वापर करण्याबाबत कोणताही कठोर आणि वेगवान नियम नाही आणि कोणतेही लवचिक तत्व नाही आणि स्वेच्छानिर्णयाचा विवेकाने वापर केला जावा, हे एकमेव तत्व प्रस्थापित आहे. एम्पेरर वि. एच.एल.

हचिन्सन [एम्पेरर वि. एच.एल. हचिन्सन, १९३१ एससीसी ऑनलाईन ऑल १४ : एआयआर १९३१ ऑल ३५६ : १९३१ क्रि. एलजे १२७१], एआयआर पी. ३५८, मध्ये असे म्हटले गेले होते की, विधिमंडळाने स्वतः न्यायालयाला अनिर्बंधित स्वेच्छानिर्णय दिलेला आहे हे लक्षात घेऊन उच्च न्यायालयाला बंधनकारक करणेसाठी कोणतेही विशिष्ट नियम ठरविण्याचा प्रयत्न करणे हे अत्यंत मूर्खपणाचे आहे. उच्च न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, वेळोवेळी उदभवू शकणाऱ्या विविध प्रकरणांचे सुरक्षितपणे वर्गीकरण केले जाऊ शकत नाही आणि प्रकरणांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न करणे आणि विशिष्ट वर्गांमध्ये जामीन मंजूर केला जाऊ शकतो, परंतु इतर वर्गांमध्ये नाही, असे म्हणणे धोकादायक आहे. फौजदारी प्रक्रिया संहितेमधील विविध कलमांवरून असे निर्दशनास आले की, जामीन मंजूर करणे हा नियम आहे आणि नकार हा अपवाद आहे. स्वातंत्र्य उपभोगणारी आरोपी व्यक्ती कोठडीत असण्यापेक्षा आपले प्रकरण सांभाळण्यासाठी आणि स्वतःचा योग्य बचाव करण्यासाठी अधिक चांगल्या स्थितीत असते. म्हणूनच, एक संभाव्य निर्दोष व्यक्ती म्हणून त्याला स्वातंत्र्य आणि स्वतःचा खटला पाहण्याची प्रत्येक संधी मिळण्याचा अधिकार आहे. एखाद्या निष्पाप व्यक्तीला स्वतःचे निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठी त्याचे स्वातंत्र्य असणे

आवश्यक आहे.

२८. प्रकरणाच्या मुळाशी येताना, गुडिकंती नरसिंमहुलू वि. स्टेट [गुडिकंती नरसिंमहुलू वि. स्टेट, (१९७८) १ एससीसी (क्रि.) ११५] या प्रकरणामध्ये न्या. क्रिष्णा अय्यर यांनी असे निरीक्षण नोंदविले की, (एससीसी पी. २४२, पॅरा १)

'१...... (जामिनाचा) मुद्दा हा स्वातंत्र्य, न्याय, सार्वजनिक सुरक्षितता आणि सार्वजनिक तिजोरीवरील भाराचा आहे, या सर्वांचा असा आग्रह आहे की, जामीनाचा मुद्दा हा विकसित न्यायशास्त्र हा सामाजिकदृष्ट्या संवेदनशील न्यायिक प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहे. शेवटी, आरोपी किंवा दोषीचे वैयक्तिक स्वातंत्र्य मूलभूत आहे, केवळ "कायद्याद्वारे स्थापित केलेल्या प्रक्रियेच्या" संदर्भात कायदेशीर ग्रहण सहन करावे लागेल, हे कलम २१ चे शेवटचे चार शब्द हे त्या मानवी हक्काचे जीवन आहे.'

२९. गुरुचरण सिंग वि. स्टेट (युटी ऑफ दिल्ली) [गुरुचरण सिंग वि. स्टेट (युटी ऑफ दिल्ली), (१९७८) १ एससीसी ११८ : १९७८ एससीसी (क्रि.) ४१] मध्ये न्या. गोस्वामी यांनी असे निरीक्षण नोंदवले आणि जे न्यायालयाच्या वतीने बोलले की : (एससीसी पी. १२९, पॅरा २९) :

'२९. .... जामीन देण्याच्या बाबतीत कठोर साचा असू शकत नाही.

जामीन मंजूर करणे किंवा रद्द करण्याच्या न्यायालयीन स्वेच्छानिर्णयाचा वापर प्रत्येक प्रकरणातील आणि परिस्थिती वर अवलंबून असतो.'

३०. अमेरिकन न्यायशास्त्रात (२रा, वॉल. ८, पी. ८०६, पॅरा ३९), मध्ये असे म्हटले आहे की :

'प्रत्येक विशिष्ट प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थितीनुसार जेथे जामीन मंजूर करणे न्यायालयाच्या स्वेच्छानिर्णयानुसार असते, तेथे मंजुरी किंवा नकार मोठ्या प्रमाणात नियंत्रित केला जातो. आरोपीला ताब्यात घेण्याचा किंवा तुरुंगात ठेवण्याचा उद्देश म्हणजे त्याची हजेरी सुरक्षित करणे आणि न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात सादर करणे आणि न्यायालयाच्या निकालाची खात्री करणे. प्राथमिक चौकशी ही आहे की, मान्यता किंवा बंधपत्राचा तो परिणाम होईल का.'

अशाप्रकारे हे स्पष्ट आहे की, जामीन मंजूर करायचा की नाही हा प्रश्न त्याच्या उत्तरासाठी विविध परिस्थितींवर अवलंबून असतो, ज्याचा एकत्रित परिणाम न्यायालयीन निकालात येणे आवश्यक आहे. कोणतीही एकच परिस्थिती सार्वत्रिक वैधता मानली जाऊ शकत नाही किंवा जामीन मंजूर करणे किंवा नकार देणेसाठी आवश्यकरीत्या समर्थनीय आहे, असे मानले जाऊ शकत नाही."

xxx xxx xxx

२४. संविधानाच्या मूलभूत हक्कांच्या प्रकरणाशी संबंधित अनुच्छेद २१ हा कराराचा तारू आहे. हे भारतातील नागरिकांच्या आणि इतर व्यक्तींच्या जीवनाच्या आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अधिकारांपेक्षा कमी पवित्रतेशी संबंधित नाही. मूलभूत हक्क प्रकरणातील (कलम २० सह) हा एकमेव लेख आहे, जो आणीबाणीच्या परिस्थितीतही निलंबित केला जाऊ शकत नाही. "राज्यघटनेचे अनुच्छेद ३५९(१) पहा. सध्या, अनुच्छेद २१ हे मनेका गांधी वि. युनियन ऑफ इंडिया [मनेका गांधी वि. युनियन ऑफ इंडिया, (१९७८) १ एससीसी २४८] नंतरच्या मोठ्या प्रमाणातील मूलभूत आणि प्रक्रियात्मक अधिकारांचे भांडार आहे."

१२. पुढे या न्यायालयाने **संजय चंद्रा वि. सिबीआय** (२०१२) १ एससीसी ४०, या प्रकरणामध्ये असे निरीक्षण नोंदविले की :

"२१. जामीन अर्जामध्ये, साधारणपणे, सुरुवातीच्या काळापासून असे नमूद केले गेले आहे की, जामीनाचा उद्देश आरोपी व्यक्तीला त्याच्या खटल्याच्या वेळी रास्त रकमेच्या जामिनाद्वारे हजर करणे हा आहे. जामिनाचा उद्देश दंडात्मक किंवा प्रतिबंधात्मक नाही. जेव्हा आरोपीस बोलावले जाईल त्यावेळेस तो त्याच्या न्यायचौकशीस सामोरे जाईल, याची खात्री करणे जोपर्यंत आवश्यक नाही तोपर्यंत स्वातंत्र्यापासून वंचित राहणे

ही शिक्षा मानली जाणे आवश्यक आहे. न्यायालये या तत्वाचा जास्त आदर करतात की, दोषी ठरल्यानंतर शिक्षा सुरु होते आणि जोपर्यंत योग्यरीत्या न्यायचौकशी होत नाही आणि सदर व्यक्ती योग्यरीत्या दोषी आढळून येत नाही तोपर्यंत प्रत्येक व्यक्ती निर्दोष आहे असे मानले जाते.

२२. सुरवातीच्या काळापासून, ह्या बाबीचे कौतुक केले जात होते की, खटला पूर्ण होईपर्यंत सस्थानबद्ध करून ठेवणे हे मोठ्या अडचणीचे कारण असू शकते. वेळोवेळी गरज अशी मागणी करते की, काही दोषी व्यक्तींना खटल्याच्या वेळी उपस्थिती सुनिश्चित करण्यासाठी खटल्यापर्यंत कोठडीत ठेवले जावे, परंतु अशा प्रकरणांमध्ये “आवश्यकता” ही परिणामकारक चाचणी आहे. या देशात राज्यघटनेतील वैयिक्तक स्वातंत्र्याच्या संकल्पनेच्या अगदी विरुद्ध आहे की, कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही प्रकरणात शिक्षा झाली, ज्यावर त्याला दोषी ठरवले गेले नाही किंवा कोणत्याही परिस्थितीत, केवळ स्वातंत्र्य सोडले तर तो साक्षीदारांना विलोभन देईल या विश्वासाने त्याला त्याच्या स्वातंत्र्यापासून वंचित ठेवले जावे, केवळ सर्वात विलक्षण परिस्थितीत.

२३. जामीन नाकारण्याचा प्रश्न न वगळता, शिक्षेपूर्वीच्या कोणत्याही तुरुंगवासात भरीव दंडात्मक सामग्री असते आणि कोणत्याही न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवले आहे की नाही हे लक्षात घेऊन जामीन नाकारणे

किंवा दोषी न ठरलेल्या व्यक्तीला धडा म्हणून तुरुंगवासाची हवा खिलवण्याच्या उद्देशाने जामीन नाकारण्याचा निर्णय कोणत्याही न्यायालयाने देणे अयोग्य ठरेल.”

<u>निर्दोषपणाचे अनुमान -</u>

१३. एखाद्या गुन्ह्यातील आरोपी व्यक्तीचे निर्दोषत्व कायदेशीर कल्पनेद्वारे गृहीत धरले जाते, ज्यामुळे न्यायालयासमोर गुन्हा सिद्ध करण्याची जबाबदारी ही अभियोग पक्षावर टाकली जाते. त्यामुळे, केलेली अटक योग्य होती आणि जामिनावर सुटका नाकारली जावी, ह्या बाबीचे समाधान त्या अभिकरणाने करायचे आहे.

१४. निर्दोषपणाचे तत्व जगभर मान्य केले गेले आहे. नागरी आणि राजकीय हक्कांवरील आंतरराष्ट्रीय कराराचे अनुच्छेद १४(२) आणि मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणेच्या अनुच्छेद ११ हे जोपर्यंत व्यक्ती दोषी सिद्ध होत नाही तोपर्यंत कायद्याचे मुख्यतत्त्व म्हणून निर्दोषतेचे गृहीतक स्विकार करतात.

१५. ऑस्ट्रेलिया आणि कॅनडा या दोन्ही देशांमध्ये, गुन्ह्याच्या गंभीरतेच्या आधारे वाजवी जामीन मिळण्याचा अधिकार हा प्रथमदर्शनी अधिकार म्हणून ओळखला जातो. संयुक्त राष्ट्रांमध्ये, जामीन म्हणून रोख ठेव घेण्याची एक सामान्य पद्धत रुजू आहे. युनायटेड किंग्डममध्ये, जामिनामध्ये काही निर्बंधांचा समावेश असण्याची शक्यता

अधिक आहे.

१६. कॅनडाच्या सर्वोच्च न्यायालयाने **कोरी ली जेम्स मायर्स विरुद्ध हर मॅजेस्टी द क्विन,** २०१९ एससीसी १८ मध्ये असे म्हटले आहे की, स्वीकार्य कायदेशीर मापदंडावर जामीन विचारात घ्यावा लागेल. अशाप्रकारे, अवाजवी विलंब हे एक कारण असलेल्या जामिनावरील वाढीचा विचार करण्याचा पुरेसा स्वेच्छानिर्णय प्रदान करतो. **हर मॅजेस्टी द क्विन विरुद्ध केविन अँटिक आणि इतर.,** २०१७ एससीसी २७ :

> "न्याय्य कारणाशिवाय वाजवी जामीन नाकारण्याचा अधिकार हा ज्ञानदायी फौजदारी न्यायव्यवस्थेचा एक आवश्यक घटक आहे. हे फौजदारी न्यायचौकशी प्रक्रियेच्या पूर्व न्यायचौकशीच्या टप्प्यावर निर्दोष असण्याच्या गृहीतकाचा प्रभाव सामील करून घेते आणि आरोपींच्या स्वातंत्र्याचे रक्षण करते. या अधिकाराचे दोन पैलू आहेत : एखाद्या गुन्ह्याचा आरोप असलेल्या व्यक्तीस न्याय्य कारणाशिवाय जामीन नाकारण्याचा अधिकार आणि वाजवी जामीन मिळण्याचा अधिकार आहे. पहिल्या पैलू अंतर्गत तरतुदीनुसार न्याय्य कारणाशिवाय जामीन नाकारता येणार नाही, जर नकार संकुचित परिस्थितीमध्ये दिला तरच जामीन नाकारण्याचे कारण असावे आणि नकार हा जामीन प्रणालीच्या पद्धतीला योग्य चालना देण्यासाठी आवश्यक आहे आणि तो सदर प्रणालीच्या कोणत्याही अप्रस्तुत हेतूसाठी दिला जात नाही. दुसरा पैलू हा वाजवी

जामीनाचा अधिकार असून तो जामिनाच्या अटींची संबंधित आहे, ज्यामध्ये कोणत्याही आर्थिक घटकाचे प्रमाण आणि सुटकेच्या कालावधीसाठी आरोपीवर लादलेल्या इतर निर्बंधांचा समावेश आहे. ते आरोपी व्यक्तींना अशा अटी आणि सुटकेच्या प्रकारांपासून वाचवते जे अवाजवी आहे.

जामिनाची सुनावणी ही एक जलद प्रक्रिया असून जामिनाच्या तरतुदी ह्या संघीय कायदा आहेत आणि या तरतुदी सर्व प्रांत आणि प्रदेशांमध्ये सातत्याने आणि निष्पक्षपणे लागू केल्या पाहिजेत. कॅनेडियन जामीन कायद्याच्या मध्यवर्ती भागात लॅडरचे तत्व आणि सुटकेचे अधिकृत प्रकार यांचा समावेश आहे, जे फौजदारी संहितेच्या कलम ५१५(१) ते (३) मध्ये आढळतात. अपवाद वगळता, जेव्हा एखाद्या हमीपत्रावर विनाअट सुटका मंजूर करतात तेव्हा ती मूलभूत स्थिती असते. सुटकेचे पर्यायी प्रकार हे लॅडरच्या तत्वाशी सुसंगतपणे लादले पाहिजेत, ज्याचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे; ज्यामुळे लवकरात लवकर वाजवी संधीवर आणि कमीत कमी कठोर आधारावर मुक्ततेला अनुकूलता दिली जाते. जर राणीने मुक्ततेचा पर्यायी प्रकार प्रस्तावित केला असेल तर, अधिक प्रतिबंधात्मक प्रकार लादण्यासाठी हा प्रकार का आवश्यक आहे हे त्याने दर्शवणे आवश्यक आहे. लॅडरच्या प्रत्येक टप्प्याचा स्वतंत्रपणे विचार केला गेला

पाहिजे आणि मुक्ततेच्या अधिक प्रतिबंधात्मक स्वरूपाकडे वळण्यापूर्वी तो नाकारला गेला पाहिजे. जेथे पक्षकार मुक्ततेच्या प्रकारावर असहमत असतील तेथे, न्यायधीशांनी कमी कठोर स्वरूप नाकारण्याच्या निर्णयाचे समर्थन न करता, अधिक प्रतिबंधात्मक स्वरूपाचे आदेश देणे ही कायद्याची चूक आहे. जामिनासह मुचलका हा सुटकेच्या सर्वात कठीण प्रकारांपैकी एक आहे आणि जोपर्यंत सर्व कमी कठीण प्रकारांचा विचार केला जात नाही आणि अयोग्य म्हणून नाकारला जात नाही तोपर्यंत लादला जाऊ नये. आरोपी व्यक्तींकडे किंवा त्यांच्या जामीनदारांकडे वाजवी वसूली करण्यायोग्य मालमत्ता असल्यास आणि ते न्यायालयाच्या समाधानासाठी त्या मालमत्ता गहाण ठेवण्यास सक्षम असल्यास त्यांना रोख जामीन देण्याची आवश्यकता नाही. जातमुचलका हा कार्यात्मकदृष्ट्या रोख जामिनाच्या समतूल्य असते आणि त्याचा समान जबरदस्त प्रभाव असतो. केवळ अपवादात्मक परिस्थितीतच रोख जामिनावर भिस्त ठेवावी, ज्यामध्ये जामिनासह जातमुचलक्यावर ही उपलब्ध नसते. जेव्हा रोख जामिनाचा आदेश पारित केला जातो, रक्कम इतकी जास्त असता कामा नये की ती प्रभावीपणे स्थानबद्धतेच्या आदेशासारखा होईल, याचा अर्थ असा आहे की, आरोपीची साधने आणि प्रकरणाची परिस्थिती यांच्या प्रमाणात असावी आणि ही रक्कम आवश्यकतेपेक्षा जास्त नसावी, जी

अन्यथा अटकेची हमी देईल. आरोपीच्या पैसे देण्याच्या क्षमतेची चौकशी करणे न्यायाधीशांचे सकारात्मक दायित्व आहे. कलम ५१५ (४) अंतर्गत मुक्ततेच्या अटी ह्या केवळ वैधानिक निकषांशी संबंधित चिंता दूर करण्यासाठी आणि आरोपीची सुटका सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक तेवढ्याच मर्यादेपर्यंतच लागू केल्या जाव्यात. संबंधित अटी या आरोपींचे वर्तन बदलण्यासाठी किंवा आरोपीला शिक्षा देण्यासाठी लादल्या जाऊ नयेत. जेथे जामिन अर्जावर पुनर्विलोकन करण्याची विनंती केली जाते तेव्हा, न्यायालयाने आर विरुद्ध सेंट क्लाऊड, २०१५ एस सी सी २७, [२०१५] २ एस.सी.आर ३२८ मध्ये निर्धारित केलेल्या जामिन पुनर्विलोकनाचे अनुसरण करणे आवश्यक आहे."

१७. आम्ही एवढेच सांगू शकतो की, जगभरातील बऱ्याच देशांमध्ये जामिनावर मुदतवाढ देण्याच्या विशेष तरतुदी असूनही, न्यायालयांनी नेहमीच निर्दोष आणि आरोपीच्या बाजूने निर्णय घेण्याच्या मान्यतेच्या गृहितकावर त्यांचा अर्थ लावला आहे.

१८. भारतातील स्थिती ही काही वेगळी नाही. न्यायालयांची ही सातत्यपूर्ण भूमिका राहिली आहे की, निर्दोषत्वाची धारणा अनुच्छेद २१ चा एक पैलू असल्याने, आरोपीच्या फायद्यासाठी असेल. परिणामी, न्यायालयात आरोप सिद्ध करण्याचा भार हा अभियोग पक्षावर टाकला जातो. पुराव्यांचे मूल्य हे वाजवी संशयापलीकडच्या तत्वावर निर्धारित करावे लागते.

<u>फौजदारी प्रक्रिया संहितेतील तरतुदी</u>

"अनियंत्रित शक्ती ही नैसर्गिकपणे स्वातंत्र्याचा शत्रू आहे."

'लिबर्टी इन द मॉडर्न स्टेट' मध्ये हरॉल्ड लास्की

१९. फौजदारी प्रक्रिया संहिता हा एक प्रक्रियात्मक कायदा असूनही भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ आणि २२ अंतर्गत निहित केलेल्या अनुल्लंघनीय अधिकारांवर लागू करण्यात आला आहे. या तरतुदींमध्ये संसदेचा वरील हेतू स्पष्टपणे दिसून आला आहे.

२०. जरी वरीलप्रमाणे 'जामीन' या शब्दाची व्याख्या केलेली नाही तरी कलम २अ मध्ये जामीनपात्र आणि अजामीनपात्र गुन्ह्यांची व्याख्या दिलेली आहे. अजामीनपात्र गुन्हा हा एक दखलपात्र गुन्हा असून ज्यात पोलीस अधिकाऱ्याला अधिपत्राशिवाय अटक करता येते. सदर अधिकाराचा वापर करण्यासाठी संहितेमध्ये अधिरोधाच्या माध्यमातून काही निर्बंध घालण्यात आले आहेत.

<u>संहितेचे कलम ४१, ४१अ आणि ६०अ -</u>

<u>प्रकरण पाच</u>

<u>व्यक्तींना अटक करणे</u>

४१. जेव्हा पोलीस वॉरंटशिवाय अटक करू शकतात - (१) कोणताही पोलीस अधिकारी दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाशिवाय आणि वॉरंटशिवाय

कोणत्याही व्यक्तीला अटक करू शकतो -

(अ) जो एका पोलीस अधिकाऱ्याच्या उपस्थितीत दखलपात्र गुन्हा करतो ;

(ब) ज्याच्या विरोधात वाजवी तक्रार केली गेली आहे किंवा विश्वासार्ह माहिती प्राप्त झाली आहे किंवा वाजवी शंका आहे की त्याने एक दखलपात्र गुन्हा केला आहे, ज्याची शिक्षा एका कालावधीसाठी जी सात वर्षांपेक्षा कमी किंवा सात वर्षांपर्यंत असू शकते दंडासह किंवा दंडाशिवाय, जर खालील अटींची पूर्तता झाल्यास, नामे -

(i) एक पोलीस अधिकाऱ्याकडे अशा तक्रारी, माहिती किंवा संशयाच्या आधारावर विश्वास ठेवण्याचे कारण आहे की, अशा व्यक्तीने गुन्हा केला आहे.

(ii) पोलीस अधिकारी समाधानी आहे की, अशी अटक आवश्यक आहे -

(i) अशा व्यक्तीला पुढील कोणताही गुन्हा करण्यापासून रोखण्यासाठी; किंवा

(ii) गुन्ह्याच्या योग्य तपासासाठी; किंवा

(iii) अशा व्यक्तीला पुरावे गायब करण्यापासून रोखणे किंवा अशा पुराव्यांशी कोणत्याही प्रकारे छेडछाड करण्यापासून रोखणे; किंवा

(iv) अशा व्यक्तीला प्रकरणातील वस्तुस्थितीची माहिती असलेल्या कोणत्याही व्यक्तीला प्रलोभन, धमकी किंवा आश्वासन देण्यापासून रोखणे जेणेकरून त्याला न्यायालयासमोर किंवा पोलीस अधिकाऱ्यासमोर अशी वस्तुस्थिती उघड करण्यापासून परावृत्त केले जाईल; किंवा

(v) कारण जोपर्यंत अशा व्यक्तीला अटक केली जात नाही तोपर्यंत न्यायालयामध्ये त्याच्या उपस्थितीची खात्री देता येत नाही आणि अशी अटक करताना पोलीस अधिकारी त्याची कारणे लेखी स्वरूपात नोंदवतील.

परंतु या उपकलमातील तरतुदींनुसार एखाद्या व्यक्तीला अटक करण्याची आवश्यकता नसलेल्या सर्व प्रकरणांमध्ये पोलीस अधिकाऱ्याने अटक न करण्यामागील कारणे लेखी स्वरूपात नोंदवावीत.

(बीए) ज्याच्या विरुद्ध विश्वासार्ह माहिती प्राप्त झाली आहे की, त्याने एक दखलपात्र गुन्हा केला आहे आणि ज्याची शिक्षा एका कालावधीसाठी जी सात वर्षांपेक्षा कमी किंवा सात वर्षांपर्यंत असू शकते, दंडासह किंवा दंडाशिवाय किंवा मृत्यू शिक्षादेश असू शकते आणि पोलीस अधिकाऱ्याकडे अशा माहितीच्या आधारे विश्वास ठेवण्याचे कारण आहे की, अशा व्यक्तीने हा गुन्हा केला आहे.

(सी) ज्याला या संहितेअंतर्गत किंवा राज्य सरकारच्या आदेशाने

अपराधी म्हणून घोषित केले गेले आहे; किंवा

(डी) ज्याच्या ताब्यात अशी कोणतीही गोष्ट सापडली आहे जी चोरीची मालमत्ता असल्याचा वाजवी संशय असेल आणि ज्याने अशा गोष्टीच्या संदर्भात गुन्हा केल्याचा वाजवी संशय असेल; किंवा

(इ) जो पोलिस अधिकाऱ्याला त्याचे कर्तव्य बजावत असताना अडथळा आणतो किंवा जो कायदेशीर कोठडीतून पळून गेला किंवा पळून जाण्याचा प्रयत्न करतोय; किंवा

(एफ) जो संघराज्याच्या कोणत्याही सशस्त्र दलाकडून पळून आलेला असल्याचा वाजवी संशय आहे; किंवा

(जी) ज्याच्या विरुद्ध वाजवी तक्रार करण्यात आली आहे किंवा विश्वासार्ह माहिती प्राप्त झाली आहे किंवा वाजवी संशय आहे, तो भारताबाहेर कोणत्याही ठिकाणी केलेल्या कोणत्याही कृत्याशी संबंधित आहे, जर तो भारतात केला असेल, तर तो गुन्हा म्हणून शिक्षेस पात्र ठरला असता आणि ज्यासाठी तो प्रत्यार्पणाशी संबंधित कोणत्याही कायद्यानुसार किंवा अन्यथा तो भारतात पकडले जाण्यास किंवा कोठडीत ठेवण्यास पात्र आहे; किंवा

(एच) ज्याची सिद्धपराधी म्हणुन सुटका झाली आणि जो कलम ३५६ च्या पोटकलम (५) अंतर्गत तरतूद केलेल्या कोणत्याही नियमाचा

भंग करतोय; किंवा

(आय) ज्याच्या अटकेसाठी इतर पोलीस अधिकाऱ्याकडून कोणतीही मागणी प्राप्त झाली आहे, परंतु मागणीमध्ये अटक करण्यात येणारी व्यक्ती आणि ज्या गुन्ह्यासाठी किंवा इतर कारणांसाठी अटक करायची आहे हे नमूद केले आहे आणि त्यावरून असे दिसते की, त्या व्यक्तीस मागणी जारी करणाऱ्या अधिकाऱ्याकडून वॉरंटशिवाय अटक कायदेशीररित्या अटक केली जाऊ शकते.

(२) कलम ४२ च्या तरतुदींच्या अधीन राहून अदखलपात्र गुन्ह्याशी संबंधित कोणत्याही व्यक्तीला किंवा ज्याच्याविरुद्ध तक्रार केली गेली आहे किंवा विश्वासार्ह माहिती प्राप्त झाली आहे किंवा त्याच्याशी संबंधित असल्याबाबत वाजवी संशय आहे अशा कोणत्याही व्यक्तीस वॉरंट किंवा दंडाधिकारीच्या आदेशाशिवाय अटक केली जाणार नाही.

<u>कलम ४१ अ - पोलीस अधिकाऱ्यांसमोर हजर राहण्याची नोटिस -</u>

(१) [पोलीस अधिकारी] कलम ४१ च्या उपकलम (१) मधील तरतुदीनुसार एखाद्या व्यक्तीला अटक करण्याची आवश्यकता नसलेल्या सर्व प्रकरणांमध्ये, ज्या व्यक्तीविरुद्ध वाजवी तक्रार करण्यात आली आहे किंवा विश्वासार्ह माहिती प्राप्त झाली आहे किंवा त्याने दखलपात्र गुन्हा केला आहे असा वाजवी संशय आहे, अशा व्यक्तीस निर्देश देणारी नोटीस

त्याच्यासमोर किंवा नोटिसीमध्ये नमूद केल्याप्रमाणे इतर ठिकाणी हजर राहण्यासाठी, जारी करेल.

(२) अशा प्रकारची नोटिस कोणत्याही व्यक्तीला दिल्यास त्या नोटीसच्या अटींचे पालन करणे हे त्या व्यक्तीचे कर्तव्य असेल.

(३) जेथे अशी व्यक्ती नोटीसीचे पालन करते आणि त्याचे पालन करत राहते, तेव्हा त्याला नोटीसमध्ये नमूद केलेल्या गुन्ह्याच्या संदर्भात अटक केली जाणार नाही. जोपर्यंत नोंदवल्या जाणाऱ्या कारणास्तव पोलीस अधिकाऱ्याचे असे मत आहे की त्याला अटक केली पाहिजे.

(४) जर अशी व्यक्ती कोणत्याही वेळी नोटिसीच्या अटींचे पालन करण्यात अपयशी ठरली किंवा स्वतःची ओळख पटविण्यास तयार नसेल तर पोलीस अधिकारी, यासंदर्भात सक्षम न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अधीन राहून, नोटीसमध्ये नमूद केलेल्या गुन्ह्यासाठी त्याला अटक करू शकतो.

xxx xxx xxx

<u>६० ए. संहितेनुसार अटक ही काटेकोरपणे करावयाची आहे -</u> अटकेची तरतूद असलेल्या या संहितेतील तरतुदी किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींशिवाय कोणतीही अटक केली जाणार नाही."

२१. संहितेच्या प्रकरण ५ अंतर्गत कलम ४१ हे व्यक्तींच्या अटकेशी संबंधित आहे. प्रत्येक दखलपात्र गुन्ह्यासाठी अटक करणे अनिवार्य नाही, हे या तरतुदीच्या आदेशावरून दिसून येते. अधिकाऱ्यांचे समाधान झाले की, एखाद्या व्यक्तीने दखलपात्र गुन्हा केला आहे, ज्याची शिक्षा सात वर्षांपेक्षा कमी असू शकते किंवा जी त्या कालावधीकरिता दंडासह किंवा दंडाशिवाय वाढू शकते, अशा कारावासाची शिक्षा होऊ शकते, त्याला अटक केवळ तेव्हाच केली जाऊ शकते आणि जेव्हा पोलीस अधिकाऱ्याचे असे समाधान झाले की, विश्वास किंवा संशय असल्याचे कारण आहे कि, त्या व्यक्तीने गुन्हा केला आहे आणि त्याला अटक करण्याची गरज आहे. पुढील कोणताही गुन्हा टाळण्यासाठी, योग्य तपासासाठी आणि त्याला/तिला फरारी होण्यापासून किंवा पुराव्यांशी छेडछाड करण्यापासून रोखण्यासाठी अशी आवश्यकता निर्माण केली जाते. अशा कोणत्याही व्यक्तीला वस्तूस्थितीनुसार प्रलोभन, धमकी किंवा वचन देण्यापासून रोखण्यासाठी त्याला/तिला अटक देखील केली जाऊ शकते, जेणेकरून त्याला/तिला न्यायालय किंवा पोलीस अधिकाऱ्याला सांगितलेली तथ्य उघड करण्यापासून परावृत्त करता येईल. आणखी एक कारण ज्यावर अटक करणे आवश्यक असू शकते ते म्हणजे जेव्हा अटक केल्यानंतर त्याची/तिची उपस्थिती न्यायालयासमोर हजर करणे आवश्यक असते आणि ज्याची खात्री देता येत नाही.

२२. या तरतुदीनुसार, पोलीस अधिकाऱ्याने अटक करताना त्याची कारणे लेखी नोंदवणे बंधनकारक आहे. अशाप्रकारे, अटकेची कारणे लिखित स्वरूपात नोंदवणे हे

पोलीस अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे, जेव्हा पोलीस अधिकारी अटक न करण्याचा निर्णय घेतील तेव्हा देखील कारणे नोंदवतील. इतर कारणांसह आरोपीस सात वर्षांपेक्षा जास्त शिक्षा असेल तेव्हा उपरोक्त प्रक्रियेची आवश्यकता नाही.

२३. कलम ४१ चे पालन न केल्याचा परिणाम गुन्ह्याचा संशय असलेल्या व्यक्तीच्या फायद्यासाठी निश्चितच असेल. परिणामी, जामीन वाढवण्याच्या अर्जावर विचार करताना, न्यायालयांना या तरतुदींची पूर्तता झाली असल्याची स्वतःची खात्री करावी लागेल. कोणतीही पूर्तता न केल्यास आरोपीला जामीन मिळू शकेल.

२४. कलम ४१ अ अंतर्गत ज्या व्यक्तीविरुद्ध वाजवी तक्रार केली आहे किंवा विश्वासनीय माहिती प्राप्त झाली आहे किंवा त्याने दखलपात्र कृत्य केले आहे असा वाजवी संशय आहे, अशा व्यक्तीला पोलीस अधिकाऱ्याने त्याच्या समोर उपस्थित राहण्याची नोटीस जारी करण्याशी संबंधित आहे. कलम ४१ (१) अंतर्गत गुन्हा आणि अटक आवश्यक नाही. कलम ४१ ब अधिकाऱ्याच्या अनिवार्य कर्तव्यासह अटक करण्याच्या प्रक्रियेशी संबंधित आहे

२५. कलम ४१ आणि ४१ अ च्या व्याप्ती आणि उद्दिष्टांवरून हे स्पष्ट आहे की, ते संविधानातील अनुच्छेद २१ चे पैलू आहेत. **अर्नेश कुमार वि. स्टेट ऑफ बिहार,** (२०१४) ८ एससीसी २७३ मधील या न्यायालयाच्या निकालाच्या अनुषंगाने, आम्हाला अधिक तपशीलवार सांगण्याची गरज नाही.

“७.१ उपरोक्त तरतुदींच्या स्पष्ट वाचनावरून असे दिसून येते की, एखाद्या गुन्ह्याचा आरोप असलेल्या व्यक्तीला सात वर्षांपेक्षा कमी कालावधीसाठी किंवा दंडासह किंवा त्याशिवाय सात वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा होऊ शकते, अशा व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केल्याच्या समाधानावर पोलीस अधिकारी अटक करू शकत नाहीत. अशा प्रकरणांमध्ये अटक करण्यापूर्वी पोलीस अधिकाऱ्याने स्वतःचे अधिक समाधान करणे आवश्यक आहे की, अशा व्यक्तीला पुढील कोणताही गुन्हा करण्यापासून रोखण्यासाठी अशी अटक आवश्यक आहे किंवा प्रकरणाच्या योग्य तपासासाठी किंवा आरोपीला गुन्ह्याचा पुरावा गायब करण्यापासून रोखण्यासाठी किंवा अशा पुराव्याशी कोणत्याही प्रकारे छेडछाड करणे किंवा अशा व्यक्तीला, साक्षीदाराला कोणतेही प्रलोभन, धमकी किंवा वचन देण्यापासून प्रतिबंधित करणे, जेणेकरून त्याला न्यायालय किंवा पोलीस अधिकाऱ्यासमोर अशी तथ्ये उघड करण्यापासून परवृत्त करणे किंवा जोपर्यंत अशा आरोपीला अटक केली जात नाही, तोपर्यंत त्याची न्यायालयात हजेरी आवश्यक असेल तेव्हा खात्री करता येत नाही, हे निष्कर्ष आहेत, जे तथ्यांच्या आधारे पोहचू शकतात.

७.२) कायद्याने पोलीस अधिकाऱ्याला वस्तुस्थिती सांगणे आणि कारणे

लिखित स्वरूपात अनिवार्य केले आहे ज्यामुळे त्यांना अटक करताना वरीलपैकी कोणत्याही तरतुदींचा समावेश असलेल्या निष्कर्षापर्यंत पोहोचता येते. कायद्यानुसार पोलीस अधिकाऱ्यांनी अटक न करण्यामागची कारणे लेखी नोंदवणे आवश्यक आहे.

७.३) मुळात, अटकेपूर्वी पोलीस अधिकाऱ्याने स्वतःलाच प्रश्न विचारला पाहिजे की, अटक कशासाठी? त्याची खरोखरच गरज आहे का? त्याने कोणता हेतू साध्य होईल? त्यातून कोणते उद्दिष्ट साध्य होईल? या प्रश्नांची समाधानकारकरित्या पूर्तता झाल्यानंतर आणि वर नमूद केल्याप्रमाणे एक किंवा इतर अटी पूर्ण झाल्यावरच अटकेचा अधिकार वापरणे आवश्यक आहे. दंडामध्ये, अटक करण्यापूर्वी प्रथम पोलीस अधिकाऱ्यांना माहिती आणि सामग्रीच्या आधारे विश्वास ठेवण्याचे कारण असावे की, आरोपीने गुन्हा केला आहे. या व्यतिरिक्त, पोलीस अधिकाऱ्यास आणखी या गोष्टीचे समाधान करावे लागेल की, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४१ च्या कलम (१) च्या उपकलम (ए) ते (इ) अंतर्गत तरतूद केलेल्या एक किंवा अधिक हेतूंसाठी अटक करणे आवश्यक आहे.

८. पोलिसांनी वॉरंटशिवाय अटक केलेल्या आरोपीला भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २२(२) आणि फौजदारी प्रक्रिया संहितेतील कलम

कलम ५७ अन्वये, विनाकारण विलंब न न करता प्रवासासाठीची आवश्यक अवधी वगळता, कोणत्याही परिस्थितीत २४ तासांपेक्षा जास्त नाही इतक्या अवधीत दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्याचा घटनात्मक अधिकार आहे.

८.१ एखाद्या प्रकरणाच्या तपासादरम्यान फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६७ अंतर्गत अधिकाराचा वापर करण्यासाठी दंडाधिकाऱ्यांनी प्राधिकृत केल्यावरच आरोपीला २४ तासांपेक्षा जास्त काळ ताब्यात ठेवता येते. स्थानबद्धता प्राधिकृत करण्याचा अधिकार हे अत्यंत गंभीर कार्य आहे. ते नागरिकांच्या स्वातंत्र्यावर आणि अधिकारावर परिणाम करते. त्यामुळे, ते अत्यंत सावधगिरीने आणि सावधानतेने वापरणे आवश्यक आहे. आमचा अनुभव असे सांगतो की, तो ज्या गांभीर्याने घ्यावयाचा आहे, त्या गांभीर्याने वापरला जात नाही. बऱ्याच प्रकरणांमध्ये, स्थानबद्धता अधिकारास नित्याने, सहजपणे आणि साध्या पद्धतीने प्राधिकृत केले जाते.

८.२ फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १६७ अंतर्गत दंडाधिकाऱ्यांनी स्थानबद्ध करण्यास प्राधिकृत करण्यापूर्वी, त्यांचे असे समाधान व्हायला हवे की, अटक करण्यात आलेली अटक ही कायदेशीर आहे आणि कायद्यानुसार आहे आणि अटक केलेल्या व्यक्तीचे सर्व घटनात्मक

अधिकार डावललेले नाहीत. जर पोलीस अधिकाऱ्याने केलेली अटक संहितेच्या कलम ४१ च्या अटींची पूर्तता करत नसेल तर, न्यायदंडाधिकाऱ्यांचे हे कर्तव्य आहे की, त्याला अधिक काळ ताब्यात घेण्यास प्राधिकृत न करणे आणि आरोपीची सुटका करणे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास, जेव्हा एखाद्या आरोपीला दंडाधिकाऱ्यासमोर हजर केले जाते तेव्हा, अटक करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याने दंडाधिकारी यांना अटकेची वस्तुस्थिती, कारणे आणि त्याचे निष्कर्ष सादर करणे आवश्यक असते आणि त्या बदल्यात दंडाधिकाऱ्यांना या बाबीवर समाधान मानावे लागेल की, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४१ अंतर्गत अटकेच्या अटींची पूर्तता झाली आहे आणि नंतरच ते आरोपीला ताब्यात घेण्यास प्राधिकृत करतील.

८.३ स्थानबद्धता प्राधिकृत करण्यापूर्वी, न्यायदंडाधिकारी स्वतःचे समाधान नोंदवतील, ते थोडक्यात असू शकते. परंतु, सदर नोंदविलेले समाधान हे त्यांच्या आदेशावरून प्रतिबिंबित झाले पाहिजे. ते कधीही पोलीस अधिकाऱ्यांच्या ते स्वतः म्हणाले या तत्त्वावर आधारित असू शकत नाही. उदाहरणार्थ, जर पोलीस अधिकारी अशा व्यक्तीला पुढील कोणताही गुन्हा करण्यापासून रोखण्यासाठी किंवा खटल्याचा योग्य तपास करण्यासाठी किंवा आरोपीला पुराव्याची छेडछाड करण्यापासून

रोखण्यासाठी किंवा प्रलोभन देण्यापासून रोखण्यासाठी अटक आवश्यक मानत असतील तर पोलीस अधिकारी यांनी दंडाधिकाऱ्यांसमोर वस्तुस्थिती, कारणे आणि अशी माहिती सादर करावे ज्याच्या आधारे पोलीस अधिकारी या निष्कर्षापर्यंत पोहोचले होते. सदर कारणांचा दंडाधिकारी यांनी स्थानबद्धता प्राधिकृत करताना विचार केला पाहिजे आणि त्यांचे समाधान लेखी नोंदवल्यानंतरच दंडाधिकारी आरोपीला स्थानबद्ध करण्यास प्राधिकृत करतील.

८.४ थोडक्यात, जेव्हा एखाद्या संशयिताला अटक केल्यावर त्याला स्थानबद्ध करण्याची परवानगी मागण्यासाठी दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केले जाते, तेव्हा अटकेसाठी विशिष्ट कारणे नोंदविली गेली आहेत का आणि तसे असल्यास प्रथमदर्शनी ती कारणे समर्पक आहेत का, या प्रश्नाचे निराकरण दंडाधिकाऱ्यांना करावे लागेल आणि दुसरे म्हणजे, वर नमूद केलेल्या प्रत्येक कारणाकडे लक्ष वेधल्यानंतर असा वाजवी निष्कर्ष पोलीस अधिकाऱ्याला अजिबात काढता येतो, या मर्यादेपर्यंत दंडाधिकारी न्यायालयीन छाननी करतील.

९. उपरोक्त तरतूद हे स्पष्ट करते की, सर्व प्रकरणांमध्ये जेथे अटक होते तेथे, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४१(१) अंतर्गत एखाद्या व्यक्तीची आवश्यकता नाही, तेथे पोलीस अधिकारी यांनी आरोपीला

त्यांच्यासमोर हजर राहण्याचे निर्देश देणारी नोटीस निर्दिष्ट ठिकाण आणि वेळ नमूद करून बजावणे आवश्यक आहे. अशा आरोपीला न्यायालयासमोर हजर राहणे कायद्याने बंधनकारक आहे. कायद्याने अशा आरोपीला पोलीस अधिकाऱ्यांसमोर हजर राहणे बंधनकारक केले आहे आणि पुढे असे आदेश दिले आहेत की, जर अशा आरोपीने नोटीसीच्या अटींचे पालन केले तर, त्याला अटक केली जाणार नाही. पोलीस अधिकाऱ्याचे मत आहे की, अटक आवश्यक असल्यासही कारण नोंदवल्याशिवाय, अशा आरोपीस अटक केली जाणार नाही. या टप्प्यावर, फौजदारी प्रक्रिया संहितेअंतर्गत कलम ४१ अन्वये परिकल्पित केलेल्या अटकेच्या पूर्वस्थितीचे पालन करणे आवश्यक आहे आणि दंडाधिकाऱ्यांकडून देखील वरीलप्रमाणे छाननी केली जाईल.

१०. आमचे असे मत आहे की, फौजदारी प्रक्रिया संहितेअंतर्गत कलम ४१ मधील तरतुदीनुसार जे पोलीस अधिकाऱ्यांना न्यायदंडाधिकाऱ्यांच्या आदेशाशिवाय आणि वॉरंटशिवाय आरोपीला अटक करण्याचा अधिकार मिळाले आहेत व जर त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली गेली तर पोलीस अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून किंवा नकळत केलेली चूक पूर्ववत होईल आणि अटकपूर्व जामीन मंजूर करण्यासाठी न्यायालयात येणाऱ्या प्रकरणांची संख्या लक्षणीयरित्या कमी होईल. यावर आम्ही भर देऊ

इच्छितो की, फौजदारी प्रक्रिया संहिते अंतर्गत कलम ४१ अन्वये अटक करण्यात आलेली सर्व किंवा बहुतांश कारणे केस डायरीमध्ये यांत्रिकरित्या उद्धृत करण्याची प्रथा मोडीत काढली आणि बंद केली जावी.

११. या निकालात आमचा प्रयत्न असा आहे की, पोलीस अधिकाऱ्यांनी आरोपीला विनाकारण अटक करू नये आणि दंडाधिकाऱ्यांनी सहजपणे किंवा यांत्रिकपणे स्थानबद्ध करण्यास प्राधिकृत करू नये. आम्ही वर काय निरीक्षण केले, याची खात्री करण्यासाठी, आम्ही खालीलप्रमाणे दिशानिर्देश देतो ते असे :

११.१ सर्व राज्य सरकारांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व पोलीस अधिकाऱ्यांना भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८ अंतर्गत गुन्हा दाखल झाल्यावर आपोआप अटक न करण्याचे निर्देश द्यावेत. तसेच फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४१ मधील उपरोक्त मापदंडांतर्गत अटक करण्याच्या आवश्यकतेबद्दल स्वतःचे समाधान करावे.

११.२ कलम ४१(१) (बी) (ii) अंतर्गत विनिर्दिष्ट उपकलम असलेली तपासणी यादी सर्व पोलीस अधिकाऱ्यांना देण्यात यावी.

११.३ पोलीस अधिकारी योग्यरीत्या भरलेली तपासणी यादी पुढे सादर करतील आणि पुढे आरोपीला स्थानबद्ध करण्यासाठी

दंडाधिकारी यांचेसमोर हजर करताना अटकेसाठी आवश्यक असलेली कारणे आणि माहिती सादर करतील.

११.४ दंडाधिकारी हे आरोपीला स्थानबद्ध करण्यासाठी प्राधिकृत करताना पोलीस अधिकाऱ्यांनी उपरोक्त अटींमध्ये दिलेल्या अहवालाचे अवलोकन करतील आणि त्याचे समाधान नोंदवल्यानंतरच दंडाधिकारी स्थानबद्धता प्राधिकृत करतील.

११.५ आरोपीला अटक न करण्याचा निर्णय लेखी स्वरूपात, खटला सुरु झाल्याच्या तारखेपासून दोन आठवड्यांच्या आत दंडाधिकाऱ्यांकडे एका प्रतीसह पाठवावा, जी लेखी स्वरूपात नोंदविण्याचा कारणासाठी जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांद्वारे वाढविली जाऊ शकते.

११.६ फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४१ अ मधील नमूद अटींनुसार आरोपीला खटला सुरू झाल्याच्या तारखेपासून दोन आठवड्यांच्या आत हजर करण्याची नोटीस बजावली जाईल, जी जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकांद्वारे लिखित स्वरूपात नोंदवण्याच्या कारणांसाठी वाढवली जाऊ शकते.

११.७ उपरोक्त निर्देशांची पूर्तता करण्यात अयशस्वी झाल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना विभागीय कारवाईसाठी पात्र

ठरविण्याव्यतिरिक्त त्यांना प्रादेशिक अधिकारक्षेत्र असलेल्या उच्च न्यायालयासमोर न्यायालयाचा अवमान केल्याबद्दलही शिक्षा होऊ शकते.

११.८ संबंधित न्यायदंडाधिकारी यांनी उपरोक्त कारणे न नोंदवता स्थानबद्धता प्राधिकृत केल्यास ते योग्य अशा उच्च न्यायालयाकडून विभागीय कारवाईसाठी पात्र असतील.

१२. आम्ही अशी भर घालण्याची त्वरा करतो की, वरील निर्देश ही केवळ भादंवि चे कलम ४९८-अ किंवा हुंडा प्रतिबंधक कायद्याचे कलम ४, प्रस्तुत प्रकरण यांनाच नव्हे, तर जेथे गुन्हा हा दंडासहित अथवा दंडाशिवाय, सात वर्षांपेक्षा कमी नाही अशा किंवा सात वर्षांपर्यंत ठोठावण्यात येणाऱ्या शिक्षेस पात्र असतो, अशा प्रकरणांना सुद्धा लागू होतील."

२६. आम्ही केवळ या बाबीचा पुनरुच्चार करतो की, तपासी आणि अभियोग पक्षाच्या यंत्रणांनी वरील निर्देशांची शब्दशः आणि त्यातील अर्थासह पूर्तता करणे आवश्यक आहे आणि कलम ४१ चे पालन न केल्याच्या प्रकरणी आम्ही व्यक्त केलेला दृष्टिकोन आणि त्याचे परिणाम, हे न्यायालयाने लक्षात ठेवणे आवश्यक आहे आणि ते आदेशांमधून प्रतिबिंबित होणे अपेक्षित आहे.

२७. अर्नेश कुमार (उपरोल्लेखित) प्रकरणात या न्यायालयाचा आदेश असूनही संहितेच्या कलम ४१ (क) नुसार असलेल्या आदेशांची पूर्तता करण्यासाठी कोणतेही ठोस पाऊल उचलले गेले नाही. या न्यायालयाने कलम ४१ (१) (ख) (i) आणि (ii) ची स्पष्ट उकल केली आहे आणि त्याबरोबर असा निर्णय दिला आहे की, पोलिस अधिकारी या नात्याने कारण असल्याचे मानले तरीही, अटकेची आवश्यकता असल्याबाबत खात्री असणे सुद्धा गरजेचे आहे. कलम (४१) चे पोट-कलम (१) (ख) (i) हे पोट-कलम (ii) सह वाचणे आवश्यक आहे आणि म्हणून 'खात्रीलायक कारण' आणि 'अटक करण्याची खात्री' हे दोन्ही घटक अनिवार्य आहेत आणि त्यानुसार पोलिस अधिकाऱ्याने ते नोंदविणे आवश्यक आहे.

२८. हे देखील आमच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, संहितेच्या कलम ४१ अ ची अनिवार्य पूर्तता करण्यासाठी कोणतीही विशिष्ट मार्गदर्शक तत्त्वे नाहीत. रिट याचिका (दि.) क्र. ७६०८/२०१७ मध्ये दिनांक ०७.०२.२०१८ रोजीच्या आणि त्यानंतर अवमान याचिका (दि.) क्र. ४८०/२०२० आणि सीएम अर्ज क्र. २०५४/२०२० मध्ये दिनांक २८.१०.२०२१ रोजीच्या आदेशाद्वारे निर्णय देताना दिल्ली उच्च न्यायालयाने तसा प्रयत्न केला, ज्यामध्ये केवळ मार्गदर्शक तत्वांच्या आवश्यकतेची नव्हे, तर पूर्तता ना केल्याचा परिणाम म्हणून संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कार्यवाही करण्याबाबत चर्चा करण्यात आली होती. आम्ही या बाबीची सुद्धा नोंद घेतो की, स्थायी आदेश क्र. १०९/२०२० द्वारे, दिल्ली पोलिसांनी स्थायी आदेश पारित केला आहे, ज्यामध्ये

पोलिस अधिकाऱ्यांनी नोटिसा किंवा आदेश जारी करण्याच्या पद्धतीच्या स्वरूपात मार्गदर्शक तत्वांच्या संचाची तरतूद करण्यात आली आहे. केलेली उपरोक्त कार्यवाही विचारात घेता, रिट याचिका (दि) क्र. ७६०८/२०१७ मध्ये दिनांक ०७.०२.२०१९ रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने पारित केलेल्या आदेशाचे रीतसर पालन होण्याच्या दृष्टीने, या न्यायालयानेसुद्धा रिट याचिका (फौ) क्र. ४२०/२०२१ मध्ये, दिनांक १०.०५.२०२१ रोजी आदेश पारित केला, ज्याद्वारे बिहार राज्यास कलम ४१ अ च्या अनिवार्यतेची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य सुधारणेच्या सदर पैलूकडे लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. फौ. एम. पी. क्र. १२९१/२०२१ मध्ये झारखंड उच्च न्यायालयाने सुद्धा दि. १६.०६.२०२२ रोजी याच धर्तीवर नुकताच न्यायनिर्णय पारित केला आहे.

२९. अशा प्रकारे, कलम ४१ अ च्या अनिवार्यतेचे पालन करण्यासाठी दिल्ली पोलिसांनी जारी केलेल्या स्थायी आदेशाची म्हणजेच स्थायी आदेश क्र. १०९/२०२० ची नोंद घेत सर्व राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांना स्थायी आदेश सुकर करण्याचे निर्देश देणे आम्हांस योग्य वाटते. आम्हांला असे वाटते की, यामुळे केवळ अनधिकृत अटकच नव्हे,तर विविध न्यायालयांसामोर प्रलंबित राहिलेल्या जामीन अर्जनचीही निश्चित काळजी घेतली जाईल कारण, सात वर्षांपर्यंत शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यांकरिता त्यांची (जामीन अर्जाची) आवश्यकताच राहणार नाही.

३०. कलम ४१ आणि कलम ४१ अ चे रीतसर पालन न करता अटक करणाऱ्या अधिकाऱ्यांवर न्यायालयांनी कठोर कारवाई करावी अशीही आमची अपेक्षा आहे.

अर्नेशकुमार (उपरोल्लेखित) प्रकरणात घालून दिलेल्या कायदा, निर्दोषत्वाच्या गृहितकाच्या निकषावर वापरण्यात येणारा स्वेच्छानिर्णय आणि कलम ४१ अंतर्गत दिलेल्या संरक्षक उपाययोजना, या बाबी तपासी यंत्रणा लक्षात ठेवतील अशी आम्ही आशा व्यक्त करतो. अशी अटक करताना विवेकबुद्धी वापरली तर, तिथे प्रक्रियेचे पालन होईल. संहितेच्या कलम ६ अ खालील विशिष्ट तरतुदीच्या विवेचनातूनही आमचे मत प्रतिबिंबित होते, ज्याद्वारे संहितेचे काटेकोरपणे पालन करून अटक करणे संबंधित अधिकाऱ्यास बंधनकारक करण्यात आले आहे.

संहितेचे कलम ८७ आणि ८८

८७. समन्सऐवजी किंवा त्याच्या बरोबरच वॉरंट काढणे — कोणत्याही व्यक्तीच्या उपस्थितीसाठी समन्स काढण्यासाठी या संहितेद्वारे न्यायालयाला शक्ती प्रदान केली असेल अशा कोणत्याही प्रकरणी --

(क) जर एकतर असे समन्स काढण्यापूर्वी, किंवा ते काढल्यानंतर पण त्या व्यक्तीच्या उपस्थितीसाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी ती व्यक्ती फरारी झाली आहे किंवा ती समन्सचे पालन करणार नाही असे न्यायालयाला सकारण वाटले तर; किंवा

(ख) जर अशा वेळी ती उपस्थित राहण्यास चुकली व

समन्सनुसार उपस्थित होणे तिला शक्य होईल अशा प्रकारे समन्स वेळेवर रीतसर बजावले होते असे शाबीत झाले व अशा चुकण्याबद्दल कोणतीही वाजवी सबब पुढे केलेली नसेल तर;

त्या व्यक्तीच्या अटकेसाठी न्यायालय आपली कारणे लेखी नमूद करून वॉरंट काढू शकेल.

८८. उपस्थितीसाठी बंधपत्र घेण्याची शक्ती - जिच्या उपस्थितीसाठी किंवा अटकेसाठी समन्स किंवा वॉरंट काढण्याची कोणत्याही न्यायालयाच्या पीठासीन अधिकाऱ्याला शक्ति प्रदान झाली असेल अशी कोणतीही व्यक्ती अशा न्यायालयात उपस्थित असेल तर, असा अधिकारी अशा व्यक्तीला अशा न्यायालयात किंवा ज्याच्याकडे ते प्रकरण संपरीक्षेसाठी वर्ग करता येईल अशा अन्य कोणत्याही न्यायालयात तिने उपस्थित राहण्यासाठी जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना बंधपत्र निष्पादित करण्यास फर्मावू शकेल."

३१. जेव्हा न्यायालये एखाद्या व्यक्तीस उपस्थित राहण्यास सांगतात, तेव्हा प्रकरणाचे स्वरूप आणि वस्तुस्थितीनुसार समन्स किंवा वॉरंट जारी करावे

लागते. कलम ८७ नुसार न्यायालयाला समन्सऐवजी किंवा समन्ससह वॉरंट जारी करण्याचा स्वेच्छाधिकार आहे. वरील अधिकाराचा वापर फक्त कारणे नोंदवल्यानंतरच करता येतो. वॉरंट जामीनपात्र किंवा अजामीनपात्र असू शकते. संहितेच्या कलम ८८ नुसार एखाद्या व्यक्तीच्या उपस्थितीसाठी जामीनदारांकडून किंवा जामीनदारांशिवाय बंधपत्र घेण्याचा अधिकार न्यायालयाला देण्यात आला आहे.

३२. वरील दोन तरतुदींचा विचार करता, **इंदर मोहन गोस्वामी विरुद्ध उत्तरांचल राज्य,** (२००७) १२ एससीसी १ या प्रकरणात या न्यायालयाने निर्णय दिल्यानुसार, न्यायालयांनी प्रथम समन्स बजावणे, त्यानंतर जामीनपात्र वॉरंट जारी करण्याची प्रक्रिया स्वीकारावी लागेल आणि त्यानंतर गरज पडल्यास अजामीनपात्र वॉरंट जारी करता येऊ शकते. उपरोक्त स्पष्ट आदेश असूनही, आमच्या असे निदर्शनास आले आहे की, अजामीनपात्र वॉरंट, अर्थातच योग्य विचार न करता, सर्रास आणि ज्याद्वारे केवळ स्वेच्छानिर्णयाची शक्ती प्रदान होते, त्या तरतुदीच्या अर्थाच्या विरोधात जारी केले जातात आणि अशी शक्ती, ज्या व्यक्तीच्या उपस्थितीची मागणी करण्यात आली आहे तिच्या बाजूने, विशेषत: घटनेच्या अनुच्छेद २१ अन्वये दिलेल्या स्वातंत्र्याच्या पार्श्वभूमीवर वापरली जाते. त्यामुळे सदर व्यक्तीच्या बाजूने स्वेच्छानिर्णयाचा वापर न करण्याची वैध कारणे देणे आवश्यक आहे. **इंदर मोहन गोस्वामी विरुद्ध उत्तरांचल राज्य,** (२००७) १२ एससीसी १ या प्रकरणात या

न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की,

"५०. सर्व मानवी हक्कांमध्ये स्वातंत्र्य सर्वात बहुमूल्य आहे हे सुसंस्कृत देशांनी मान्य केले आहे. द अमेरिकन डिक्लरेशन ऑन इंडिपेंडंन्स, १७७६, फ्रेंच डिक्लेरेशन ऑफ द राइट्स ऑफ मेन अँड द सिटिझन, १७८९, युनिवर्सल डिक्लरेशन ऑफ ह्यूमन राइट्स अँड इंटरनॅशनल कॉवेनंट ऑफ सिविल अँड पॉलिटिकल राईट्स, १९६६ या सर्वांत एकमताने असे सांगितले आहे की, स्वातंत्र्य नैसर्गिक आहे आणि प्रत्येक माणसाचा अविभाज्य अधिकार आहे. त्याचप्रमाणे आपल्या राज्यघटनेच्या कलम २१ मध्ये असे जाहीर करण्यात आले आहे की, कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज, कोणत्याही व्यक्तीस तिच्या स्वातंत्र्यापासून वंचित केले जाणार नाही.

५१. अजामीनपात्र वॉरंट जारी करताना वैयक्तिक स्वातंत्र्यात हस्तक्षेप होतो. अटक आणि तुरुंगवास म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या सर्वात बहुमूल्य अधिकारापासून वंचित राहणे. त्यामुळे अजामीनपात्र वॉरंट जारी करण्यापूर्वी न्यायालयांना अत्यंत सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

५२. व्यक्तीसाठी जसे स्वातंत्र्य मौल्यवान आहे, तसेच कायदा व

सुव्यवस्था राखण्यात ही समाजाचे हित महत्त्वाचे आहे. सुसंस्कृत समाजाच्या अस्तित्वासाठी या दोन्ही गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. काही वेळेस जेव्हा जनतेच्या आणि राज्याच्या व्यापक हितासाठी एखाद्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर काही काळासाठी गदा आणणे नितांत आवश्यक ठरते, तेव्हाच अजामीनपात्र वॉरंट जारी करण्यात यावे.

अजामीनपात्र वारंट केव्हा जारी करावे

५३. समन्स किंवा जामीनपात्र वॉरंटचा अपेक्षित परिणाम होण्याची शक्यता नसते, तेव्हा एखाद्या व्यक्तीला न्यायालयात आणण्यासाठी अजामीनपात्र वॉरंट जारी करण्यात यावे. हे तेव्हा होऊ शकते :-

* ती व्यक्ती स्वेच्छेने न्यायालयात हजर होणार नाही याची खात्री पटली आहे ; किंवा
* समन्स बजावण्यासाठी अशी व्यक्ती पोलिस अधिकाऱ्यांना सापडत नाही; किंवा
* जर त्या व्यक्तीस ताबडतोब ताब्यात घेतले नाही तर ती व्यक्ति कोणालातरी इजा करू शकते, असे मानले जाते.

५४. आरोपीला न्यायालयात हजर राहण्यासाठी समन्स पुरेसे ठरेल, असे न्यायालयाचे मत असेल, तर शक्यतो समन्स किंवा जामीनपात्र वॉरंटला प्राधान्य द्यावे. वॉरंट जारी केल्यावर होणाऱ्या अत्यंत गंभीर परिणामांमुळे आणि गुंतागुंतीच्या परिणामांमुळे, वस्तुस्थितीची योग्य छाननी केल्याशिवाय आणि पूर्ण विचार केल्याशिवाय, जामीनपात्र किंवा अजामीनपत्र वॉरंट कधीही जारी करण्यात येऊ नये. फौजदारी स्वरूपाची तक्रार किंवा प्रथम खबरी अहवाल हा कोणत्याही अप्रत्यक्ष हेतूने दाखल करण्यात आलेला नाही ना, हे न्यायालयाने अत्यंत काळजीपूर्वक तपासले पाहिजे.

५५. तक्रार प्रकरणांमध्ये, प्रथमतः, न्यायालयाने तक्रारीच्या प्रतीसह समन्स बजावण्याचे निर्देश द्यावेत. जर आरोपी समन्स टाळत असल्याचे दिसत असेल तर दुसऱ्या वेळेस न्यायालयाने जामीनपात्र वॉरंट जारी करावे. तिसऱ्या वेळेस जर आरोपी जाणीवपूर्वक न्यायालयाची कार्यवाही टाळत आहे, याची न्यायालयाला पूर्ण खात्री झाली तर अजामीनपात्र वॉरंट बजावण्याची प्रक्रिया राबवावी. वैयक्तिक स्वातंत्र्य सर्वश्रेष्ठ आहे, म्हणून आम्ही पहिल्या आणि दुसऱ्या प्रसंगी न्यायालयांना

अजामीनपात्र वॉरंट जारी करण्यापासून दूर राहण्याचा इशारा देतो.

५६. स्वेच्छानिर्णयाच्या शक्तीचा अत्यंत काळजीपूर्वक आणि सावधगिरीने आणि विवेकपूर्णतेने वापर केला पाहिजे. वॉरंट जारी करण्यापूर्वी न्यायालयाने वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सामाजिक हित या दोन्हींचा योग्य समतोल साधला पाहिजे. वॉरंट जारी करण्यासाठी कोणतेही निश्चित सूत्र असू शकत नाही. परंतु सर्वसाधारण नियमानुसार, जोपर्यंत एखाद्या आरोपीवर गर्हनीय गुन्हा केल्याबद्दल गुन्हा दाखल होत नाही आणि तो पुराव्यांशी छेडछाड किंवा पुरावा नष्ट करण्याची किंवा कायद्याच्या प्रक्रियेतून पळ काढण्याची शक्यता आहे, अशी भीती वाटत नाही, तोपर्यंत अजामीनपात्र वॉरंट जारी करणे टाळले पाहिजे.

५७. अजामीनपात्र वॉरंट बजावताना वैयक्तिक स्वातंत्र्य आणि जनतेचे आणि राज्याचे हित यांचा योग्य समतोल राखण्याचा प्रयत्न न्यायालयाने केला पाहिजे."

३३. **पंकज जैन वि. केंद्र सरकार** (२०१८) ५ एससीसी ७४३ या प्रकरणात या न्यायालयाने कलम ८८ अन्वये स्वेच्छानिर्णयाचा वापर करण्याबाबत असा निर्णय दिला आहे की,

"१२. प्रस्तुत अपिलात ज्या मुख्य मुद्द्याचे उत्तर देणे आवश्यक आहे तो म्हणजे तपासादरम्यान अटक झाली नसल्याच्या कारणास्तव, फौप्रसं च्या कलम ८८ अंतर्गत बंधपत्र स्वीकारून न्यायालयाने अपीलकर्त्याची सुटका करणे बंधनकारक होते की, फौप्रसं च्या कलम ८८ अन्वये बंधपत्र स्वीकारून मुक्तता करण्याची विनंती करण्याचा अपीलकर्त्याने दाखल केलेला अर्ज फेटाळून लावण्यात न्यायालयाने कलम ८८ खालील आपल्या अधिकारक्षेत्राचा योग्यरीत्या वापर केला.

१३. फौप्रसं मधील कलम ८८ ही तरतूद "उपस्थित राहण्यास भाग पाडण्यासाठी आदेशिका" या सहाव्या प्रकरणामध्ये समाविष्ट आहे. सहावे प्रकरण चार विभागांत विभागलेले आहे - क. समन्स; ख. अटकेचे वॉरंट; ग. उद्घोषणा व जप्ती; आणि घ. आदेशिकांविषयी अन्य नियम. कलम ८८ खालीलप्रमाणे आहे :

"८८. उपस्थितीसाठी बंधपत्र घेण्याची शक्ती .— जिच्या उपस्थितीसाठी किंवा अटकेसाठी समन्स किंवा वॉरंट काढण्याची कोणत्याही न्यायालयाच्या पीठासीन अधिकाऱ्याला शक्ति प्रदान झाली असेल अशी कोणतीही व्यक्ती अशा न्यायालयात उपस्थित असेल तर, असा

अधिकारी अशा व्यक्तीला अशा न्यायालयात किंवा ज्याच्याकडे ते प्रकरण संपरीक्षेसाठी वर्ग करता येईल अशा अन्य कोणत्याही न्यायालयात तिने उपस्थित राहण्यासाठी जामीनदारांसह किंवा त्यांच्याविना बंधपत्र निष्पादित करण्यास फर्मावू शकेल."

१४. कलम ८८ मध्ये वापरण्यात आलेल्या "करता येईल" या शब्दांचे तात्पर्य काय होते याचा आपण प्रथम विचार करणे आवश्यक आहे.

xxx xxx xxx

२२. फौप्रसं च्या कलम ८८ अन्वये न्यायालयात हजर असलेल्या कोणत्याही व्यक्तीला कोणताही अधिकार प्राप्त होत नाही. न्यायालयाला देण्यात आलेले स्वेच्छानिर्णयाचे अधिकार हे अशा व्यक्तीला, त्या न्यायालयात किंवा ज्याच्याकडे ते प्रकरण संपरीक्षेसाठी वर्ग करता येईल अशा अन्य कोणत्याही न्यायालयात, तिने उपस्थित राहण्याच्या हेतूने आणि उद्देशाने असतात. कलम ८८ अन्वये न्यायालयाला देण्यात आलेला स्वेच्छानिर्णय न्यायालयात उपस्थित असलेल्या व्यक्तीला

कोणताही अधिकार देत नाही, तर त्याची उपस्थिती सुलभ करण्यासाठी अधिकार न्यायालयाला देण्यात आला आहे, ज्यावरून हे स्पष्टपणे सूचित होते की "करता येईल" या शब्दाचा वापर स्वेच्छानिर्णयानुसार आहे आणि जेव्हा परिस्थितीची तशी मागणी असते तेव्हा न्यायालयाने आपला स्वेच्छानिर्णय वापरणे आवश्यक आहे. कलम ८८ मध्ये वापरलेल्या "कोणतीही व्यक्ती" या शब्दाचा व्यापक अर्थ द्यावा लागेल, ज्यात अशा व्यक्तींचा समावेश असू शकतो, जे एखाद्या प्रकरणात आरोपी देखील नाहीत आणि साक्षीदार म्हणून उपस्थित राहतात.

संहितेचे कलम १६७ (२)

१६७. जेव्हा अन्वेषण चोवीस तासांत संपवणे शक्य नसेल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती. -

(१) xxx xxx xxx

(२) या कलमाखाली आरोपीला ज्या दंडाधिकाऱ्याकडे पाठवलेले असेल त्याला त्या प्रकरणाची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असो वा नसो - अशा दंडाधिकाऱ्यास स्वतःला योग्य वाटेल अशा हवालातीत एकूण जास्तीत जास्त पंधरा दिवसांएवढ्या

मुदतीपर्यंत आरोपीला स्थानबद्ध करणे हे प्राधिकृत करता येईल आणि जर त्याला प्रकरणाची संपरीक्षा करण्याची किंवा ते संपरीक्षेसाठी सुपूर्द करण्याची अधिकारिता नसेल व आणखी स्थानबद्धता त्यास अनावश्यक वाटत असेल तर तो आरोपीला अशी अधिकारिता असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे पाठवण्याचा आदेश देऊ शकेल :

परंतु, -

(क) जर आरोपी व्यक्तीला पोलिस हवालातीव्यतिरिक्त अन्यथा पंधरा दिवसांच्या मुदतीपेक्षा अधिक काळ स्थानबद्ध करून ठेवण्यास पुरेशी आधारकारणे अस्तित्वात आहेत अशी दंडाधिकाऱ्याची खात्री झाली तर, त्याला तसे करता येईल, पण कोणताही दंडाधिकारी, -

(एक) मृत्यू, आजीव कारावास किंवा किमान दहा वर्षे मुदतीचा कारावास या शिक्षेस पात्र असणाऱ्या अपराधाशी अन्वेषण संबंधित असेल त्या बाबतीत, एकूण नव्वद दिवसांच्या

;

(दोन) अन्वेषण इतर कोणत्याही अपराधाशी संबंधित असेल त्या बाबतीत, एकूण साठ दिवसांच्या ;

कालावधीपेक्षा अधिक काळ, आरोपी व्यक्तीला या परिच्छेदाअन्वये हवालातीत स्थानबद्ध करण्यास प्राधिकृती देणार नाही आणि नव्वद दिवसांचा किंवा प्रकरणपरत्वे साठ दिवसांचा उक्त कालावधी समाप्त झाल्यानंतर आरोपी व्यक्ती जामीन देण्यास तयार असेल व जामीन देईल तर तिला जामिनावर बंधमुक्त करण्यात येईल आणि या पोटकलमाखाली जामिनावर बंधमुक्त करण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती ३३ व्या प्रकरणाच्या उपबंधाखाली अशा प्रकारे बंधमुक्त करण्यात आली असण्याचे मानण्यात येईल ;

(ख) कोणताही दंडाधिकारी पहिल्या वेळी आणि आरोपी व्यक्ती पोलीस कोठडीत असेपर्यंत, त्यानंतरच्या प्रत्येक वेळी आरोपी

व्यक्तीस, त्याच्यासमोर जातीने उपस्थित केल्याशिवाय, या कलमान्वये अशा आरोपीला पोलीस कोठडीत स्थानबद्ध करण्याचा प्राधिकार देणार नाही, परंतु, दंडाधिकारी, आरोपी व्यक्तीला एकतर जातीने किंवा इलेक्ट्रॉनिक व्हिडिओ जोडणी माध्यमाद्वारे हजर केल्यावर आरोपी व्यक्तीच्या न्यायिक कोठडीतील स्थानबद्धतेत आणखी वाढ करू शकेल.;

(ग) ज्याला उच्च न्यायालयाने यासंबंधात खास शक्ती प्रदान केलेली नाही असा कोणताही द्वितीय वर्ग दंडाधिकारी पोलिस हवालातीतील स्थानबद्धतेस प्राधिकृती देणार नाही.

स्पष्टीकरण १. -शंका उद्भवू नयेत म्हणून याद्वारे असे घोषित करण्यात येते की, परिच्छेद (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाला तरीही, आरोपी जोपर्यंत जामीन पुरवत नाही, तोपर्यंत त्याला हवालातीत ठेवण्यात येईल.

स्पष्टीकरण २. - परिच्छेद (ख) खाली आवश्यक केल्याप्रमाणे आरोपी व्यक्तीला दंडाधिकाऱ्यासमोर हजर केले होते किंवा कसे याबाबतीत कोणताही प्रश्न उद्भवला तर, आरोपी व्यक्तीला हजर केले होते, ही गोष्ट एकतर स्थानबद्धतेस प्राधिकृत करणाऱ्या आदेशवारील आरोपी व्यक्तीच्या स्वाक्षरीद्वारे किंवा यथास्थिती

इलेक्ट्रॉनिक व्हिडिओ जोडणीच्या साधनाद्वारे आरोपी व्यक्तीस हजर केल्यासंबंधी दंडाधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या आदेशाद्वारे सिद्ध करता येईल.

परंतु पुढे असे की, अठरा वर्षे वयाखालील महिलेच्या बाबतीत, सुधारगृहाच्या किंवा मान्यताप्राप्त सामाजिक संस्थेच्या कोठडीमध्ये स्थानबद्ध करण्याचा प्राधिकार देण्यात येईल."

३४. सन १९७८ मध्ये कलम १६७ (२) लागू करण्यात आले, ज्यात तपास पूर्ण करण्यासाठी जास्तीत जास्त कालावधीवर भर देण्यात आला. या तरतुदीमागे एक प्रशंसनीय हेतू असा आहे की, जलद तपास आणि निष्पक्ष सुनावणी सुनिश्चित करणे आणि समाजातील गरीब घटकांच्या हितांचे रक्षण करणारी तर्कसंगत कार्यपद्धती निश्चित करणे. अनुच्छेद २१ चा हासुद्धा एक भाग आहे. या तरतुदीत निर्दोषतेचे गृहितकसुद्धा अंतर्भूत आहे. संशयित व्यक्ती तुरुंगात अडकली असल्याने तपास यंत्रणेला तपासाची प्रक्रिया जलद गतीने करावी लागते. त्यामुळे निर्धारित वेळेत तपास पूर्ण करणे हे यंत्रणेचे कर्तव्य असते आणि त्यात अपयश आल्यास आरोपींची सुटका होऊ शकते. दिलेला अधिकार हा संपूर्ण आणि अभेद्य आहे, जो संशयिताच्या फायद्यासाठी आहे. **एम. रवींद्रन विरुद्ध महसूल गुप्तचर संचालनालय,** (२०२१) २ एससीसी ४८५ या प्रकरणामध्ये या न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे

अलीकडच्या साथरोगासारख्या कोणत्याही अनपेक्षित परिस्थितीतही असा अधिकार हिरावून घेता येत नाही.

"२. कलम १६७ (२) आणि जीवित आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार

१७. या न्यायालयाच्या विविध निर्णयांनुसार कलम १६७ (२) अन्वये मूलभूतरीत्या मिळणाऱ्या जामिनाच्या अधिकाराच्या निकषांचा विस्तार करण्यापूर्वी या न्यायालयाने *उदय मोहनलाल आचार्य* [*उदय मोहनलाल आचार्य* वि. *महाराष्ट्र राज्य*, (२००१) ५ एससीसी ४५३ : २००१ एससीसी (फौ.) ७६०] या प्रकरणामध्ये व्यक्तीच्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकारावर आणि त्यापासून वंचित ठेवल्याचा परिणाम यांवर नोंदविलेल्या निरीक्षणाची नोंद घेणे आम्हांस उचित वाटते, जी खालीलप्रमाणे आहेत : (एससीसी पृ. ४७२, परिच्छेद १३)

"१३. ... वैयक्तिक स्वातंत्र्य हे भारतीय राज्यघटनेच्या मूळ उद्दिष्टांपैकी एक आहे आणि घटनेच्या अनुच्छेद २१ नुसार केल्यानुसार त्यापासून वंचित ठेवणे हे केवळ कायद्याद्वारे

आणि त्यातील तरतुदींच्या अनुषंगानेच होऊ शकते. जेव्हा कायद्यामध्ये अशी तरतूद आहे की, दंडाधिकारी आरोपीस कलम १६७ च्या पोट-कलम (२) च्या परंतुकामध्ये दर्शविलेल्या जास्तीत जास्त कालावधीकरिता स्थानबद्ध करू शकतात, तेव्हा तपासी यंत्रणेने चलन दाखल न करता त्या कालावधीनंतर पुढे स्थानबद्ध करणे ही पळवाट ठरेल आणि कायद्यानुसार आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या तरतुदींनुसार नसेल आणि त्यामुळे घटनेच्या अनुच्छेद २१ चे उल्लंघन होऊ शकते."

१७.१ भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ मध्ये अशी तरतूद आहे की, "*कायद्याने प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज, कोणत्याही व्यक्तीस, तीचे जीवित किंवा वैयक्तिक स्वातंत्र्य यांपासून वंचित केले जाणार नाही.*" या न्यायालयाच्या घटनापीठाने *मनेका गांधी विरुद्ध केंद्र सरकार* [*मनेका गांधी विरुद्ध केंद्र सरकार,* (१९७८) १ *एससीसी* २४८] या प्रकरणात असा निर्णय दिल आहे की, अशी कार्यपद्धती मनमानी, अनुचित किंवा अवाजवी असू शकत नाही. फौप्रसं चे कलम १६७ (२) लागू करण्याचा इतिहास आणि त्याच्या परंतुकामधील

"मूलभूतरीत्या मिळणारा जामीन" चे संरक्षण हे मूलतः अनुच्छेद २१ शी निगडित आहे आणि कायद्याच्या नियमाखेरीज कोणत्याही व्यक्तीला स्थानबद्ध करण्यात येणार नाही या घटनात्मक संरक्षणाचे कायदेशीर स्पष्टीकरण आहे.

१७.२ फौप्रसं लागू होण्यापूर्वी अस्तित्वात असलेल्या फौजदारी प्रक्रिया संहिता, १९८९ ("संहिता १८९८") च्या कलम १६७ नुसार, एखाद्या आरोपीला पोलिस किंवा न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचा जास्तीत जास्त कालावधी १५ दिवसांचा होता. मात्र, १५ दिवसांत गुंतागुंतीचे तपास पूर्ण करणे अनेकदा शक्य नसल्याने, कोठडीची मुदत संपल्यानंतर तपास अधिकारी 'प्राथमिक आरोपपत्र' दाखल करतील, अशी प्रथा निर्माण झाली. त्यानंतर न्यायचौकशी सुरू करण्याचे पुढे ढकलावे आणि संहिता १८९८ च्या कलम ३४४ अन्वये आरोपींना तपास पूर्ण होईपर्यंत आणि अंतिम आरोपपत्र दाखल होईपर्यंत अधिक कोठडी देण्याची विनंती राज्य सरकार दंडाधिकाऱ्यांना करीत असे. भारतीय विधी आयोगाने न्यायालयीन प्रशासनातील सुधारणांवरील अहवाल क्रमांक १४ (खंड २, १९४८, पृ. ७५८-७६०) मध्ये असे नमूद केले आहे की, अनेक प्रकरणांमध्ये न्यायालयासमोर कोणताही

अंतिम अहवाल दाखल न होता आरोपी अनेक महिने कोठडीत होते. १५ दिवसांच्या आत पोलिसांचा अहवाल दाखल न झाल्यास, दंडाधिकारी आरोपींची सुटका करण्यास बांधील आहेत का, याबाबत न्यायालयीन मतांमध्ये मतभेद असल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले.

१७.३ म्हणूनच विधी आयोगाने अहवाल क्रमांक १४ मध्ये १५ दिवसांच्या मुदतीनंतर, विशेषतः कोठडीची, कायम तरतूद करण्याची योग्य तरतूद करण्यासाठी शिफारस केली, जेणेकरून "*गंभीर गुन्ह्याच्या प्रकरणांमध्ये पूर्ण आणि योग्य तपासाच्या गरजा पूर्ण करताना, व्यक्तीच्या* स्वातंत्र्याचेसुद्धा रक्षण होईल." तसेच, दंडाधिकाऱ्यांसमोर पोलिस अहवाल दाखल केल्याशिवाय कोणत्याही आरोपीला ज्या जास्तीत जास्त कालावधीसाठी स्थानबद्ध करता येणार नाही, असा कालावधी विधिमंडळाने निश्चित करावा. असे निदर्शनास आणून देण्यात आले की, इंग्लंडमध्ये देशद्रोहासारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपीलाही खटला सुरू होईपर्यंत अनिश्चित काळासाठी हवालातीत स्थानबद्ध करता येत नाही.

१७.४ अहवाल क्रमांक १४ मध्ये केलेल्या सूचनेचा विधी

आयोगाने *फौजदारी प्रक्रिया संहिता,* १८९८ वरील अहवाल क्रमांक ४१ मधील (खंड १, १९६९, पृष्ठ ७६-७७) मध्ये पुनरुच्चार केला. कलम १६७ अन्वये विहित केलेल्या वैधानिक कालावधीपलीकडे आरोपींना कोठडीत ठेवण्यासाठी "प्राथमिक अहवाल" दाखल करून संहितेच्या १८९८ च्या कलम ३४४ चा दुरुपयोग रोखण्याच्या आवश्यकतेवर विधी आयोगाने पुन्हा भर दिला. यामुळे गंभीर दुरुपयोग होऊ शकतो, ज्यामध्ये "*अशा प्रकारे अटक केलेल्या व्यक्तीला अनिश्चित काळासाठी कोठडीत ठेवले जाऊ शकते आणि तपास आरामात चालू शकतो*", याकडे लक्ष वेधण्यात आले. त्यामुळे आयोगाने हवालातीत करण्यासाठी जास्तीत जास्त ६० दिवसांची मुदत निश्चित करण्याची शिफारस केली. अशा मुदतवाढीमुळे ६० दिवसांचा कालावधी नित्याची बाब होऊ शकते, अशी यापूर्वी अहवाल क्रमांक ३७ मध्ये नमूद केलेली मर्यादा आयोगाने विचारात घेतली. मात्र, वरिष्ठ न्यायालयांच्या योग्य देखरेखीमुळे हे टाळण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

१७.५ सन १९७० मध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता विधेयकाचा मसुदा तयार करताना केंद्र सरकारने अहवाल क्रमांक ४१ मध्ये

नमूद केलेल्या सूचनांची दखल घेतली आणि त्यांचा समावेश केला. अखेरीस, संहिता, १८९८ च्या संहितेची जागा सध्याच्या फौ. प्र. सं. ने घेतली. फौ. प्र. सं. च्या उद्दिष्टे आणि कारणांच्या निवेदनात अशी तरतूद आहे की, विधी आयोगाच्या शिफारशींचे मूल्यमापन करताना सरकारने खालील महत्वाच्या बाबी विचारात घेतल्या :

"३. आयोगाच्या शिफारशींची सरकारने काळजीपूर्वक तपासणी केली आणि इतर बाबींसोबत खालील मूलभूत बाबी विचारात घेतल्या.

(i) नैसर्गिक न्यायाच्या मान्य तत्त्वांनुसार आरोपी व्यक्तीला निष्पक्ष खटला चालवण्याची संधी मिळाली पाहिजे;

(ii) केवळ संबंधित व्यक्तींसाठीच नव्हे, तर समाजासाठीही हानीकारक असलेल्या तपास आणि न्यायचौकशीस होणारा विलंब टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत; आणि

(iii) ही प्रक्रिया गुंतागुंतीची नसावी आणि त्याद्वारे,

शक्य तितक्या प्रमाणात, समाजातील गरीब घटकांना न्याय्य वागणूक मिळण्याची खात्री असावी."

१७.६ या पार्श्वभूमीवर सध्याच्या सीआरपीसीमध्ये कलम १६७ (२) लागू करण्यात आले, ज्यात गुन्ह्याचे गांभीर्याच्या प्रमाणात आरोपीच्या कोठडीच्या कालावधीच्या कालमर्यादेची तरतूद करण्यात आली, अन्यथा आरोपीला जामिनाचा अलोपनीय अधिकार प्राप्त होतो. उपरोल्लेखित विधी आयोगाच्या शिफारशींवरून स्पष्ट होते की, तपास पूर्ण करण्यासाठी पुरेशा कालमर्यादेची गरज आणि आरोपींच्या नागरी स्वातंत्र्याचे रक्षण करण्याची आवश्यकता यांत समतोल राखणे हा विधिमंडळाचा हेतू होता. कलम १६७ (२) मध्ये स्पष्ट तरतूद आहे की, तपास यंत्रणेने विहित मुदतीत आवश्यक पुरावे गोळा करावेत, अन्यथा आरोपीला अधिक काळासाठी स्थानबद्ध करता येणार नाही. यामुळे तपास अधिकाऱ्यांना पुढील स्थानबद्धतेच्या शक्यतेचा गैरवापर न करता जलद आणि कार्यक्षमतेने कारवाई करणे भाग पडते. यामुळे गुन्ह्याची माहिती देण्याच्या तारखेपासून कोणताही अवाजवी विलंब न करता न्यायालयसुद्धा या प्रकरणाची दखल

घेते, जेणेकरून फौजदारी न्यायव्यवस्थेवरुन एकूणच समाजाचा विश्वास उडू नये आणि त्याविषयी उपहासवृत्ती निर्माण होऊ नये.

१७.७ म्हणूनच, वर नमूद केल्याप्रमाणे, कलम १६७ (२) हे अनुच्छेद २१ नुसार बेकायदेशीर आणि मनमानी स्थानबद्धतेपासून जीवित आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचे संरक्षण देणाऱ्या घटनात्मक बांधिलकीशी अविभाज्यपणे जोडलेले आहे आणि या हेतूची पूर्तता होईल अशा प्रकारे त्याची अर्थउकल केली पाहिजे. या संदर्भात *राकेशकुमार पॉल* विरुद्ध आसाम राज्य [राकेश कुमार पॉल विरुद्ध आसाम राज्य, (२०१७) १५ एससीसी ६७ : (२०१८) १ एससीसी (फौ.) ४०१] या प्रकरणात या न्यायालयाच्या त्रिसदस्यीय खंडपीठाने दिलेल्या निर्णयाचा संदर्भ देणे आम्हांला उपयुक्त वाटते, ज्यात फौ. प्र. सं. च्या कलम १६७ (२) च्या अर्थाविषयी काही मूलभूत तत्त्वे निर्धारित केली गेली होती, जरी सध्याच्या प्रकरणापेक्षा त्यातील कायद्यासंबंधी प्रश्न काहीसे वेगळे होते. *राकेश कुमार पॉल विरुद्ध आसाम राज्य* [राकेश कुमार पॉल विरुद्ध आसाम राज्य, (२०१७) १५ एससीसी ६७ : (२०१८) १ एससीसी (फौ.) ४०१] या प्रकरणामध्ये तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर उद्भवलेले प्रश्न असे होते की, प्रथम, ज्या

गुन्ह्यांसाठी जास्तीत जास्त १० वर्षे तुरुंगवासाची पण कमीत कमी १० वर्षांपेक्षा कमी शिक्षा होती, अशा गुन्ह्यांच्या बाबतीत कलम १६७ (२) (क) (१) खालील ९० दिवसांच्या हवालातीतील मुदतवाढ लागू होईल का? दुसरे म्हणजे कलम १६७ (२) अन्वये वैधानिक मुदत संपल्याचे कारण म्हणून विशेषरीत्या युक्तिवाद करण्यात आला नसला तरी आरोपींनी दाखल केलेला जामीन अर्ज मूलभूतरीत्या मिळणाऱ्या जामिनासाठीचा अर्ज मानला जाऊ शकतो का? ज्या गुन्ह्यांकरिता कमीत कमी १० वर्षांच्या तुरुंगवासाच्या शिक्षेची तरतूद आहे आणि लेखी अर्जाऐवजी आरोपीच्या वकिलांनी उच्च न्यायालयासमोर मूलभूतरीत्या मिळणाऱ्या जामिनासाठी केलेला तोंडी युक्तिवाद पुरेसा असेल तरच फक्त ९० दिवसांची मर्यादा उपलब्ध आहे असा निर्णय बहुमताने दिला आहे. वैयक्तिक स्वातंत्र्याच्या बाबतीत न्यायालयाने फार तांत्रिक असू नये, या युक्तिवादावर हे आधारित होते. मदन बी. लोकुर, न्या. यांनी आपल्या बहुमताच्या मतानुसार समर्पकरीत्या खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले : (एससीसी पृ. ९५-९६ व ९९, परिच्छेद २९, ३२ व ४१)

"२९. असे असले तरीही, चोवीस तासांच्या आत आणि अन्यथासुद्धा कालबद्ध कालावधीत चौकशी पूर्ण करण्याचा मूलभूत कायदेशीर हेतू कायम आहे, जरी तो कालावधी वर्षानुवर्षे वाढविण्यात आला आहे. तपास पूर्ण करण्यासाठी पुरेसा वेळ देण्याबरोबरच विधिमंडळाने वैयक्तिक स्वातंत्र्यावरही आणि नेहमीच भर दिला आहे आणि एखाद्या आरोपीला दीर्घकाळ किंवा अनिश्चित काळासाठी कोठडीत ठेवणे अन्यायकारक ठरेल, असे विधिमंडळास नेहमीच वाटत आले आहे. याच कारणास्तव आणि या कारणासाठीसुद्धा तपास यंत्रणेला जबाबदार ठरविण्यासाठी विधिमंडळाने कालमर्यादा निश्चित केली आहे....

xxx xxx xxx

३२. ... प्रदीर्घ कालावधीत अशा दृष्टिकोनांमुळे आणि अशा मतांमुळे, तपास जलदगतीने पूर्ण

करण्यासाठी शतकाहून अधिक काळापासून विधिमंडळास प्रेरणा मिळाली आहे, जेणेकरून एखादा आरोपी त्याने/ तिने न केलेल्या गुन्ह्यासाठीसुद्धा दीर्घकाळ कोठडीत राहिल्यामुळे त्याच्या/ तिच्या वैयक्तिक स्वातंत्र्यापासून विनाकारण वंचित राहू नये. आमच्या मते, राज्याच्या विद्वान वकिलाने सांगितल्याप्रमाणे निव्वळ शब्दकोश किंवा शाब्दिक दृष्टीकोनातून नव्हे, तर आपल्यासमोरील संपूर्ण चर्चेकडे तपासाच्या जलदगतीने पूर्ण होण्याच्या दृष्टिकोनातून आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या दृष्टीकोनातून पाहिले पाहिजे .

xxx xxx xxx

४१. *वैयक्तिक स्वातंत्र्य आणि राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ च्या बाबतीत नेहमीच औपचारिक किंवा तांत्रिक असणे योग्य नाही हे*

लक्षात घेऊन आम्ही हे मत मांडतो. या न्यायालयाच्या आणि इतर घटनात्मक न्यायालयांच्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या न्यायशास्त्राच्या इतिहासात हेबियस कॉर्पस रिट आणि मुख्य न्यायमूर्ती किंवा न्यायालयाला उद्देशून लिहिलेल्या पत्राच्या आधारेही चालवण्यात येणाऱ्या इतर रिट याचिकांचा समावेश आहे."

(यावर भर देण्यात आला आहे.)

त्यामुळे अनुच्छेद २१ मधील अधिकारांना स्पर्श करणाऱ्या कोणत्याही मुद्द्यावर विचार करताना न्यायालये कठोर किंवा औपचारिक दृष्टिकोन अवलंबू शकत नाहीत.

१७.८ *एस. कासी* विरुद्ध *राज्य* [एस. कासी विरुद्ध राज्य, (२०२१) १२ एससीसी १ : २०२० एससीसी ऑनलाइन एससी ५२९] या प्रकरणात या न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या निकालाचाही आपण लाभासह संदर्भ घेऊ शकतो, ज्यात असे निरीक्षण नोंदविण्यात आले होते की, कलम १६७ (२) अंतर्गत मूलभूतरीत्या जामीन मिळण्याचा अभेद्य अधिकार हा कलम २१ अंतर्गत

वैयक्तिक स्वातंत्र्याच्या अधिकाराचा अविभाज्य भाग आहे आणि सध्या प्रचलित असलेल्या साथरोगाच्या परिस्थितीतही, जामीन मिळण्याचा सदर अधिकार निलंबित केला जाऊ शकत नाही. तपास सुरू ठेवण्याच्या आणि दोषारोपपत्र सादर करण्याच्या राज्याच्या अधिकारापेक्षा आरोपीची सुटका करण्याच्या अधिकाराला प्राधान्य दिले जाते, यावर भर देण्यात आला.

१७.९ याव्यतिरिक्त, दंडात्मक कायद्याचा अन्वयार्थ लावण्यात काहीही संदिग्धता असल्यास, वैयक्तिक आरोपी आणि सरकारी यंत्रणा यांच्यातील सर्वव्यापक सत्तेतील तफावत लक्षात घेता, न्यायालयाने आरोपींच्या हक्कांचे रक्षण करण्याकडे झुकणाऱ्या अर्थाला अनुकूलता दर्शविली पाहिजे. हे केवळ मूलभूत दंडात्मक कायद्यांच्या बाबतीतच लागू नाही तर आरोपींच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याची तरतूद करणाऱ्या प्रक्रियेच्या बाबतीतदेखील लागू आहे.

१७.१० विशेषत: फौ. प्र. सं. च्या संदर्भात, उपरोल्लेखित उद्देश आणि कारणांचे निवेदन हे अन्वयार्थ लावण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. विधीमंडळाने व्यक्त केलेली त्रिसूत्री म्हणजे निष्पक्ष सुनावणी, जलद तपास आणि खटल्याची सुनावणी आणि

समाजातील गरीब घटकांच्या हितांचे रक्षण करणारी तर्कसंगत प्रक्रिया निश्चित करणे, लक्षात घेऊन कलम १६७ (२) चा अर्थ लावावा लागेल. हे उद्देश म्हणजे अनुच्छेद २१ अन्वये हमी दिलेल्या मूलभूत अधिकाराचे उपघटक आहेत.

१७.११ त्यामुळे अनुच्छेद २१ अन्वये जीवित आणि व्यक्तीस्वातंत्र्याचा मूलभूत हक्क अबाधित ठेवण्याच्या दृष्टिकोनातूनच, सध्याच्या प्रकरणात निर्माण झालेला पेच सोडविण्याच्या हेतूने आम्ही कलम १६७ (२) च्या विविध न्यायालयीन व्याख्या स्पष्ट करून त्यांचा मेळ घालू."

३५. या तरतुदीतून मिळणाऱ्या अधिकाराचा परिणाम म्हणून, न्यायालयांना त्याचा योग्य तो परिणाम दयावा लागेल आणि अशा प्रकारे, या कालावधीपलीकडे केलेली स्थानबद्धता निश्चितपणे बेकायदेशीर ठरेल, कारण त्यामुळे संबंधित व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा उपमर्द होईल. त्यामुळे आरोपीला कलम १६७ (२) चा लाभ मिळेल, हे पाहणे तपास यंत्रणेचेच नव्हे, तर न्यायालयांचेही कर्तव्य आहे.

<u>संहितेचे कलम १७०</u> :

१७०. जेव्हा पुरावा पुरेसा असेल तेव्हा दंडाधिकाऱ्यांकडे

पाठवावयाची प्रकरणे — (१) जर पूर्वोक्त असा पुरेसा पुरावा किंवा वाजवी आधार आहे असे या प्रकरणाखालील अन्वेषणान्ती पोलिस ठाण्याच्या अंमलदार अधिकाऱ्याला दिसून आले तर असा अधिकारी बंदोबस्तानिशी आरोपीला पोलिस अहवालावरून अपराधाची दखल घेण्याची व आरोपीची संपरीक्षा करण्याची किंवा त्याला संपरीक्षेसाठी पाठवण्याची शक्ती प्रदान झालेल्या दंडाधिकाऱ्याकडे पाठविल अथवा जर अपराध जामिनपात्र असेल व आरोपी जामीन देण्यास समर्थ असेल तर, दंडाधिकारी त्याच्याकडून, निश्चित केलेल्या दिवशी अशा दंडाधिकाऱ्यापुढे त्याने उपस्थित होण्यासाठी व अन्य निदेश दिला जाईपर्यंत अशा दंडाधिकाऱ्यापुढे त्याने रोजच्या रोज समक्ष हजर राहण्यासाठी जामीन घेईल."

३६. **सिद्धार्थ विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य,** (२०२१) १ एससीसी ६७६ या प्रकरणामध्ये या न्यायालयाने कलम १७० ची व्याप्तीचा आणि कक्षेचा यापूर्वीच परामर्श घेतला आहे. संबंधित यंत्रणेने तपास पूर्ण केल्यानंतर न्यायालयाने हा अधिकार वापरणे आवश्यक आहे. त्यामुळे फक्त न्यायालयाच्या दृष्टिकोनातून हे प्रक्रियात्मक पालन आहे आणि त्यामुळे तपास यंत्रणेला मर्यादित भूमिका मिळाली आहे. ज्या प्रकरणात अभियोग पक्षाला आरोपीच्या कोठडीची गरज नसते, अशा प्रकरणात संहितेच्या

कलम १७० अन्वये दंडाधिकाऱ्यांकडे खटला पाठवल्यास, अटकेची गरज नसते. जामीन अर्ज दाखल करण्याचीही गरज नाही, कारण आरोपीला केवळ आरोप निश्चितीसाठी आणि खटल्यासाठी आदेशिका जारी करण्यासाठी न्यायालयात पाठवले जाते. जर न्यायालयाचे असे मत असेल की कोणत्याही रिमांडची आवश्यकता नाही, तर न्यायालय पुन्हा संहितेच्या कलम ८८ चा आधार घेऊ शकते आणि खटला सुरू करण्यासाठी आरोपीची उपस्थिती सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक औपचारिकता पूर्ण करू शकते. अर्थात, हवालातीत करण्याची गरज असेल, अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते आणि केवळ अशा प्रकरणांमध्येच आरोपींची बाजू ऐकून घ्यावी लागेल. त्यामुळे अशा परिस्थितीत हवालातीत करण्याची गरज असल्याचे न्यायालयाचे प्रथमदर्शनी मत असल्यास आरोपींना संधी द्यावी लागेल. आम्ही असे स्पष्ट करतो की, ज्या प्रकरणांमध्ये आरोपी आधीच कोठडीत आहेत आणि ज्यासाठी जामीन अर्जावर त्यांच्या गुणवत्तेनुसार निर्णय घ्यावा लागेल, अशा प्रकरणांबाबतीत आम्ही काहीही भाष्य केलेले नाही. संहितेच्या कलम १७० चे योग्य पालन करण्यासाठी जामीन अर्ज दाखल करण्याची आवश्यकता नाही, असे नमूद करणे पुरेसे आहे. **सिद्धार्थ विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य,** (२०२१) १ एससीसी ६७६ या प्रकरणामध्ये या न्यायालयाने असे म्हटले आहे की,

> "जरी दिल्ली उच्च न्यायालयाच्या वरील तरतुदीच्या विवेचनाबाबत न्यायालयीन दाखले उपलब्ध आहेत.

५. *दिल्ली उच्च न्यायालय* वि. *सीबीआय* [दिल्ली उच्च न्यायालय विरुद्ध सीबीआय, २००४ एससीसी ऑनलाइन डेल ५३ : (२००४) ७२ डीआरजे ६२९] या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने उत्तरवादीच्या युक्तिवादासारखाच युक्तिवाद हाताळला की, फौ. प्र. सं. चे कलम १७० आरोपीला ताब्यात घेतल्याशिवाय न्यायचौकशी न्यायालयाला आरोपपत्र अभिलेखावर घेण्यास प्रतिबंधित करते. संबंधित उतारे खालीलप्रमाणे आहेत : (एससीसी) ऑनलाइन दिल्ली परि. १५-१६ आणि १९-२०)

"१५. या कलमात असलेला 'कोठडी' या शब्दाचा अर्थ पोलिस किंवा न्यायालयीन कोठडी या अर्थाने योजलेला नाही. त्याचा लक्षितार्थ केवळ असा आहे की, आरोपपत्र दाखल करताना तपास अधिकाऱ्याने न्यायालयासमोर आरोपीला सादर केल्यावर न्यायालयाची भूमिका सुरू होते. जर तसे नसते तर आरोपीविरुद्ध खटला चालविण्यासाठी पुरेसे पुरावे असल्याचे आढळल्यानंतर जामीनपात्र गुन्ह्यात आरोपीस जामिनावर सोडण्याचे अधिकार तपासी अधिकाऱ्याला मिळाले नसते आणि अशा आरोपीची न्यायालयाने जामिनावरसुटका करण्यासाठी दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करणे त्याच्यावर बंधनकारक ठरले असते.

१६. आरोपी तपासात सहकार्य करीत असल्याने आणि त्याला अटक न करता तपास पूर्ण होऊ शकतो आणि म्हणून आरोपी फरार होणार नाही किंवा समन्सचे पालन करणार नाही या कारणास्तव जर आरोपीस कोठडीत ठेवणे अनावश्यक वाटले, तर अशा आरोपिस कोठडीतून हजर करणे तपासी अधिकार्यावर बंधनकारक नाही.

xxx xxx xxx

१९. असे दिसते की, तपासाकरिता जरी आवश्यक नसले तरी, प्रत्येक अजामीनपात्र आणि दखलपात्र गुन्ह्यात पोलिसांनी न चुकता एखाद्या व्यक्तीला अटक करणे आवश्यक आहे, या चुकीच्या समजुतीखाली विद्वान विशेष न्यायाधीश काम करत होते.

२०. किंबहुना कायदा याउलट आहे. सामान्य आणि सर्वसाधारण परिस्थितीत, जर एखाद्या व्यक्तीला अटक न करता तपास पूर्ण करणे पोलिसांना शक्य असेल आणि तपास पूर्ण करण्यासाठी आरोपी तपासी अधिकाऱ्यास सर्वतोपरी सहकार्य करीत असेल, तर पोलिसांनी त्या व्यक्तीला अटक करणे आणि

त्याला तुरुंगात पाठविणे नेहमीच टाळले पाहिजे. अत्यंत गरजेच्या प्रकरणांमध्ये, जिथे त्या व्यक्तीला अटक केल्याशिवाय तपास पूर्ण होऊ शकत नाही, उदाहरणार्थ, जेव्हा गुन्ह्याशी संबंधित वस्तू किंवा गुन्ह्याचे शस्त्र जप्त करण्यासाठी किंवा त्याच्या साथीदारांबद्दल किंवा कोणत्याही परिस्थितीजन्य पुराव्याबद्दल काही माहिती किंवा सुगावा मिळविण्यासाठी एखाद्या व्यक्तीची आवश्यकता असेल, तेव्हा त्याला अटक करणे आवश्यक असेल. गुन्ह्याच्या तीव्र आणि गंभीर स्वरूपामुळे आरोपीस उपस्थित करणे अवघड जाईल, असे जर संबंधित तपास अधिकारी किंवा पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला वाटत असेल तरीसुद्धा अशा प्रकारची अटक करणे आवश्यक ठरू शकते, कारण तो फरार होण्याची किंवा आदेशिकेचे पालन न करण्याची किंवा न्यायापासून पळून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही."

६. दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने *दिल्ली उच्च न्यायालय वि. राज्य* [दिल्ली उच्च न्यायालय विरुद्ध राज्य, २०१८ एससीसी ऑनलाइन दिल्ली १२३०६ : (२०१८) २५४ डीएलटी ६४१] या प्रकरणामध्ये दिल्ली उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने नंतर दिलेल्या

न्यायनिर्णयामध्ये दिल्ली उच्च न्यायालयाने दिल्ली उच्च न्यायालय (दिल्ली उच्च न्यायालय वि. सीबीआय, २००४ एससीसी ऑनलाइन दिल्ली ५३: (२००४) ७२ डिआरजे ६२९] या प्रकरणात नोंदविलेल्या या निरीक्षणांवर भिस्त ठेवली आणि असे निरीक्षण नोंदविले की, दखलपात्र आणि आजामीनपात्र गुन्हा असलेल्या प्रत्येक प्रकरणात, जेव्हा आरोपपत्र /अंतिम अहवाल दाखल केल्यावर, आरोपीला ताब्यात घेणे आवश्यक नाही.

७. असा दृष्टिकोन स्वीकारणारे दिल्ली उच्च न्यायालय एकमेव नाही आणि इतर उच्च न्यायालयांनीही, आरोपीला अटक करून न्यायालयात हजर केले नाही केवळ या कारणासाठी फौजदारी न्यायालये आरोपपत्र स्वीकारण्यास नकार देऊ शकत नाहीत, या विधानाचे अनुसरण केले आहे.

८. *दीनदयाल किशनचंद* वि. *गुजरात राज्य* [दीनदायाल किशनचंद वि. गुजरात राज्य, १९८२ एससीसी ऑनलाइन गुज १७२ : १९८३ फौ. एलजे १५८३] या प्रकरणात उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवले : (एससीसी ऑनलाइन गुज. परि. २ आणि ८.)

> "२. ... अभियोग पक्षाचे प्रकरण असे होते की, दोन आरोपी म्हणजेच आताचे याचिकाकर्ते ४

आणि ५, ज्या महिला आहेत, त्यांची जरी यापूर्वी जामिनावर सुटका झाली होती, तरी त्या आरोपपत्रासह न्यायालयात हजर करण्यासाठी उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे सर्व आरोपींना हजर केल्याशिवाय आरोपपत्र स्वीकारण्यास न्यायालयाने नकार दिला आणि म्हणून आरोपपत्र सादर करता आले नाही आणि अखेरीस, विशिष्ट पत्राद्वारेही आरोपी क्रमांक ४ व ५ यांच्या अनुपस्थितीत आरोपपत्र सादर केले असे अभिलेखावरून दिसते. अभिलेखावरील पुराव्यांवरून हे खूप स्पष्ट होत आहे.

xxx xxx xxx

८. या टप्प्यावर मी हे सांगितले पाहिजे की, विद्वान दंडाधिकाऱ्यांनी किंवा त्यांच्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांमार्फत, आरोपी व्यक्तींना हजर न करता, आरोपपत्र स्वीकारण्यास नकार देणे ही बाब कायद्याच्या कोणत्याही तरतुदींनुसार समर्थनीय नाही.

त्यामुळे जेव्हा जेव्हा पोलीस आरोपपत्र सादर करतात, तेव्हा दंडाधिकाऱ्यांनी किंवा कर्मचाऱ्यांनी आरोपपत्रात कोणतीही त्रुटी किंवा आवश्यकता असल्याबाबत आरोपपत्रावर पृष्ठांकन करून ते स्वीकारावे, असे सर्व न्यायालयांना सूचित केले पाहिजे. परंतु जेव्हा पोलिस आरोपपत्र सादर करतात, तेव्हा विशेषत: संहितेच्या कलम ४६८ मधील तरतुदी, ज्या गुन्ह्याची दखल घेण्यास मर्यादा निर्माण करतात, त्या लक्षात घेता, ते स्वीकारणे हे न्यायालयाचे कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे जर अशा कोणत्याही कारणास्तव आरोपपत्र स्वीकारले गेले नाही, तर या तथ्यांकडे सत्र न्यायाधीशांचे लक्ष वेधून योग्य ते आदेश मिळवावेत, असे पोलीस यंत्रणांनी सर्व पोलिस अधिकाऱ्यांवर काटेकोरपणे बिंबवले पाहिजे, जेणेकरून यापुढे अशा अडचणी उद्भवणार नाहीत.

९. उच्च न्यायालयांच्या वरील मताशी आम्ही सहमत आहोत आणि या न्यायालयीन दृष्टिकोनाला आमची संमती देऊ इच्छितो. फौ. प्र. सं. च्या कलम १७० चा विचार करता, आरोपपत्र दाखल करताना प्रभारी अधिकाऱ्याने प्रत्येक आरोपीला अटक करणे बंधनकारक नाही असे योग्यरीत्या निरीक्षण त्यात नोंदविण्यात आले आहे. प्रत्यक्षात, आमच्यासमोर अशी प्रकरणे आली आहेत, जेथे आरोपीने तपासात संपूर्ण सहकार्य केले आहे आणि तरीही, आरोपीस अटक करून न्यायालयासमोर हजर करणे बंधनकारक आहे अशी आवश्यकता प्रतिपादन करून, आरोपपत्र दाखल करताना त्याला हजर करण्यासाठी आजामीनपात्र वॉरंट जारी करण्यात आले आहे. आमचे असे मत आहे की, जर तपासी अधिकाऱ्याला विश्वास नसेल की आरोपी फरार होईल किंवा समन्सचे पालन करणार नाही, तर त्याला कोठडीतून हजर करण्याची आवश्यकता नाही. फौ. प्र. सं. च्या कलम १७० मधील 'कोठडी' या शब्दाचा लक्षितार्थ पोलिस किंवा न्यायालयीन कोठडी असा नाही, तर त्यात केवळ आरोपपत्र दाखल करताना तपासी अधिकाऱ्याने आरोपीला हजर करण्याचा उल्लेख आहे.

१०. वैयक्तिक स्वातंत्र्य हा आपल्या घटनात्मक जनादेशाचा एक

महत्त्वाचा पैलू आहे हे आम्ही लक्षात घेऊ शकतो. तपासादरम्यान आरोपीला अटक करण्याचा प्रसंग तेव्हा येतो, जेव्हा कोठडीत तपास करणे आवश्यक होते किंवा तो एक गर्हणीय गुन्हा असतो किंवा जिथे साक्षीदारांवर प्रभाव पडण्याची शक्यता असते किंवा आरोपी फरार होऊ शकतो. अटक कायदेशीर आहे म्हणून ती केली जाऊ शकते केवळ या कारणाकरिता अटक करणे बंधनकारक नाही. अटकेच्या अधिकाराचे अस्तित्व आणि त्याचा वापर करण्याचे समर्थन यात फरक केला पाहिजे [जोगिंदर कुमार विरुद्ध उत्तर प्रदेश राज्य, (१९९४) ४ एससीसी २६० : १९९४ एससीसी (फौ.) ११७२] . जर अटक हा नित्यक्रम झाला तर त्यामुळे एखाद्या व्यक्तीच्या प्रतिष्ठेला आणि आत्मसन्मानाला अपरिमित हानी पोहोचू शकते. जर आरोपी पळून जाईल किंवा समन्सचे पालन करणार नाही असे तपास अधिकाऱ्याला मानण्याचे कोणतेही कारण नसेल आणि प्रत्यक्षात त्याने तपासामध्ये पूर्ण सहकार्य केले असेल, तर आरोपीला अटक करण्याची सक्ती अधिकाऱ्यावर का असावी हे आम्हांला समजत नाही.

११. प्रत्यक्षात आमच्यासमोर अशी परिस्थिती आली की, जिथे

जोगिंदर कुमार [*जोगिंदर कुमार* विरुद्ध *उत्तर प्रदेश राज्य*, (१९९४) ४ एससीसी २६० : १९९४ एससीसी (फौ.) ११७२] या प्रकरणात नोंदविलेल्या निरीक्षणांच्या विरुद्ध परिस्थिती होती. एखाद्या पोलिस अधिकाऱ्याला अटकेच्या परिस्थितीला कसे हाताळावे लागते, फौ. प्र. सं. च्या कलम १७० च्या तरतुदींनुसार आरोपपत्र अभिलेखावर येण्याची पूर्वअट म्हणून कनिष्ठ न्यायालये आरोपीच्या अटकेचा आग्रह धरत असल्याचे सांगितले जाते. आम्ही अशा प्रकारचा मार्ग चुकीचा आणि फौ. प्र. सं. च्या कलम १७० च्या मूळ हेतूच्या विरुद्ध आहे असे मानतो."

संहितेचे कलम २०४ आणि २०९

"**२०४ आदेशिका काढणे** — (१) जर अपराधाची दखल घेणाऱ्या दंडाधिकाऱ्यांच्या मते पुढील कार्यवाही करण्यास पुरेसे कारण असेल आणि तो खटला -

(क) समन्स-खटला असल्याचे दिसत असेल तर, तो आरोपीच्या समक्ष हजेरीसाठी आपले समन्स काढील; किंवा

(ख) वॉरंट-खटला असल्याचे दिसत असेल तर, अशा

दंडाधिकाऱ्यापुढे किंवा (त्याला स्वतःला अधिकारिता नसल्यास) अधिकारिता असलेल्या अन्य एखाद्या दंडाधिकाऱ्यापुढे विवक्षित वेळी आरोपीला आणविण्यासाठी तो एक वॉरंट किंवा आपणांस योग्य वाटल्यास, त्याला तेथे उपस्थित व्हावयास लावण्यासाठी एक समन्स काढू शकेल."

"२०९. जेव्हा अपराध केवळ सत्र न्यायालयानेच संपरीक्षा करण्याजोगा असेल तेव्हा त्याच्याकडे तो खटला सुपूर्द करणे. — पोलीस अहवालावरून किंवा अन्य प्रकारे गुदरलेल्या खटल्यात जेव्हा आरोपी दंडाधिकाऱ्यासमोर उपस्थित होईल किंवा तो अपराध केवळ सत्र न्यायालयानेच संपरीक्षा करण्याजोगा आहे असे दंडाधिकाऱ्याला दिसून येईल तेव्हा, तो -

[(क) कलम २०७ च्या किंवा, प्रकरणपरत्वे, २०८ च्या उपबंधाचे अनुपालन केल्यानंतर सत्र न्यायालयाकडे तो खटला सुपूर्त करील व या संहितेमधील, जामिनासंबंधीच्या उपबंधाच्या अधीनतेने अशी सुपूर्दगी करण्यात येईपर्यंत आरोपीला हवालातीत परत पाठवील;]

(ख) या संहितेतील जामिनासंबंधीच्या उपबंधाच्या अधीनतेने संपरीक्षा चालू असताना आणि ती संपेपर्यंत आरोपीला हवालातीत परत पाठवील;"

३७. संहितेच्या कलम २०४ मध्ये दंडाधिकाऱ्यांसमोर कार्यवाही सुरू करताना आदेशिका जारी करण्याबाबत मुद्दा मांडण्यात आला आहे. पोट-कलम (१) (ख) नुसार वॉरंट किंवा समन्स बजावण्याचा स्वेच्छाधिकार दंडाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. या तरतुदीनुसार स्वेच्छानिर्णय दिला असल्याने आणि तो प्रक्रियात्मक स्वरूपाचा असल्याने नेहमी संहितेच्या कलम ८८ च्या विहीतकाचे पालन करून त्याचा वापर करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे, वॉरंट काढणे अपवादात्मक असेल, ज्यात दंडाधिकाऱ्यांना कारणे द्यावी लागतील.

३८. संहितेचे कलम २०९ हे, जेव्हा गुन्हा केवळ सत्र न्यायालयानेच न्यायचौकशी करण्यायोग्य असेल, तेव्हा दंडाधिकाऱ्याने प्रकरण सत्र न्यायालयाकडे वर्ग करण्याशी संबंधित आहे. संहितेच्या कलम २०९ च्या पोट-कलम (क) आणि (ख) नुसार, न्यायचौकशी सुरू असताना किंवा ती पूर्ण होईपर्यंत एखाद्या व्यक्तीला कोठडीत ठेवण्याचे व्यापक अधिकार दंडाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. दंडाधिकाऱ्यांनी या अधिकाराचा वापर प्रकरणपरत्वे करावयाचा असल्याने आरोपीला हवालातीत करणे किंवा जामीन देणे हे त्यांच्या समंजसपणावर अवलंबून आहे. इथेही

दंडाधिकाऱ्यांनी न्याय विवेकाचा वापर करणे आवश्यक आहे. जामिनाच्या व्याख्येचा आम्ही याआधीच परामर्ष घेतला आहे, ज्याचा सोप्या भाषेत अर्थ निर्बंध आणि अटींच्या अधीन राहून सुटका असा होतो. जर दंडाधिकाऱ्याचा तसा कल असेल तर, जामिनासाठी अर्ज न करताही ते निर्णय घेऊ शकतात. अशा परिस्थितीत ते बंधपत्राची किंवा जामीनदाराची मागणी करू शकतात आणि अशा प्रकारे कलम ८८ चा आधार घेऊ शकतील. मात्र, जर कारणे नोंदवून त्यांना प्रकरण हवालातीत करायचे असेल तर, संबंधित व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. येथे पुन्हा एकदा आम्ही हे स्पष्ट करतो की, स्वतंत्र अर्जाची आवश्यकता नाही आणि दंडाधिकाऱ्यांना संधी देणे आवश्यक आहे आणि जामिनावर सुटका करण्याचा वाजवी आदेश पारित करणे आवश्यक आहे.

संहितेचे कलम ३०९

३९. अधिनियम २०१३ चा क्र. १३ आणि अधिनियम २०१८ चा क्र. २२ नुसार ही तरतूद बदलण्यात आली आहे. अधिक चांगले आकलन होण्यासाठी वरील तरतूद उद्धृत करणे योग्य ठरेल:

> **३०९. कार्यवाही पुढे ढकलण्याची किंवा तहकूब करण्याची शक्ती.** - (१) प्रत्येक चौकशी वा न्यायचौकशीत न्यायालयात नोंदवायच्या कारणासाठी दररोजची कार्यवाही पुढच्या दिवसानंतर

संस्थगित करणे आवश्यक असल्याचे आढळून आल्याशिवाय, उपस्थित असलेल्या सर्व साक्षीदारांची दररोज तपासणी करण्यात येईपर्यंत कार्यवाही नियमितपणे चालवण्यात येईल.

पण जेव्हा चौकशी वा न्यायचौकशी भारतीय दंड संहितेच्या (१८६० चा ४५) कलम ३७६, ३७६-अ, ३७६-ब, ३७६-क, ३७६-ड खालील अपराधाशी संबंधित असेल तेव्हा उपरोक्त चौकशी शक्यतो दोषारोपपत्र दाखल केल्यापासून दोन महिन्यात पूर्ण करण्यात येईल.

(२) अपराधाची दखल घेतल्यानंतर, किंवा संपरीक्षा सुरू झाल्यानंतर कोणत्याही चौकशीची सुरुवात पुढे ढकलणे किंवा संपरीक्षा तहकूब करणे काही कारणास्तव आवश्यक किंवा उचित असल्याचे न्यायालयाला दिसून आले तर , कारणे नमूद करून ते वेळोवेळी त्याला योग्य वाटतील अशा अटींवर, त्याला वाजवी वाटेल अशा अवधीकरिता, तो पुढे ढकलू शकेल किंवा तहकूब करू शकेल, आणि आरोपी हवालातीत असेल तर, त्याला वॉरंटाद्वारे तेथे परत पाठवले जाईल;

परंतु, कोणताही दंडाधिकारी या कलमाखाली आरोपी

व्यक्तीला एकावेळी पंधरा दिवसांहून अधिक अवधीकरिता अहवालातीत परत पाठवणार नाही;

परंतु आणखी असे की, साक्षीदार हजर असतील तेव्हा, त्यांनी तपासल्याशिवाय चौकशी किंवा संपरीक्षा तहकूब करण्यास किंवा पुढे ढकलण्यास मान्यता दिली जाणार नाही - मात्र विशेष कारणास्तव तसे न केल्यास कारणे नमूद करावे लागतील;

[परंतु आणखी असे की, आरोपी व्यक्तीला देण्याचे योजलेल्या शिक्षेविरुद्ध कारण दाखवणे तिला शक्य व्हावे एवढ्याच केवळ प्रयोजनासाठी संपरीक्षा किंवा चौकशी तहकूब करण्यास मान्यता दिली जाणार नाही.]

परंतु तसेच-

(अ) जेव्हा परिस्थिती त्या पक्षकाराच्या नियंत्रणाबाहेर असेल त्याखेरीज, पक्षकाराच्या विनंतीवरून कोणतीही तहकुबी दिली जाणार नाही.

(ब) एखाद्या पक्षकाराचा वकील दुसऱ्या न्यायालयाच्या कामात गुंतलेला आहे ही

वस्तुस्थिती, तहकुबीचे कारण असणार नाही.

(क) जेव्हा साक्षीदार न्यायालयात उपस्थित असेल, परंतु पक्षकार किंवा त्याचा वकील उपस्थित नसेल अथवा पक्षकार किंवा त्याचा वकील न्यायालयात उपस्थित असला तरी, ते साक्षीदारांची तपासणी किंवा उलटतपासणी करण्यास तयार नसतील तर, न्यायालय त्याला जर तसे योग्य वाटल्यास, साक्षीदारांचे जबाब नोंदवून घेऊ शकेल आणि परत तपासणी किंवा यथास्थिती उलटतपासणीशिवाय भागवून, त्याला योग्य वाटेल असा आदेश संमत करू शकेल.

स्पष्टीकरण १ - आरोपीने अपराध केला असावा अशा संशय घेण्यास पुरेसा पुरावा मिळालेला असेल आणि हवालातीत परत पाठवण्याने आणखी पुरावा मिळण्याचा संभव आहे असे दिसत असेल तर, हवालातीत परत पाठवण्यास ते वाजवी कारण होऊ शकेल.

स्पष्टीकरण २. - याप्रमाणे चौकशी किंवा संपरीक्षा तहकूब करण्यास किंवा पुढे ढकलण्यास ज्या अटींवर मान्यता दिली जाईल त्यांमध्ये, योग्य प्रसंगी फिर्यादी पक्षाने किंवा आरोपीने खर्च देण्याच्या अटीचा समावेश आहे.

४०. पोट-कलम (१) नुसार साक्षीपुरावे पूर्ण होईपर्यंत न्यायालयांनी दैनंदिन कार्यवाही सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे एकदा न्यायचौकशी सुरू झाली की ती तार्किक निष्कर्षापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. अनावश्यक तहकुबी, ज्यामुळे साक्षीदारांचे मन वळविता येते, त्या देण्यात येऊ नये याकरिता या न्यायलयाने विविध निर्देश दिले आहेत. मात्र, कलम ३०९ चे पालन न केल्याने हा प्रकार निष्काळजीपणे सुरूच आहे. यासाठी कदाचित केवळ न्यायालयांना दोष देता येणार नाही, कारण अशा तहकुबी साठी कारणीभूत ठरणारी अनेक कारणे आहेत. जरी या कलमानुसार तहकुबी देण्यात आल्या आणि तीही अपवाद म्हणून दीर्घ काळासाठी नसली तरी त्या प्रमाण बनतात. न्यायालय किंवा अभियोग पक्षाकडून होणारा विलंब निश्चितपणे अनुच्छेद २१ चे उल्लंघन करेल हे दर्शविण्यासाठीच आम्ही या तरतुदीचा उल्लेख करीत आहोत. जेव्हा आरोपी व्यक्ती तुरुंगात असते तेव्हा हे अधिक घडते. जामिनाचा अर्ज विचारात घेताना आरोपींच्या फायद्यासाठी ही तरतूद लागू केली पाहिजे. गुन्ह्याचे स्वरूप काहीही असले, तरी कोठडीत किंवा तुरुंगात असलेल्या आरोपीविरुद्ध किंवा अपराध्याविरुद्ध चालणारी प्रदीर्घ न्यायचौकशी,

अपील किंवा पुनरीक्षण हे अनुच्छेद २१ चे उल्लंघन ठरेल. या न्यायालयाने काही प्रसंगी सांगितल्याप्रमाणे, कमीतकमी खाजगी साक्षीदारांची साक्ष नोंदवून पूर्ण करण्याचे प्रयत्न न्यायालयांना करावे लागणार असले तरी,   आरोपीची स्वतःची कोणतीही चूक नसताना होणाऱ्या विलंबामुळे आरोपीस त्रास होणार नाही, याची न्यायालयांनी खात्री करावी.

४१. पोट-कलम (२) हे पोट-कलम (१) सह वाचणे आवश्यक आहे. पोट-कलम (२) च्या परंतुकानुसार एका वेळेस हवालातीत पाठविण्याचा कालावधी जास्तीत जास्त १५ दिवसांइतका आहे, तर दुसऱ्या परंतुकानुसार साक्षीदार हजर असतील तेव्हा, न्यायचौकशी तहकूब करण्यास मान्यता दिली जाणार नाही, अपवाद केवळ विशेष कारणास्तव, ज्याकरीत कारणे नमूद करावी लागतील. तहकुबी मागण्याची काही कारणे ग्राह्य धरली जातात. न्यायदानाच्या दृष्टिकोनातून ही तरतूद वाचली पाहिजे. शेवटी, निष्पक्ष आणि जलद सुनावणीचा अधिकार हा अनुच्छेद २१ चा आणखी एक पैलू आहे. त्यामुळे न्यायालयाने संहितेच्या कलम ३०९ चे शक्य तितके पालन करणे अपेक्षित असले, तरी न्यायचौकशी, अपील किंवा पुनरीक्षण पूर्ण करण्यासाठी होणारा संदिग्ध, टाळता येण्याजोगा आणि प्रदीर्घ विलंब हा जामिनासाठी विचारात घेण्याचा निश्चितच एक घटक ठरेल. संहितेच्या कलम ४३६ अ अन्वये लाभदायी तरतुद असूनही आम्ही त्यास वेगळ्या स्थानी मानतो.

<u>पूर्वोदाहरणे :</u>

*** हुसैनआरा खातून आणि इतर वि. गृह सचिव, बिहार राज्य,** १९८० (१) एससीसी ८१:

२. जरी आम्ही बिहार राज्याला दोन आठवड्यांपूर्वी नोटीस बजावली असली, तरी दिनांक ५ फेब्रुवारी १९७९ रोजी राज्याच्या वतीने कोणीही हजर झाले नाही ही दुर्दैवी बाब आहे आणि म्हणूनच या टप्प्यावर, दिनांक ८ आणि ९ जानेवारी, १९७९ रोजीच्या इंडियन एक्सप्रेस च्या अंकात असेलेले आणि रिट याचिकेत समाविष्ट असलेले आरोप बरोबर आहेत, या आधारे आम्ही पुढे गेले पाहिजे. या वृत्तपत्राच्या कात्रणांमध्ये असलेली माहिती अत्यंत क्लेशदायक असून, सामाजिक हेतूने प्रेरित असलेल्या कोणत्याही वकीलाची किंवा न्यायाधीशाची सदसद्विवेकबुद्धी जागृत करण्यासाठी आणि मनःशांती भंग करण्यासाठी पुरेशी आहे. वृत्तपत्रातील कात्रणांमध्ये ज्या न्यायचौकशी अधीन कैद्यांची नावे देण्यात आली आहेत, त्यापैकी काही कैदी न्यायचौकशी सुरू न होता, तब्बल ५, ७ किंवा ९ वर्षे तुरुंगात आहेत, तर काही १० वर्षांहून अधिक काळ तुरुंगात आहेत. ज्या न्यायव्यवस्थेमध्ये इतकी वर्षे साधी न्यायचौकशी नाकारली जाते आणि ते दोषी आहेत म्हणून नव्हे तर जामीन न परवडण्याइतपत गरीब आहेत म्हणून त्यांना तुरुंगात ठेवले जाते, त्या न्यायव्यवस्थेवर या हरलेल्या आत्म्यांना कसा विश्वास असेल? ही न्यायाची विडंबना

आहे की, अनेक गरीब आरोपींना, "छोट्या भारतीयांना, छोट्या-छोट्या गुन्ह्यांसाठी दीर्घ काळ तुरुंगातील गुलामगिरीत ढकलले जाते" कारण जामीन प्रक्रिया त्यांच्या तुटपुंज्या साधनांच्या पलीकडे असते आणि न्यायचौकशी सुरू होत नाही आणि जरी ती सुरू झाली तरी ती कधीच संपत नाही. मनेका गांधी विरुद्ध केंद्र सरकार *भारत सरकार* [(१९७८) २ एससीआर ६२१ : (१९७८) १ एससीसी २४८] या प्रकरणात या न्यायालयाने अनुच्छेद २१ केलेलल्या वैशिष्ट्यपूर्ण गतिमान विवेचनानंतर यात काही शंका नाही की, एवढ्या मोठ्या संख्येने लोकांना खटल्याविना तुरुंगात डांबून ठेवणारी प्रक्रिया त्या अनुच्छेदाच्या आवश्यकतेनुसार शक्यतो 'वाजवी, न्याय्य किंवा निष्पक्ष' मानली जाऊ शकत नाही. म्हणूनच विधिमंडळाने बनवलेल्या आणि न्यायालये अंमलबजावणी करीत असलेल्या कायद्यातील न्यायचौकशीपूर्व स्थानबद्धतेबाबतच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे आणि मनेका गांधी [(१९७८) २ एससीआर ६२१ : (१९७८) १ एससीसी २४८] या प्रकरणानंतर सर्जनशील सूचित अर्थ असलेली 'वाजवी, न्याय्य आणि निष्पक्ष' प्रक्रिया सुनिश्चित करणे आवश्यक आहे .

३. आता, गरिबांना वर्षानुवर्षे न्यायचौकशीपूर्व स्थानबद्ध करून त्यांना न्याय देण्यास आपली कायदेविषयक व न्यायव्यवस्था सातत्याने नकार का देते याचे एक कारण म्हणजे आपली अत्यंत असमाधानकारक जामीन पद्धती. आर्थिक नुकसानीची जोखीम हाच न्यायापासून पळून जाण्याविरुद्ध एकमेव अडथळा आहे, या चुकीच्या गृहीतकावर चालणाऱ्या मालमत्ताप्रधान दृष्टिकोनातून ती ग्रासलेली दिसते. फौजदारी प्रक्रिया संहिता पुन्हा लागू झाल्यानंतरही, तिने मागील शतकाच्या अखेरीस लागू करण्यात आलेल्या पूर्वीच्या संहितेप्रमाणेच जुनाट दृष्टिकोन अवलंबला आहे आणि जेथे एखाद्या आरोपीची त्याच्या वैयक्तिक बंधपत्रावर सुटका करणे आवश्यक आहे, तेथे या बंधपत्रामध्ये आरोपी न्यायचौकशीस हजर न राहिल्यास त्याने काही रक्कम भरण्याची आर्थिक सक्ती असणे आवश्यक आहे, असा आग्रह धरते. शिवाय, जणू हे गरिबांसाठी पुरेसे प्रतिबंधात्मक नाही म्हणून न्यायालये यांत्रिकपणे आणि नेहमीच असा आग्रह धरतात की, आरोपीने त्याच्यासाठी जामीन राहणारे जामीनदार सादर करावेत आणि आरोपी आरोपांचे उत्तर देण्यासाठी उपस्थित राहण्यास अपयशी ठरल्यास, जामिनाची रक्कम भरण्यासाठी त्या जामीनदारांनी सुद्धा पुनः त्यांची पतदारी सिद्ध केली पाहिजे.

जामीनाच्या या पद्धतीची गरिबांच्या विरोधात अत्यंत कठोरपणे कार्यवाही केली जाते आणि केवळ बिगर-गरीबच स्वत:ची जामिनावर सुटका करून घेण्यासाठी त्याचा फायदा घेऊ शकतात. गोरगरिबांना जामीनदाराविनासुद्धा जामीन भरणे अवघड जाते, कारण बऱ्याचदा न्यायालयांनी निश्चित केलेल्या जामिनाची रक्कम इतकी अवास्तवरीत्या जास्त असते की, बहुतेक प्रकरणांमध्ये गरीब लोक जामिनाच्या रकमेसाठी त्यांची पतदारी सिद्ध करण्यासाठी पोलिस किंवा दंडाधिकाऱ्यांचे समाधान करण्यास असमर्थ असतात आणि जेथे जामीनदारांसह जामीन दिला जातो, जे सामान्यत: घडते, तेथे गरिबांना जामीनदार म्हणून उभे राहण्यासाठी पुरेसे पतदार असलेले लोक शोधणे हे जवळजवळ अशक्य काम बनते. याचा परिणाम असा होतो की एकतर पोलिस आणि महसूल कर्मचाऱ्यांकडून किंवा दलाल आणि व्यावसायिक जामीनदारांकडून त्यांना लुबाडले जाते आणि कधीकधी त्यांची सुटका करण्यासाठी त्यांना कर्जही उभारावे लागते किंवा सुटका होऊ न शकल्याने, जोपर्यंत न्यायालय त्यांच्या प्रकरणांची न्यायचौकशी करीत नाही, तोपर्यंत त्यांना तुरुंगातच राहावे लागते आणि त्याचे पुढील गंभीर परिणाम होतात, उदा. (१) निरपराध मानले जात असले, तरी त्यांना तुरुंगातील जीवनाच्या

मानसिक आणि शारीरिक हानीला सामोरे जावे लागते, (२) त्यांना त्यांच्या बचावाच्या तयारीत हातभार लावण्यापासून रोखले जाते आणि (३) त्यांच्याकडे नोकरी असल्यास त्यांची नोकरी जाते आणि स्वत: ला आणि त्यांच्या कुटुंबियांना आधार देण्यासाठी काम करण्याच्या संधीपासून वंचित राहतात. परिणामी त्यांच्या स्थानबद्धतेचा भार जवळजवळ नेहमीच कुटुंबातील निरपराध सदस्यांवर पडतो. इथेच गरिबांना आपली कायदेशीर आणि न्यायव्यवस्था अन्यायकारक आणि त्यांच्याविरुद्ध प्रचंडरीत्या लादलेली वाटते आणि बिगर गरीबांशी ते असहाय्यपणे विषम स्थितीत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांच्यात वैफल्याची आणि हताशपणाची भावना निर्माण होते. आमच्यापैकी एक न्यायमूर्ती श्री. भगवती यांच्या अध्यक्षतेखाली गुजरात सरकारने नेमलेल्या विधी सहाय्य समितीने या ठळक विषमतेवर खालील शब्दांत भर दिला.

> आज आपल्याला दिसणारी फौजदारी न्यायालयांमध्ये प्रचलित असलेली जामीन व्यवस्था अत्यंत असमाधानकारक असून त्यात आमूलाग्र बदल करण्याची गरज आहे. प्रथमत: आरोपी हजर न होण्याच्या जोखमीचे अचूक आर्थिक शब्दात रूपांतर करणे वास्तविक अशक्य

आहे आणि आरोपीला पळून जाण्यापासून रोखण्यासाठी आर्थिक नुकसानीची जोखीम आवश्यक आहे हा मूलभूत आधारदेखील संशयास्पद आहे. असे अनेक विचार आहेत जे आरोपीला न्यायापासून दूर जाण्यापासून रोखतात आणि आर्थिक नुकसानीचा धोका हा त्यापैकी एक आहे आणि तोदेखील मुख्य नाही. मॅनहॅटन बेल प्रोजेक्ट आणि डीसी बेल प्रोजेक्ट सारख्या अमेरिकेतील प्रबुद्ध जामीन प्रकल्पांचा अनुभव असे दर्शवितो की, आर्थिक जामिनाशिवायदेखील बऱ्याच प्रकरणांमध्ये न्यायचौकशीच्यावेळी आरोपींची उपस्थिती मिळविणे शक्य झाले आहे. शिवाय, जामीन पद्धतीमुळे गरिबांशी भेदभाव केला जातो कारण गरीबांना त्यांच्या गरिबीमुळे जामीन भरता येत नाही, तर त्याउलट समान परिस्थितीतील श्रीमंत व्यक्तींना जामीन भरणे परवडत असल्याने, ते त्यांचे स्वातंत्र्य सुरक्षित मिळवू शकतात. जरी दंडाधिकाऱ्यांनी निश्चित केलेल्या जामिनाची रक्कम जास्त नसली तरी हा भेदभाव निर्माण होतो, कारण फौजदारी खटल्यांमध्ये न्यायालयात हजर केले जाणारे बहुसंख्य लोक इतके गरीब

असतात की त्यांना कमी रकमेचाही जामीन भरणे अवघड असते.

आरोपीची वैयक्तिक आर्थिक परिस्थिती आणि न्यायचौकशीपूर्वी तो पळून जाण्याची शक्यता यासारख्या संबंधित घटकांचा विचार न करता, आरोपाच्या स्वरूपानुसार जामिनाची रक्कम निश्चित करण्याची पद्धत कशी कठोर आणि अन्यायी आहे आणि त्यात गरिबांशी कसा भेदभाव केला जातो, याकडेही गुजरात समितीने लक्ष वेधले.

जामीन व्यवस्थेचे भेदभावपूर्ण स्वरूप, ते ज्या यांत्रिक पद्धतीने रूढिगत चालवले जाते, त्यामुळे अधिक तीव्र होते. तात्विकरीत्या जामिनाची रक्कम निश्चित करण्यासाठी दंडाधिकाऱ्यांना व्यापक स्वेच्छानिर्णय आहे यात काहीही शंका नाही, परंतु व्यवहारात असे दिसते की जामिनाची रक्कम जवळजवळ नेहमीच गुन्ह्याच्या गांभीर्यावर अवलंबून असते आणि ते आरोपाच्या स्वरूपाशी संबंधित वेळापत्रकानुसार निश्चित केले जाते. जर जामिनाचा हेतू आरोपीला खटल्यात हजर राहण्याची खात्री देणे असेल, तर न्यायचौकशीपूर्वी आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करेल या

शक्यतेला किंवा त्याच्या वैयक्तिक आर्थिक परिस्थितीला आणि सर्वात प्रासंगिक वाटणाऱ्या घटकांना फार कमी महत्त्व दिले जाते या बाबींकडे दुर्लक्ष करून आणि केवळ गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन यांत्रिकपणे जामिनाची रक्कम निश्चित करण्याचा परिणाम म्हणजे केवळ गुन्ह्याच्या गांभीर्यास अनुसरून जामीन भरण्याच्या क्षमतेच्या बाबतीत श्रीमंतांच्या समान स्थितीत नसलेल्या गरिबांशी भेदभाव करणे. श्रीमंत आणि गरीब यांच्या जामीन भरण्याच्या भिन्न क्षमतेकडे दुर्लक्ष करून आणि त्यांना समान वागणूक देऊन, न्यायालये श्रीमंत आणि गरीब यांच्यात असमानता निर्माण करतात: समान परिस्थितीत ज्या श्रीमंत व्यक्तीवर समान गुन्हा दाखल केला जातो, तो त्याची सुटका करून घेऊ शकतो तर गरीब त्याच्या गरिबीमुळे तसे करण्यास असमर्थ असतो. आज चालवल्या जाणाऱ्या जामीन व्यवस्थेतील हे काही मोठे दोष आहेत.

बेल रिफॉर्म्स अॅक्ट १९६६ वर स्वाक्षरी करताना राष्ट्राध्यक्ष लिंडन बी. जॉन्सन यांनी हीच व्यथा व्यक्त केली होती:

आज, आपण आपल्या फौजदारी न्यायप्रणालीतील एका

मोठया सुधारणेस मान्यता देण्यासाठी एकत्र आलो आहोत : ती म्हणजे जामीन प्रणालीतील सुधारणा.

सन १७८९ च्या न्यायपालिका कायद्यापासून ही व्यवस्था पुरातन, अन्यायकारक आणि वस्तुतः न अभ्यासलेली अशीच टिकून आहे.

आरोपीची अटकेनंतर सुटका झाल्यास तो खटल्यासाठी परत येईल याची खात्री करणे हा जामिनाचा मुख्य हेतू आहे.

सध्याच्या व्यवस्थेत हे उद्दिष्ट कसे साध्य होत आहे ? साधने असलेल्या प्रतिवादीला जामीन भरणे परवडते. त्याचे स्वातंत्र्य विकत घेणे त्याला परवडणारे आहे. पण गरीब प्रतिवादी त्याची किंमत देऊ शकत नाही. न्यायचौकशीच्या आठवडे, महिने आणि कदाचित कित्येक वर्षे आधीही तो तुरुंगात खितपत पडतो.

तो दोषी आहे म्हणून तो तुरुंगात राहत नाही.

कोणतीही शिक्षा झाली म्हणून तो तुरुंगात राहत नाही.

खटल्यापूर्वी तो पळून जाण्याची शक्यता असते म्हणून तो

तुरुंगात राहत नाही.

तो फक्त एका कारणासाठी तुरुंगात राहतो- कारण तो गरीब आहे....

आज कार्यरत असलेली जामीन व्यवस्था गरिबांसाठी प्रचंड त्रासदायक आहे आणि जर आपल्याला खरोखरच दारिद्र्याचे दुष्परिणाम दूर करायचे असतील आणि न्यायदानात गरिबांना निष्पक्ष आणि न्याय्य वागणूक द्यायची असेल तर, जामीन पद्धतीत आमूलाग्र सुधारणा होणे आवश्यक आहे, जेणेकरून श्रीमंतांइतकेच गरीबांना सहजपणे, न्यायाचे हित धोक्यात न घालता न्यायचौकशीपूर्व सुटका मिळविणे शक्य होईल.

४. आपल्या संसदेने हे लक्षात घेण्याची वेळ आली आहे की आर्थिक नुकसानीचा धोका हा न्यायापासून पळून जाण्यापासून एकमेव अडथळा नाही, तर पळून जाण्यापासून समान प्रतिबंधक म्हणून कार्य करणारे इतर घटक देखील आहेत. आपले प्रजासत्ताक समाजवादी प्रजासत्ताक आहे, ज्यात सामाजिक न्याय ही आपल्या राज्यघटनेची संकेत धून आहे आणि आर्थिक नुकसानीच्या जोखमीऐवजी कौटुंबिक संबंध, समाजातील मुळं,

नोकरीची सुरक्षितता, स्थिर संघटनेचे सदस्यत्व यांसारख्या इतर समर्पक बाबी जामीन देण्यासाठी निश्चित करणारे घटक असावेत हे आपल्या घटनेच्या संकल्पनेशी अधिक सुसंगत असणार नाही का याचा संसदेने विचार केला पाहिजे आणि योग्य प्रकरणांमध्ये आरोपीला आर्थिक बंधनाशिवाय त्याच्या वैयक्तिक बंधपत्रावर सोडण्यात यावे. अर्थात अशा प्रकरणात दंडात्मक कायद्यात दुरुस्ती करून अशी तरतूद करणे आवश्यक ठरू शकते की, जर आरोपी त्याच्या वैयक्तिक मुचलक्यात दिलेल्या आश्वासनाचे पालन करण्यात जाणीवपूर्वक अपयशी ठरला तर तो दंडात्मक कारवाईस पात्र असेल. परंतु आजच्या कायद्यानुसारही न्यायालयांनी ही जुनाट संकल्पना सोडून दिली पाहिजे, ज्याअंतर्गत न्यायचौकशीपूर्व सुटकेचा आदेश हा केवळ जामीनदारांसह जामीन दिल्यानंतर पारित केला जातो. ती संकल्पना कालबाह्य झाली असून, त्यातून फायद्यापेक्षा नुकसानच अधिक झाल्याचे अनुभवातून दिसून आले आहे. सामाजिकदृष्ट्या प्रगत देशांमध्ये आणि विशेषत: अमेरिकेत विकसित करण्यात आलेल्या न्यायचौकशीपूर्व सुटका या विषयातील नवीन अंतर्दृष्टीनुसार आता न्यायचौकशीपूर्व सुटकेसंदर्भात आपल्या

न्यायालयांच्या निर्णयांची माहिती दिली पाहिजे. न्यायालयासमोर मांडलेल्या माहितीच्या आधारे जर न्यायालयाचे समाधान झाले की, आरोपीची मुळं समाजात आहे आणि तो पळून जाण्याची शक्यता नाही, तर न्यायालय आरोपीची त्याच्या वैयक्तिक बंधपत्रावर सुरक्षितरीत्या सुटका करू शकते. आरोपीचे मूळ समाजात आहे की नाही, ज्यामुळे त्याला पळून जाण्यापासून प्रतिबंध होईल, हे ठरविण्यासाठी न्यायालयाने आरोपीशी संबंधित खालील बाबी विचारात घेतल्या पाहिजेत :

१. समाजातील त्यांच्या वास्तव्याचा कालावधी,

२. त्याची नोकरीची स्थिती, इतिहास आणि त्याची आर्थिक स्थिती,

३. त्याचे कौटुंबिक संबंध आणि नातेसंबंध,

४. त्याची प्रतिष्ठा, चारित्र्य आणि आर्थिक स्थिती,

५. त्याच्या पूर्व विश्वासार्हतेवर होणारी सुटका किंवा जामिनावरील सुटका यांबाबतीत कोणत्याही नोंदीसह, पूर्वीची गुन्हेगारीविषयक नोंद,

६. समाजातील जबाबदार सदस्यांची ओळख, जे त्याच्या विश्वासार्हतेची खात्री करून देतील,

७. आरोप केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप आणि दोषसिद्धीची उघड शक्यता आणि संभाव्य शिक्षा, जोवर हे घटक उपस्थित न राहण्याच्या जोखमीशी संबंधित आहेत, आणि

८. आरोपीचे समाजाशी असलेले संबंध दर्शविणारे किंवा जाणीवपूर्वक हजर न होण्याच्या जोखमीवर परिणाम करणारे इतर कोणतेही घटक.

जर आरोपीचे समाजात संबंध आहेत आणि त्याच्या हजर न राहण्याबाबत कोणताही धोका नाही या संबंधित घटकांचा विचार करून न्यायालयाचे समाधान झाले तर शक्यतो आरोपीची त्याच्या वैयक्तिक बंधपत्रावर सुटका केली जाऊ शकते. अर्थात, आरोपीची स्थिती आणि पार्श्वभूमी, त्याची पूर्वीची नोंद आणि गुन्ह्याचे स्वरूप आणि परिस्थिती लक्षात घेता, तो न्यायचौकशीसाठी हजर न राहण्याचा मोठा धोका असू शकतो, जसे की, जेव्हा आरोपी कुख्यात, वाईट चारित्र्याचा किंवा सराईत गुन्हेगार आहे किंवा गुन्हा गंभीर आहे (ही उदाहरणे केवळ उदाहरणे म्हणून आहेत), या बाबी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या तर न्यायालय आरोपीची त्याच्या वैयक्तिक बंधपत्रावर सुटका करणार नाही आणि जामीनदारांसह जामिन देण्यासाठी आग्रह धरू शकते. परंतु बहुसंख्य प्रकरणांमध्ये,

कौटुंबिक संबंध आणि नातेसंबंध, समाजातील मुळं, नोकरीची स्थिती इत्यादी बाबी न्यायालयाला आरोपीला त्याच्या वैयक्तिक बंधपत्रावर सोडण्यासाठी प्रबळ ठरू शकतात आणि विशेषत: जेव्हा गुन्हा गंभीर नसतो आणि आरोपी गरीब असतो किंवा समाजातील दुर्बल घटकातील असतो, अशा प्रकरणांमध्ये शक्यतो वैयक्तिक बंधपत्रावर आरोपीची सुटका करण्यास प्राधान्य दिले जाऊ शकते. परंतु आरोपीची वैयक्तिक बंधपत्रावर सुटका करतानासुद्धा न्यायालयाने ही सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे की, न्यायालयाने निश्चित केलेल्या बंधपत्राची रक्कम केवळ आरोपाच्या स्वरूपावर आधारित असू नये. आरोपीची वैयक्तिक आर्थिक परिस्थिती आणि तो पळून जाण्याची शक्यता यावर अवलंबून व्यक्तिपरत्वे बंधपत्राच्या रकमेचा निर्णय   घेण्यात यावा. या संबंधित घटकांचा विचार करून बंधपत्राची रक्कम निश्चित केली पाहिजे आणि आरोपाच्या स्वरूपानुसार ठरलेल्या वेळापत्रकानुसार यांत्रिकरित्या निश्चित केली जाऊ नये. अन्यथा आरोपीने वैयक्तिक बंधपत्र देऊनही त्याची सुटका होणे अवघड होईल. जर आरोपी न्यायचौकशीस उपस्थित राहीला नाही आणि त्याच्या परिणामी, बंधपत्र जप्त झाले, तर तो बंधपत्राची रक्कम

भरण्यासाठी पुरेसा पतदार आहे या बाबीसाठी त्याला न्यायालयाचे समाधान करणे आवश्यक झाले, तर ती बाब अत्यंत कठोर आणि क्लेशदायक असेल आणि आम्ही येथे जे सांगितले आहे, ते जामीन देताना पोलिसांनाही समानरीत्या लागू केले पाहिजे. आरोपीच्या पतदारीची चौकशी ही त्याच्यासाठी प्रचंड त्रासदायक ठरू शकते आणि त्याचा परिणाम नेहमीच जामीन नाकारण्यात आणि स्वातंत्र्यापासून वंचित राहण्यामध्ये होतो आणि म्हणूनच वैयक्तिक बंधपत्र स्वीकारण्याची अट म्हणून आग्रह धरण्यात येऊ नये. सध्याच्या कायद्यानुसारही जर जामिनाच्या पद्धतीची आपण या न्यायनिर्णयात सांगितल्याप्रमाणे अंमलबजावणी केली, तर गरिबांच्या अडचणी दूर होण्यास दीर्घकालीन मदत होईल आणि तुरुंगवासातून त्यांची न्यायचौकशीपूर्वी सुटका होण्यास मदत होईल, यात आम्हाला काहीही शंका नाही. याच कारणास्तव इंडियन एक्स्प्रेसच्या दोन अंकांत ज्या न्यायचौकशीअधीन कैद्यांची नावे देण्यात आली आहेत, त्यांची त्यांच्या वैयक्तिक बंधपत्रावर तात्काळ सुटका करण्यात यावी, असे निर्देश आम्ही दिले आहेत. सामान्यपणे आम्ही असे म्हणायला हवे होते की, त्यांनी दिलेले वैयक्तिक बंध आर्थिक दायित्वासह असावेत परंतु एक

अपवादात्मक उपाय म्हणून आम्ही असे निर्देश दिले की, वैयक्तिक बंधपत्रामध्ये कोणत्याही आर्थिक दायित्वाची आवश्यकता नाही कारण आम्हाला असे आढळले की या सर्व व्यक्तींना अनेक वर्षांसाठी खटला न चालवता तुरुंगात राहावे लागले आहे आणि काही प्रकरणांमध्ये तर अशा गुन्ह्यांसाठी ज्यामध्ये सर्व शक्यतांसह त्यांच्या शिक्षेचा कालावधी स्थानबद्धतेच्या कालावधीपेक्षा कमी असेल आणि शिवाय, जो आदेश आम्ही देत होतो तो केवळ अंतरिम आदेश होता. या प्रकरणातील विशिष्ट वस्तुस्थिती आणि परिस्थितीने अशी निराळी वाटचाल घडवून आणली.

५. न्यायचौकशीअधीन कैद्यांना न्याय नाकारण्यासाठी जबाबदार असणारी आपल्या कायदेशीर आणि न्यायव्यवस्थेची आणखी एक कमकुवत बाब आहे आणि ती म्हणजे खटले निकाली काढण्यास होणारा कुख्यात विलंब . एखाद्या आरोपीचा खटला अनेक वर्षे सुरूही होऊ नये, हे कायदेशीर आणि न्यायव्यवस्थेवरील दु:खद प्रतिबिंब आहे. खटला सुरू होण्यास एक वर्षाचा उशीरही पुरेसा वाईट आहे: मग जेव्हा विलंब ३ किंवा ५

किंवा ७ किंवा १० वर्षांचासुद्धा असेल, तर ते किती वाईट असू शकते? जलद गतीने खटला चालविणे हे फौजदारी न्यायाचे सार आहे आणि खटल्याला विलंब होणे म्हणजे न्याय नाकारणे यात काहीही शंका असू शकत नाही. विशेष म्हणजे हे नोंदविणे वेधक आहे की, अमेरिकेत जलद गतीने खटला चालवणे हा घटनेने हमी दिलेल्या अधिकारांपैकी एक आहे. राज्यघटनेच्या सहाव्या दुरुस्तीत अशी तरतूद आहे की:

> सर्व फौजदारी खटल्यांमध्ये, आरोपीला जलद आणि सार्वजनिक सुनावणीचा अधिकार असेल.

त्याचप्रमाणे युरोपियन कन्व्हेशन ऑन ह्यूमन राइट्स (मानवी अधिकारांवरील युरोपियन करार) च्या अनुच्छेद ३ मध्ये अशी तरतूद केली आहे की:

> अटक किंवा स्थानबद्ध केलेल्या प्रत्येक व्यक्तीस ..... वाजवी वेळेत खटला चालविण्याचा किंवा खटला प्रलंबित असताना सुटकेचा अधिकार असेल.

आम्हाला असे वाटते की, आपल्या राज्यघटनेनुसारसुद्धा जलद गतीने खटला चालवणे हा मूलभूत अधिकार म्हणून विशिष्टरीत्या नमूद केला नसला तरी या न्यायालयाने *मनेका गांधी विरुद्ध केंद्र*

सरकार [(१९७८) २ *एससीआर* ६२१ : (१९७८) १ *एससीसी* २४८] या प्रकरणात अर्थउकल केल्याप्रमाणे अनुच्छेद २१ च्या व्यापक व्याप्ती आणि आशयात तो अंतर्भूत आहे. या प्रकरणात आम्ही असा निर्णय दिला आहे की, अनुच्छेद २१ प्रत्येक व्यक्तीला कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज, त्याच्या जीवितापासून किंवा स्वातंत्र्यापासून वंचित न करण्याचा मूलभूत अधिकार प्रदान करते आणि त्या अनुच्छेदांतर्गत काही साम्य असलेली कार्यपद्धती कायद्याने विहित करणे अशा त्या अनुच्छेदाच्या आवश्यकतेचे पालन करणे पुरेसे नाही, परंतु अशी पद्धत "वाजवी, निष्पक्ष आणि न्याय्य" असावी. जर एखाद्या व्यक्तीला "वाजवी, निष्पक्ष किंवा न्याय्य" नसलेल्या प्रक्रियेअंतर्गत त्याच्या स्वातंत्र्यापासून वंचित ठेवले गेले तर, अशी वंचितता अनुच्छेद २१ अंतर्गत त्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन ठरेल आणि तो अशा मूलभूत अधिकाराची अंमलबजावणी करण्याचा आणि त्याची सुटका होण्याचा हक्कदार असेल. आता साहजिकच एखाद्या व्यक्तीला स्वातंत्र्यापासून वंचित ठेवण्यासाठी कायद्याने प्रस्थापित केलेली कार्यपद्धती 'वाजवी, निष्पक्ष किंवा न्याय्य' असू शकत नाही, जोपर्यंत त्या

प्रक्रियेमुळे अशा व्यक्तीचा दोषित्व निश्चित करण्यासाठी जलद सुनावणीची खात्री होत नाही. वाजवी जलद सुनावणीची खात्री न देणारी कोणतीही प्रक्रिया 'वाजवी, निष्पक्ष किंवा न्याय्य' मानली जाऊ शकत नाही आणि ती कलम २१ चे उल्लंघन करेल. त्यामुळे जलद गतीने खटला चालवणे आणि आमच्या मते, जलद गतीने खटला चालविणे म्हणजे वाजवीरीत्या जलद सुनावणी, हा अनुच्छेद २१ मधील जीवित आणि स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकाराचा अविभाज्य आणि आवश्यक भाग आहे, यात शंका नाही. मात्र, एखाद्या गुन्ह्यातील आरोपी व्यक्तीला जलद गतीने न्यायचौकशी नाकारली गेली आणि अनुच्छेद २१ अन्वये त्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करून दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या खटल्याचा परिणाम म्हणून तुरुंगवासात ठेवून त्याच्या स्वातंत्र्यापासून वंचित करण्याचा प्रयत्न केला गेला तर त्याचे काय परिणाम होतील, असा प्रश्न उपस्थित होईल. अवाजवी प्रदीर्घ कालावधीनंतर त्याची न्यायचौकशी करणे आणि अशा न्यायचौकशीनंतर त्याला दोषी ठरविणे हे अनुच्छेद २१ अन्वये त्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन ठरेल या कारणास्तव त्याच्यावर लावण्यात आलेल्या आरोपातून त्याची बिनशर्त सुटका

होण्यास तो पात्र ठरेल का? तहकुबीच्या तारखेस जेव्हा आम्ही रिट याचिकेवर गुणवत्तेवर सुनावणी घेतो तेव्हा आम्हांला या प्रश्नाचा विचार करावा लागेल. पण एक गोष्ट निश्चित आहे आणि राज्य सरकारने न्यायदानाच्या बाबतीत लोकांप्रती असलेली आपली जबाबदारी ओळखून खटल्यांच्या सुनावणीसाठी अधिक न्यायालये स्थापन करण्याची वेळ आली आहे, हे आम्ही राज्य सरकारवर ठामपणे बिंबवू शकत नाही. आम्ही या बाबीकडे लक्ष वेधू शकतो की, केवळ अधिक न्यायालये स्थापन करणे पुरेसे नाही तर राज्य सरकारला तेथे सक्षम न्यायाधीशांची भरतीसुद्धा करावी लागेल आणि जर त्यांना न्यायदानाची यंत्रणा सुधारावयाची इच्छा असेल आणि आज ज्यांच्यासाठी न्याय हा एक निरर्थक आणि पोकळ शब्द आहे, अशा मोठ्या संख्येच्या लोकांपर्यंत न्याय पोहोचवण्यासाठी त्यास एक प्रभावी साधन बनवायचे असेल, तर सक्षम न्यायाधीशांची भरती करण्यासाठी जे काही आवश्यक आहे, जसे की त्यांच्या सेवाशर्तीमध्ये सुधारणा करणे, ते सर्व राज्य सरकारला करावे लागेल. "

*** हुसैन आणि अन्य एक वि. केंद्र सरकार आणि इतर, २०१७** (५) एससीसी ७०२ :

"२८. न्यायिक सेवा तसेच विधी सेवा ही इतर कोणत्याही सेवांसारखी नाही. ती समाजसेवेचे ध्येये आहेत. रांगेत उभ्या असलेल्या पक्षकाराची पाळी बराच वेळ आली नाही तर ध्येय साध्य होत नाही. सरन्यायाधीश आणि मुख्यमंत्री यांनी असा निर्णय घेतला आहे की सर्व खटले पाच वर्षांच्या आत निकाली काढणे आवश्यक आहे आणि कोणत्याही मानकानुसार प्राथमिक न्यायालयात प्रकरणाचा निकाल लागण्यासाठी लागणारा हा बराच मोठा कालावधी आहे. कोठडीतील न्यायचौकशीअधीन कैद्यांच्या खटल्यांचा निर्णय हा एक प्राधान्याचा विषय आहे. जलद सुनावणीच्या अधिकाराच्या अंमलबजावणीत प्रत्येक स्तरावर अडथळे येतात- निहित हितसंबंध किंवा अनैतिक घटक कार्यवाहीला विलंब करण्याचा प्रयत्न करतात. पायाभूत सुविधांचा अभाव हा आणखी एक अडथळा आहे. सर्व अडचणी असूनही ध्येय यशस्वी होण्यासाठी प्रत्येक स्तरावर दृढ निश्चयी प्रयत्नांची गरज आहे. सातत्याने विचार करून आणि देखरेख ठेवून अडचणींवर मात करण्याची साधने व मार्ग शोधणे आवश्यक आहे. न्यायालयाचा पीठासीन अधिकारी हतबल अवस्थेत राहू शकत नाही. खटले वेळेत निकाली काढण्यासाठी आवश्यक

पायाभूत सुविधा पुरविणे ही राज्याची आणि कनिष्ठ न्यायालयांच्या कामकाजावर देखरेख करण्याची उच्च न्यायालयांची घटनात्मक जबाबदारी आहे. या दिशेने पहिले पाऊल म्हणजे उच्च न्यायालयाच्या स्तरावर आणि त्यानंतर प्रत्येक वैयक्तिक न्यायिक अधिकाऱ्याच्या स्तरावर योग्य कृती आराखडा तयार करणे. कृती आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी गंभीर प्रयत्नांची आणि सतत देखरेखीची आवश्यकता आहे.

२९. थोडक्यात सांगायचे तर :

२९.१ उच्च न्यायालये कनिष्ठ न्यायालयांना असे निर्देश देऊ शकतात की --

२९.१.१ जामीन अर्ज साधारणपणे एक आठवडयात निकाली काढावे;

२९.१.२ दंडाधिकाऱ्यासमोरचे खटले, जेथे आरोपी हवालातीत असतात, ते साधारणपणे सहा महिन्यांच्या आत निकाली काढण्यात यावेत आणि ज्या सत्र न्यायालयांच्या न्यायचौकशीतील आरोपी कोठडीत असतात, ते साधारणपणे दोन वर्षांच्या आत पूर्ण करण्यात यावेत ;

२९.१.३ पाच वर्षे जुनी असलेली सर्व प्रकरणे वर्षअखेरीस निकाली काढण्यासाठी प्रयत्न करावेत;

२९.१.४ कलम ४३६-अ ला पूरक म्हणून, परंतु त्यातील भावनेशी सुसंगत, जर दोषसिद्धी झाली तर जी शिक्षा होण्याची शक्यता आहे त्यापेक्षा अधिक काळाकरिता एखादा न्यायचौकशीअधीन कैदी हवालातीत असेल तर अशा न्यायचौकशीअधीन कैदयाची वैयक्तिक बंधपत्रावर सुटका केली पाहिजे. संबंधित न्यायचौकशी न्यायालयांनी वेळोवेळी असे मूल्यमापन केले पाहिजे;

२९.१.५. वरील कालमर्यादा वार्षिक गोपनीय अहवालातील न्यायिक कामगिरीच्या मूल्यमापनाची कसोटी असू शकतात.

२९.२ उच्च न्यायालयांना विनंती करण्यात येते की, त्यांच्यासमोर दाखल करण्यात आलेल्या जामीन अर्जांवर शक्यतो एका महिन्याच्या आत निर्णय घ्यावा आणि पाच वर्षांहून अधिक काळ कोठडीत असलेल्या फौजदारी अपिलांचा लवकरात लवकर निपटारा करावा;

२९.३ उच्च न्यायालयांना कनिष्ठ न्यायालयांसाठी योग्य कृती आराखडा तयार करता येईल , जारी करता येईल आणि देखरेख

करता येईल;

२९.४ उच्च न्यायालयांना प्रशासकीय आणि न्यायालयीन स्तरावर जलद तपास आणि न्यायचौकशीसाठी उचललेल्या पावलांवर वेळोवेळी देखरेख करता येईल ;

२९.५ *हरीश उप्पल* [*हरीश उप्पल* वि. केंद्र सरकार [(२००३) २ एससीसी ४५] या प्रकरणातील या न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने उच्च न्यायालयांना आवश्यक वाटेल अशा कठोर उपाययोजना करता येतील.

३०. त्यानुसार आम्ही सर्व उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायमूर्तींना विनंती करतो की, त्यांनी *हुसैनआरा खातून* [*हुसैनआरा खातून* (७) वि. *बिहार राज्य*, (१९९५) ५ एससीसी ३२६ : १९९५ एससीसी (फौ.) ९१३), *अख्तरी बी* [*अख्तरी बी* वि. *म.प्र. राज्य* , (२००१) ४ एससीसी ३५५ : २००१ एससीसी (फौ.) ७१४), नूर *मोहम्मद* [*नूर मोहम्मद* वि. *जेठानंद*, (२०१३) ५ एससीसी २०२ : (२०१३) २ एससीसी (सीआरव्ही) ७५४], *थाना सिंह* [*थाना सिंह* वि. *सेंट्रल ब्यूरो ऑफ नार्कोटिक्स*, (२०१३) २ एससीसी ५९० : (२०१३) २ एससीसी (फौ.) ८१८), सर्वोच्च न्यायालय विधी सहाय्य समिती [सर्वोच्च न्यायालय विधी सहाय्य समिती

(*न्यायचौकशीअधीन कैद्यांचे प्रतिनिधित्व करणारी*) वि. केंद्र सरकार, (१९९४) ६ एससीसी ७३१, परि. १५ : १९९५ एससीसी (फौ.) ३९), *इम्तियाज अहमद* [*इम्तियाज अहमद* वि. उ. प्र. राज्य, (२०१२) २ एससीसी ६८८ : (२०१२) १ एससीसी (फौ.) ९८६], [*इम्तियाज अहमद* वि. उ. प्र. *राज्य* , (२०१७) ३ एससीसी ६५८ : (२०१७) ३ एससीसी ६६५ : (२०१७) २ एससीसी (दि.) ३११ : (२०१७) २ एससीसी (दि.) ३१८ : (२०१७) २ एससीसी (फौ.) २२८ : (२०१७) २ एससीसी (फौ.) २३५ : (२०१७) १ एससीसी (एल अँड एस) ७२४ : (२०१७) १ एससीसी (एल अँड एस) ७३१), *हरीश उप्पल* [*हरीश उप्पल वि. केंद्र सरकार* (२००३) २ एससीसी ४५] या प्रकरणांतील निर्देश आणि *मुख्य न्यायमूर्तींच्या परिषदेतील ठराव* आणि वरील निरीक्षणे या सर्वांशी सुसंगत अशी उचित पावले ताबडतोब उचलावीत आणि कनिष्ठ न्यायालयात प्रलंबित असलेल्या न्यायचौकशीअधीन कैद्यांची प्रकरणे आणि उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या अपीले जलदगतीने निकाली काढण्यासाठी प्रशासकीय तसेच न्यायालयीनस्तरावर योग्य देखरेख यंत्रणा असावी."

*** सुरिंदर सिंह @ शिंगारा सिंह वि. पंजाब राज्य,** २००५ (७) एससीसी ३८७ :

८. जलद गतीने खटला चालविणे हा राज्यघटनेच्या अनुच्छेद २१ मधील व्यापक आणि आशयात अंतर्भूत असलेला मूलभूत अधिकार आहे, यावर या न्यायालयाने वारंवार भर दिला आहे, यात काहीही शंका नाही. वरील अनुच्छेद प्रत्येक व्यक्तीला कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज, त्याच्या जीवितापासून किंवा स्वातंत्र्यापासून वंचित न करण्याचा मूलभूत अधिकार प्रदान करते. जर एखाद्या व्यक्तीला वाजवी, निष्पक्ष किंवा न्याय्य नसलेल्या प्रक्रियेअंतर्गत त्याच्या स्वातंत्र्यापासून वंचित ठेवले गेले तर अशी वंचितता घटनेच्या अनुच्छेद २१ खालील त्याच्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन ठरेल. अशा व्यक्तीचे दोषीत्व निश्चित करण्यासाठी विहित प्रक्रियेदवारे जलद गतीने खटला चालवला पाहिजे, यावरही या न्यायालयाने भर दिला आहे. वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित ठेवणे काही प्रमाणात टाळता येणार नाही, हे मान्य आहे, पण प्रलंबित खटल्यामुळे वंचिततेचा कालावधी अवाजवी लांबला तर अनुच्छेद २१ ने दिलेल्या निष्पक्षतेला धक्का बसेल. जलद गतीने खटला चालविण्याच्या विषयाशी संबंधित या न्यायालयाच्या अनेक

निर्णयांमध्ये ही निरीक्षणे नमूद केली आहेत. या प्रकरणात, आम्ही अशा प्रकरणाशी संबंधित आहोत जिथे एक व्यक्ती भा. दं. वि. च्या कलम ३०२ अंतर्गत शिक्षापात्र गुन्ह्यासाठी दोषी आढळला आहे आणि ज्याला आजीवन कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार अशा अपराध्याला अपिलाचा अधिकार आहे. परंतु जेव्हा अशा सिद्धापराध्याने केलेले अपील वाजवी वेळेत निकाली काढता येत नाही, तेव्हा अडचण निर्माण होते. *कश्मीरा सिंह* वि. *पंजाब राज्य* [(१९७७) ४ एससीसी २९१ : १९७७ एससीसी (फौ.) ५५९] या प्रकरणात या न्यायालयाने अशा प्रकारचे प्रकरण हाताळले. असे निरीक्षण नोंदविण्यात आले की, (एससीसी पृ. २९२-९३. परि. २)

"आजीवन कारावासाची शिक्षा झालेल्या व्यक्तीची जामिनावर सुटका न करण्याची प्रथा उच्च न्यायालयात आणि या न्यायालयात विकसित झाली होती, कारण एकदा एखादी व्यक्ती दोषी आढळली आणि त्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली, तर जोपर्यंत त्याचे दोषीत्व आणि शिक्षा रद्द केली जात नाही, तोपर्यंत त्याची सुटका करता

कामा नये. परंतु या प्रथेचा मूळ सिद्धांत असा होता की अशा व्यक्तीचे अपील मोजण्यायोग्य कालावधीत निकाली काढले जाईल, जेणेकरून जर तो शेवटी निर्दोष असल्याचे सिद्ध झाले तर त्याला विनाकारण दीर्घकाळ तुरुंगात राहावे लागणार नाही. ज्या ठिकाणी पाच किंवा सहा वर्षांत न्यायालय अपील निकाली काढण्याच्या स्थितीत नसते, तेथे या प्रथेचा युक्तिवाद लागू होऊ शकत नाही. एखाद्या व्यक्तीला, एखादया गुन्ह्यासाठी, जो शेवटी त्याने केला नाही असे सिद्ध झाले, त्यासाठी पाच किंवा सहा वर्षांच्या कालावधीसाठी तुरुंगात ठेवणे ही खरोखरच न्यायाची खिल्ली उडवणारी गोष्ट ठरेल. त्याच्या असमर्थनीय ठरलेल्या तुरुंगवासाची भरपाई न्यायालय कधीही देऊ शकते का? 'आम्ही तुमचे अपील स्वीकारले आहे कारण आम्हांला असे वाटते की, प्रथमदर्शनी प्रकरण तुमच्याविरुद्ध आहे, परंतु दुर्दैवाने काही वर्षे तुमच्या अपीलावर सुनावणी करण्यासाठी आम्हांला वेळ नाही आणि म्हणूनच, आम्ही तुमच्या अपीलावर सुनावणी घेईपर्यंत, आपण निर्दोष असलात तरीही तुरुंगातच रहावे?'

असे न्यायालयाने एखाद्या व्यक्तीला सांगणे योग्य ठरेल का? अशा न्यायदानामुळे जनतेच्या मनात कोणता विश्वास निर्माण होईल? हे अगदी शक्य आहे आणि प्रत्यक्षात या न्यायालयातील काही प्रकरणांमध्ये असे घडले आहे की एखाद्या व्यक्तीचे अपील सुनावणीसाठी येण्यापूर्वी, त्याची तुरुंगवासाची शिक्षा पूर्ण होऊ शकते. अपिलावर सुनावणी झाल्यानंतर अशा व्यक्तीची निर्दोष मुक्तता करताना न्यायाधीशाच्या मनास चुटपूट लागणार नाही का? हा त्याच्या न्यायभावनेचा अपमान नाही का? ज्या व्यक्तीने तुरुंगवासाची शिक्षा आधीच पूर्ण केली आहे किंवा त्यातील एक मोठा काळ व्यतीत केला आहे, अशा व्यक्तीला निर्दोष मुक्ततेचा काय फायदा होईल? त्यामुळे हे न्यायालय पूर्वी ज्या प्रथेचे अनुसरण करीत आले आहे, त्याचा पुनर्विचार करण्याची नितांत आवश्यकता आहे आणि जोपर्यंत हे न्यायालय एखाद्या आरोपीच्या अपिलावर वाजवी कालावधीत सुनावणी घेण्याच्या स्थितीत नाही, तोपर्यंत न्यायालयाने सहसा, अन्यथा कारवाई करण्याचे ठोस आधार नसल्यास, ज्या प्रकरणांमध्ये आरोपीला त्याच्या

दोषीत्वाविरोधात आणि शिक्षेविरोधात अपील करण्यासाठी विशेष अनुमती देण्यात आली आहे, अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाने आरोपीला जामिनावर मुक्त करणे आवश्यक आहे."

९. आमच्या निदर्शनास आणून देण्यात आलेल्या या न्यायालयाच्या इतर काही निर्णयांमध्येही अशाच प्रकारची निरीक्षणे आढळतात. परंतु, हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की या सर्व निर्णयांमध्ये केवळ व्यापक मार्गदर्शक तत्त्वे आहेत जी अपीलकर्त्याला जामीन मंजूर करण्याच्या न्यायालयापुढे केलेल्या अर्जावर सुनावणी करताना न्यायालयाने लक्षात ठेवणे आवश्यक आहेत. कोणत्याही निर्णयात कोठडीतील स्थानबद्धतेचा विशिष्ट कालावधी पूर्ण झाल्यावर जामीन देण्याबाबत कोणताही विशिष्ट नियम नाही. खरे तर जामीन मंजूर करणे किंवा नाकारणे यासारख्या विवेकाधीन असणाऱ्या बाबींमध्ये कोणताही ठराविक नियम ठरवणे किंवा निश्चित सूत्र विकसित करणे अशक्य आहे. सर्व संबंधित तथ्ये आणि परिस्थितीचा विचार करून न्यायालयाने आपला स्वेच्छानिर्णय वापरला पाहिजे. न्यायालयाने लक्षात ठेवणे आवश्यक आहे अशी संबंधित तथ्ये आणि परिस्थिती काय आहे,

हे या देशातील न्यायालयांनी वर्षानुवर्षे अनेक निर्णयांमध्ये मांडले आहे आणि ते सर्वज्ञात आहे. त्यामुळे अशा बाबींमध्ये कोणताही ठराविक नियम किंवा सूत्र आखून देण्याचा प्रयत्न करणे व्यर्थ आहे.

१०. पक्षकारांच्या वकिलांनी आमच्यासमोर असे सादर केले की, पंजाबमधील न्यायालयांना हे समजले असले तरी, *धरम पाल* [(२०) १ *चॅन एलआर* ७४] या प्रकरणात पंजाब आणि हरयाणा उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामध्ये कोणताही अपरिवर्तनीय नियम नव्हे तर केवळ मार्गदर्शक तत्त्वे आखून दिलेली आहेत. दुर्दैवाने, वरील न्यायनिर्णयात ज्या प्रकारे तत्त्वे व्यक्त केली गेली आहेत, ती पाहता न्यायालयाने या निर्णयाचा चुकीचा अर्थ लावला आहे. या न्यायालयाचे विविध निर्णय आणि न्यायालयांना भेडसावणाऱ्या अडचणींचा विचार करून *धरम पाल* [(२०००) १ चं एलआर ७४] या प्रकरणात उच्च न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, (चं एलआर पृ. ८७, परिच्छेद १८)

> "म्हणून ज्यांनी कमीत कमी पाच वर्षांचा तुरुंगवास भोगलेला आहे, ज्यापैकी किमान तीन वर्षांचा तुरुंगवास शिक्षेनंतर असला पाहिजे, अशा जन्मठेपेच्या कैद्यांना

त्यांच्या अपीलावर सुनावणी होईपर्यंत, त्यांनी त्यासाठी अर्ज केल्यास, जामिनावर सुटका करण्याचे आम्ही निर्देश देतो. हीच तत्त्वे कोर्ट मार्शलने दोषी ठरविलेल्या व्यक्तींनाही लागू व्हायला हवीत आणि अशा कैद्यांची शिक्षा स्थगित करण्याची मागणी केल्यानंतर ते सुटका होण्यास हक्कदार आहेत, असेही आमचे मत आहे. पुढे आम्ही असे निर्देश देतो की, महिला आणि अल्पवयीन मुलांसाठी पाच वर्षांचा कालावधी कमी करून चार वर्षांचा करण्यात यावा आणि दोषी ठरल्यानंतर किमान दोन वर्षांचा तुरुंगवास करण्यात यावा. मात्र, ज्या प्रकरणांमध्ये जामीन देण्यास कायद्याने मनाई आहे, अशा प्रकरणांमध्ये हे निर्देश लागू होणार नाहीत, असे आम्ही स्पष्ट करतो."

<u>संहितेचे कलम ३८९</u>

"८९. **अपील प्रलंबित असताना शिक्षादेशाचे निलंबन ; अपीलकर्त्याची जामिनावर सुटका.** — (१) सिद्धदोष व्यक्तीने केलेले अपील प्रलंबित असताना कारणे लेखी नमूद करून त्याकरिता अपिल न्यायालय, ज्या विरुद्ध अपील केलेले असेल त्या

शिक्षादेशाची किंवा आदेशाची अंमलबजावणी निलंबित करावी असा व जर ती व्यक्ती बंदिवासात असेल तर, तिला जामीनावर किंवा तिच्या जातमुचलक्यावर सोडावे असाही आदेश देऊ शकेल.

परंतु असे की, यासाठी मृत्यूची किंवा आजीवन कारावासाची किंवा दहा वर्षांपेक्षा जास्त शिक्षा ठरलेल्या व्यक्तीला जामिनावर किंवा त्याच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर सोडण्यापूर्वी अपील न्यायालय, सरकारी अभियोक्त्याला अशा सोडण्याच्या विरोधातील कारणे लेखी देण्याची संधी देईल.

परंतु आणखी असे की, सिद्धदोष व्यक्तीला जामिनावर सोडण्यात आले असेल अशा बाबतीत, तो जामीन रद्द करण्यासाठीचा अर्ज सरकारी अभियोक्ता करू शकेल.

(२) सिद्धदोष व्यक्तीने उच्च न्यायालयाला दुय्यम असलेल्या न्यायालयाकडे अपील केले असल्यास, या कलमाने अपील न्यायालयास प्रदान केलेली शक्ती उच्च न्यायालयासही त्याबाबतीत वापरता येईल.

(३) अपील सादर करण्याचा आपला उद्देश आहे याबाबत सिद्धदोष व्यक्तीने, तिला ज्या न्यायालयाने सिद्धदोष ठरविले असेल त्याची खात्री पटवली तर, -

(एक) अशी व्यक्ती जामिनावर असून तिला जास्तीत जास्त तीन वर्षे इतक्या मुदतींच्या कारावासाचा शिक्षादेश मिळाला असेल त्या बाबतीत, किंवा

(दोन) ज्या अपराधाबद्दल अशा व्यक्तीला सिद्धदोष ठरवण्यात आले तो, जामीनपात्र असून ती व्यक्ती जामिनावर असेल त्या बाबतीत, अपील सादर केले जाण्यास व पोट कलम (१) खाली अपील न्यायालयाचे आदेश मिळण्यास पुरेसा वेळ मिळेल इतक्या कालावधीकरता, ते न्यायालय जामीन नाकारण्यास विशेष कारणे नसल्यास, सिद्धदोष व्यक्तीला जामिनावर सोडण्याचा आदेश देईल; आणि ती व्यक्ती याप्रमाणे जामिनावर सुटलेली असेल तोपर्यंत कारावासाचा शिक्षादेश निलंबित असल्याचे मानण्यात येईल.

(४) सरतेशेवटी अपीलकर्त्याला काही मुदतीच्या कारावासाचा किंवा आजीव कारावासाचा शिक्षादेश दिला जाईल तेव्हा, ज्या कालावधीत त्याला याप्रमाणे सोडलेले असेल तो कालावधी जितक्या मुदतीची शिक्षा त्याला दिलेली असेल तिची गणना करताना वगळण्यात येईल. "

४२. संहितेचे कलम ३८९ हे स्वतःच अपील प्रलंबितअसल्यामुळे अपीलकर्त्याची जामिनावर सुटका करण्याच्या परिस्थितीशी संबंधित आहे. न्यायचौकशी प्रलंबित असताना कलम ३८९ खालील वापरण्याजोगे अधिकार हे कलम ४३७ अन्वये किंवा संहितेच्या कलम ४३९ खालील असणाऱ्या अधिकारांपेक्षा वेगळे आहेत. याचे कारण असे आहे की शिक्षा भोगलेल्या अपीलकर्त्यास "निर्दोषत्वाचे गृहितक" आणि "जामीन हा नियम आहे आणि तुरुंग हा अपवाद आहे" हे उपलब्ध होऊ शकत नाही. केवळ *अपील प्रलंबित* राहणे हा एक घटक ठरणार नाही.

४३. शिक्षेचे निलंबन म्हणजे अंतिम निर्णय होईपर्यंत शिक्षा स्थगित ठेवण्याची कृती. मुख्य अपिलावर सुनावणी घेण्यास होणारा विलंब हा जरी निश्चितच एक घटक असला आणि कलम ४३६ अ अन्वये मिळणाऱ्या फायद्याचाही जरी विचार केला गेला, तरी न्यायचौकशी न्यायालयाने दिलेल्या शिक्षेसह संबंधित घटकही न्यायालयांना पहावे लागतील. जेव्हा हे स्पष्ट होते की अपीलांवर सुनावणी होण्याची आणि ती निकाली निघण्याची शक्यता नाही, तेव्हा विलंब हा निश्चितपणे अपीलकर्त्याच्या बाजूने एक घटक असेल.

४४. अशा प्रकारे, आम्ही असे मानतो की, मुख्य अपील किंवा पुनरीक्षण सुनावणीसाठी घेण्यास होणारा विलंब आणि संहितेच्या कलम ४३६ अ अंतर्गत प्रदान केलेल्या लाभासह इतर घटकांचा जामिनावर सुटका करण्यासाठी अनुकूल विचार केला पाहिजे.

<u>पूर्वीदाहरण</u>

***अतुल त्रिपाठी वि. यु.पी. राज्य आणि इतर २०१४ (९) एससीसी १७७ :**

"१३. असे दिसून येते की, कलम ४३९ अंतर्गत जामीन विचारात घेण्याच्या प्रक्रियेमध्ये स्पष्ट फरक आहे, जो दोषसिद्ध होण्याआधीचा टप्पा आहे आणि फौजदारी संहिता कलम ३८९ हा दोषी ठरविल्यानंतरचा टप्पा आहे. कलम ४३९ च्या बाबतीत संहिता अशी तरतूद करते की, केवळ सत्र न्यायालयानेच संपरीक्षा करण्यायोग्य किंवा जो आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र आहे अशा अपराधाचा आरोप असलेल्या एखाद्या व्यक्तीस जामीन मंजूर करण्यापूर्वी अव्यवहार्य असल्याशिवाय सरकारी अभियोक्त्याला जामिनाच्या अर्जाची नोटीस देण्यात यावी. तर फौजदारी संहिता कलम ३८९ खाली दोषी ठरविल्यानंतर जामीन देण्याच्या प्रकरणात मृत्युदंड किंवा जन्मठेप किंवा दहा वर्षांपेक्षा कमी कालावधीसाठी तुरुंगवासाची शिक्षा असलेल्या गंभीर गुन्ह्यांबाबत दोषी आढळल्यास अपिलीय न्यायालयाने सरकारी अभियोक्त्याला अशा सुटकेच्या विरोधातली लेखी कारणे दाखवण्याची संधी देणे अनिवार्य आहे.

१४. जर अपिलीय न्यायालय दोषी व्यक्तीची जामिनावर सुटका करण्याकरता विचार

करण्यास इच्छुक असल्यास, सरकारी अभियोक्त्याला अपीलकर्त्यास जामिनावर का मुक्त करू नये ? याबाबत कारणे लेखी स्वरूपात दर्शविण्यांची संधी देण्यात यावी. अशा प्रकरणी कठोर तरतूद यासाठी लागू करण्यात येत आहे की, त्यावरून याची खात्री देता येईल की न्यायालयास सर्व संबंधित घटकांची, (बाबींची) माहिती देण्यात आली आहे, ज्यायोगे, ज्याप्रकारे गुन्हा करण्यात आला, गुन्ह्याची गांभीर्यता, बंद्याचे वय, गुन्हेगारी इतिहास, जनमानसातील न्यायदान प्रक्रियेवरील विश्वासावर होणारा प्रभाव वगैरे गोष्टी लक्षात घेऊन त्यावर विचार करू शकेल. अशी संधी सरकारी अभियोक्त्यास देऊन सुद्धा, जर कोणतेही कारण लेखी स्वरूपात दर्शविण्यात आले नाही तर, अपिलीय न्यायालय अशी नोंद करेल की, राज्य सरकारने कोणतेही आक्षेप लेखी स्वरूपात दाखल केले नाही.

ही पद्धत पारदर्शकतेच्या खात्रीच्या उद्देशा करिता आहे की संगनमताचा आरोप नाही या गोष्टीच्या खात्रीकरिता आणि या गोष्टीच्या खात्रीकरता की दोषसिद्धी नंतरच्या टप्प्यावर गंभीर गुन्ह्यांसंबंधी जामीन मंजुरीच्या संबंधित विचाराच्या दृष्टीने राज्य सरकारद्वारा सत्य आणि योग्य तथ्यांसह बाजू मांडून न्यायालयास योग्य प्रकारे साहाय्य केले जात आहे.

***अंगणा वि. राज्यस्थान सरकार, (२००९) 3 एससीसी ७६७ :**

"१४. उच्च न्यायालयात दोषसिद्धीच्या विरोधात अपील दाखल केले जाते तेव्हा, शिक्षेला स्थगिती देण्यासाठी न्यायालयाला पुरेसा अधिकार आणि स्वेच्छानिर्णय असतो, परंतु प्रत्येक प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थिती लक्षात घेऊन तो विवेकशीलपणे वापरला जावा. शिक्षेच्या स्थगितीचा विचार करताना गुन्ह्याचे स्वरूप, घटना कोणत्या पद्धतीने घडली होती, यापूर्वी दिलेल्या जामीनाचा कोणत्याही प्रकारे गैरवापर झाला होता का, या आधारे प्रत्येक प्रकरणाचा विचार केला जाईल. खरं तर स्वेच्छानिर्णयाचां वापर करताना असे निश्चित सूत्र नाही की जे लागू केले जाऊ शकते. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३८९ अंतर्गत दोषीने दाखल केलेल्या अर्जावर विचार करताना प्रत्येक प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थिती न्यायालयीन स्वेच्छानिर्णयाच्या वापरावर नियंत्रण ठेवतील.

***सुनील कुमार वि. विपिन कुमार (२०१४) एससीसी ८६८**

"१३. आम्ही दोन्ही पक्षकारांनी उपस्थित केलेले परस्परविरोधी कायदेशीर वाद ऐकले आहेत. आमचे असे मत आहे की, उच्च न्यायालयाने उत्तरवादिना जामीनावर सोडण्यासाठी फौजदारी संहितेच्या कलम ३८९ अंतर्गत आपल्या स्वेच्छाअधिकारांचा योग्य वापर केला आहे प्रथम दोन्ही पक्षकारांनी दाखल

केलेले फौजदारी अपील आणि फौजदारी पुनरीक्षण दोन्ही उच्च न्यायालयासमोर प्रलंबित आहेत म्हणजे उत्तरवादींच्या दोषांची अपिलीय न्यायालयाने पुष्टी केलेली नाही. दुसरे म्हणजे उत्तरवादींना यापूर्वी जामीन देण्यात आला होता आणि त्यांनी स्वातंत्र्याचा गैरवापर केला नाही, ही मान्य केलेली वस्तुस्थिती आहे. तसेच उत्तरवादींनी वेगळ्या तऱ्हने सांगितले तरी घटना घडलेल्याची कबूली दिली होती.

१४. नजीकच्या भविष्यात अपीलावर सुनावणी होण्याची शक्यता अत्यंत दुर्गम आहे . या वस्तुस्थितीसह उच्च न्यायालयाने सर्व संबंधि तथ्ये विचारात घेतल्याचे आमचे मत आहे, म्हणून उच्च न्यायालयाने योग्य कायदेशीर तर्कशक्तींच्या आधारावर उत्तरवादींना जामीनावर सोडले आहे. या टप्प्यावर आम्ही उच्च न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप करू इच्छित नाही. त्यानुसार अपील फेटाळण्यात येत आहे.

४५. परंतु, आम्हाला घाईघाईने यात अधिक म्हणावयाचे आहे की, जर न्यायालय अपीलकर्त्याला जामीनावर सोडण्यात इच्छुक असेल, त्याने (अपीलकर्त्याने) स्वतःहून ज्या बंधपत्राची सोय उपकलम (१) द्वारा करण्यात आली आहे त्याबाबत आगाऊच कळवावे.

<u>संहितेचे कलम ४३६ अ</u>

४३६ अ. न्यायचौकशी चालू असलेल्या कैद्याला जास्तीत जास्त किती कालावधीसाठी स्थानबद्ध ठेवता येईल :-

जर एखादी व्यक्ती, कोणत्याही कायद्याखालील अपराधासाठी (ज्यासाठी त्या कायद्याखालील एक शिक्षा म्हणून मृत्यूची शिक्षा विनिर्दिष्ट केलेली आहे असा अपराध नसलेल्या) या संहितेन्वये अन्वेषण, चौकशी किंवा संपर्रिक्षा चालू असलेल्या कालावधीच्या दरम्यान स्थानबद्ध झालेली असेल, जो कालावधी त्या अधिनियमान्वये त्या अपराधासाठी विनिर्दिष्ट केलेल्या कमाल कालावधीच्या अर्ध्यापेक्षा अधिक इतका असेल तर, न्यायालय त्या व्यक्तीला जामीनदारासह किंवा जामीनदाराशिवाय व्यक्तिगत जातमुचलक्यावर सोडून देईल.

परंतु असे की, न्यायालय सरकारी अभियोक्त्याचे म्हणणे ऐकल्यावर आणि कारणे लेखी नमूद करून त्या व्यक्तीची स्थानबद्धता उक्त कालावधीच्या अर्ध्यापेक्षा अधिक कालावधीसाठी चालू ठेवू शकेल किंवा जामीनदारासह किंवा प् जामीनदाराशिवाय जातमुचलक्याविना जामीनावर मुक्त करू शकेल.

परंतु आणखी असे की, अशा कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही बाबतीत

अन्वेषण, चौकशी किंवा संपरीक्षेच्या कालावधीत त्या कायद्यान्वये त्या अपराधाखाली तरतूद केलेल्या कमाल कालावधीपेक्षा अधिक कालावधीसाठी स्थानबद्धतेत ठेवणार नाही.

स्पष्टीकरण :- या कलमान्वये जामिनावर मुक्त करण्यासाठी कालावधी मोजताना आरोपीने कार्यवाहीमध्ये विलंब केल्यामुळे स्थानबद्धतेत घालवलेला कालावधी वगळण्यात येईल.

४६. २००५ च्या अधिनियम २५ द्वारे संहितेचे कलम ४३६ अ समाविष्ट केले गेले आहे. या तरतुदीमध्ये, विशेषतः जामीन मंजूर करण्याच्या दृष्टिकोनातून एक प्रशंसनीय उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. या तरतुदीत न्यायचौकशी चालू असलेल्या कैद्याला जास्तीत जास्त किती कालावधीसाठी स्थानबद्ध ठेवता येईल, ते नमूद केले आहे. या कालावधीच्या गणना आऱोपी तपास, चौकशी आणि न्यायचौकशी दरम्यान कोठडीत राहिलेल्या कालावधीशी करावी लागेल. आम्ही आधीच स्पष्ट केले आहे की, "न्यायचौकाशी" या शब्दाचा विस्तारित अर्थ विशेषतः अपील किंवा स्वीकृती प्रलंबित असताना द्यावा लागेल. अशाप्रकारे ज्या प्रकरणात अपील जास्तीत जास्त काळ प्रलंबित असेल, ते कलम ४३६ अ अंतर्गत आणण्यासाठी सर्व स्वरूपात तुरुंगवासात घालवलेल्या कालावधीची आणि पुनरीक्षणासाठी कालावधीची गणना करावी लागेल.

४७. या तरतुदी अन्वये, जर एखादी व्यक्ती त्या अपराधासाठी विनिर्दिष्ट केलेल्या कमाल कालावधीच्या अर्ध्यांपेक्षा अधिक कालावधीपेक्षा स्थानबद्ध झालेली असेल तर, न्यायालय त्या व्यक्तीला जामीनदारासह किंवा जामीनदाराशिवाय व्यक्तिगत जातमुचलक्यावर सोडून देईल. "शाल" (shall) हा शब्द या तरतुदीचे अनिवार्य अनुपालन स्पष्टपणे सुचित करतो. आम्हाला असे वाटते की, अशा स्वरूपाच्या प्रकरणात जामीन अर्जाची आवश्यकता देखील नाही. विशेषतः जेव्हा विलंबाच्या कारणांचा संबंध आरोपी विरुद्ध लागू शकत नाही. आम्हाला याचीही जाणीव आहे की, निर्णय घेताना सरकारी अभियोक्त्याचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे आणि न्यायालयाचे असे मत असेल की अर्ध्याहून अधिक काळ अटकेत ठेवण्याची गरज आहे, तर तसे करावे लागेल. तथापि सामान्य नियमाला अपवाद असल्याने अशा शक्तीचा वापर कधी मधी करणे अपेक्षित आहे निर्दोषतेच्या गृहीतकाला नियंत्रण ठेवण्याच्या तत्वासह जामीन हा नियम आहे आणि तुरुंग हा अपवाद आहे याचा पुन्हा एकदा पुनरूच्चार करावा लागेल याबद्दल आमच्या मनात शंका नाही की ही तरतूद मूलभूत आहे स्वातंत्र सुलभ करणारी जो अनुच्छेद 21 चा मुख्य हेतू तो आहे. स्पष्टीकरणांतर्गत सादर करण्यात आलेले एकमेव चेतावणी म्हणजे आरोपींना वगळल्यामुळे कारवाईला होणारा विलंब. भिमसिंग विरुद्ध भारत सरकार (२०१५) १३ एसबीसी ६०५ या न्यायालयाने उपरोक्त तरतुदींना सामोरे जाताना, असे निर्देश दिले आहेत की,

५. कलम ४३६ अ मधील वैधानिक धोरणाचा विचार करून आणि तुरुंगात मोठ्या संख्येने कैदी ठेवण्यात आले आहेत, आमचे असे मत आहे की, आम्ही काही आदेश देणे आवश्यक आहे, जेणेकरून कलम ४३६ अ अन्वये दिलेल्या कमाल कलावधीपेक्षा कैद्यांना तुरुंगात ठेवण्यात येऊ नये.

६. आणि त्यानुसार आम्ही असे निर्देश देतो की, फौजदारी संहितेच्या कलम ४३६-अ च्या प्रभावी अंमलबजावणीच्या उद्देशाने, ०१-१०-२०१४ पासून सुरू होणाऱ्या प्रत्येक तुरुंगात/कारागृहात न्यायदंडाधिकारी/ मुख्य न्यायदंडाधिकारी सत्र न्यायाधीश आठवड्यातून एक बैठक आयोजित करतील त्यांच्या तुरुंगातील बैठकीमध्ये वरील न्यायिक अधिकारी कायद्यान्वये या गून्ह्यासाठी तरतूद केलेल्या जास्तीत जास्त करावासाचा अर्धा कालावधी पूर्ण केलेल्या किंवा जास्तीत जास्त करावासाच्या कालावधी पूर्ण केला आहे, अशा कैद्यांची ओळख पटवतील आणि कलम ४३६ अन्वये विहित केलेल्या प्रक्रियेचे पालन करून कलम ४३६-अ पूर्ण करण्याची अट अशा कैद्यांच्या तात्काळ सुटकेसाठी योग्य तो आदेश करावाच पारित करतील. अशा न्यायदंडाधिकारी/ मुख्य न्यायदंडाधिकारी/ सत्र न्यायाधीश यांनी अशा प्रत्येक बैठकीचा अहवाल उच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रार जनरल यांच्याकडे सादर करतील आणि दोन महिन्याच्या शेवटी, प्रत्येक उच्च न्यायालयाने प्रत्येक उच्च न्यायालयाचे रजिस्ट्रार जनरल या न्यायालयाच्या सरचिटणीसांना विनाविलंब अहवाल सादर करतील. वरील आदेशाचे पालन

सुलभ करण्यासाठी आम्ही प्रत्येक तुरुंग कारागृहाच्या कारागृह अधीक्षक यांना उपरोक्त न्यायिक अधिकाऱ्यांनी बसलेल्या न्यायालयासाठी सर्व आवश्यक सुविधा पुरविण्याचे निर्देश देतो. या देशाची एक प्रत्येक उच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रार जनरल कडे पाठवली जाईल. आदेशाची प्रत त्यांच्या राज्यातील सर्व सत्र न्यायाधीशांना आवश्यक अनुपालनासाठी पाठवतील.

४८. या न्यायालयाने जारी केलेल्या उपरोक्त निर्देशांचे पूर्णपणे पालन न केल्यास न्यायचौकशीअधीन कैद्यांना अनावश्यक तुरुंगवास टाळण्यासाठी आम्ही दोष सिद्ध होईपर्यंत निर्दोषत्वाच्या गृहीतकाचे तत्व कायम ठेवण्यासाठी त्याचे पालन करणे अपेक्षित आहे.

<u>संहितेचे कलम ४३७</u>

"४३७. बिनजामिनी अपराधाच्या बाबतीत जामीन केव्हा घेता येईल.

(१) जेव्हा कोणताही बिनजामिनी अपराध केल्याचा आरोप असलेल्या किंवा तसा वहीम असलेल्या कोणत्याही व्यक्तीला पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याने वॉरंटाशिवाय अटक केली असेल किंवा स्थानबद्ध केले असेल अथवा उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय याहून अन्य न्यायालयापुढे ती उपस्थित झाली असेल किंवा तिला आणले गेले असेल तेव्हा तिला जामीनवर सोडता येईल परंतु,

(एक) अशी व्यक्ती मृत्यूच्या किंवा जन्मठेपेच्या शिक्षेस पात्र अशा अपराधाबद्दल दोषी आहे, असे समजण्यास वाजवी कारणे दिसत असल्यास तिला त्याप्रमाणे सोडले जाणार नाही ;

(दोन) असा अपराध हा दखलपात्र अपराध असेल आणि तिला यापूर्वी फाशीच्या, जन्मठेपेच्या किंवा सात वर्ष अगर त्याहून अधिक मुदतीच्या करावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आलेले असेल तर अथवा यापूर्वी तिला तीन किंवा अधिक वर्षाच्या परंतु सात वर्षापेक्षा कमी नाही इतक्या कालावधीच्या शिक्षेस पात्र असलेल्या दखलपात्र <u>अपराधान</u> साठी दोन किंवा त्याहून अधिक वेळा दोषी ठरविण्यात आले असेल तर अशा व्यक्तीला त्याप्रमाणे सोडले जाणार नाही.

परंतु खंड (एक) किंवा खंड (दोन) मध्ये निर्देश दिलेली व्यक्ती जर सोळा वर्षाखालील वयाची असेल किंवा स्त्री असेल किंवा आजारी वा दुर्बल असेल तर, तिला जामिनावर सोडावे असे न्यायालय निर्देशित करू शकेल ;

परंतु आणखी असे की, खंड (दोन) मध्ये निर्देशिलेल्या व्यक्तीला काही इतर खास कारणामुळे जामीनावर सोडणे न्याय आणि उचित आहे, अशी न्यायालयाची खात्री झाली तर न्यायालय तिला तसेच सोडण्याबद्दल निदेश देऊ शकेल.

परंतु आणखी असे की, आरोपी व्यक्ती जामिनावर सुटण्यास अन्यथा हक्कदार असेल व न्यायालय जे निदेश देईल त्याचे आपण अनुपालन करू असे अभिवचन तिने दिले तर, अन्वेषण चालू असता साक्षीदारां करवी ओळख पटवण्यासाठी आरोपीची जरुरी लागेल एवढीच गोष्ट जामीन मंजूर करायला नकार देण्यास पुरेसे कारण होणार नाही.

परंतु तसेच एखाद्या व्यक्तीने अपराध केल्याचा आरोप असेल तो अपराध आजीवन कारावास किंवा सात किंवा अधिक वर्षाचा करावास या शिक्षेस पात्र असेल तर, अशा कोणत्याही व्यक्तीला कोणतेही न्यायालय, त्या बाबतीत सरकारी अभियोकत्याला आपली बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय या पोट कलमान्वये जामिनावर सोडण्यात येणार नाही.

(२) आरोपींनी बिनजामिनी अपराध केला आहे असे समजण्यास वाजवी कारणे नाहीत, पण त्याच्या दोषीपणाबाबत आणखी चौकशी करण्यास पुरेशी कारणे आहेत असे अन्वेषण किंवा चौकशी किंवा प्रकरणपरत्वे संपरीक्षा कोणत्याही टप्प्यात असताना अशा अधिकाऱ्याला किंवा न्यायालयाला दिसून आले तर कलम ४४६ मधील उपबंधाच्या अधीनतेने आणि अशी चौकशी प्रलंबित असताना जामीनावर अथवा अशा अधिकाऱ्याच्या किंवा न्यायालयाच्या स्वविवेकानुसार यात यापुढे उपबंधित केल्याप्रमाणे आरोपींनी आपल्या उपस्थितीसाठी जामीनदारांनाविना बंदपत्र निष्पादित करून दिल्यावर

आरोपीला जामीनावर सोडण्यात येईल.

(३) जेव्हा सात वर्ष किंवा त्याहून अधिक असू शकेल इतक्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असा अपराध किंवा भारतीय दंड संहिता (१८६० चा ४५) प्रकरण ६वे, प्रकरण १६ वें किंवा प्रकरण १७ वे या खालील अपराध किंवा अशा कोणत्याही अपराधाचे अपप्रेरण किंवा असा अपराध करण्याचा कट अगर प्रयत्न केल्याचा आरोप किंवा वहीम असलेल्या व्यक्तीची पोट कलम (१) खाली जामिनावर सुटका झाली असेल तेव्हा न्यायालय अशा शर्ती घालील की -

(अ) अशी व्यक्ती, या प्रकरणांन्वये निष्पादित केलेल्या बंधपत्रातील अटीनुसार उपस्थित राहील,

(ब) अशी व्यक्ती, जी अपराध केल्याचा तिच्यावर आरोप किंवा वहीम आहे त्याच्यासारखा अपराध किंवा जो केल्याचा वहीम आहे तो अपराध करणार नाही, आणि

(क) अशी व्यक्ती ज्या कोणत्याही व्यक्तीला या प्रकरणाची वस्तुस्थिती माहित असेल तिने अशी वस्तुस्थिती न्यायालयांला किंवा कोणत्याही पोलिस अधिकाऱ्याला उघड करू नये म्हणून तिला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे प्रलोभन दाखवणार नाही, धमकी देणार नाही किंवा कोणतेही वचन देणार नाही किंवा पुराव्यामध्ये कोणतीही फिरवाफिरवं करणार नाही. आणि न्यायच्या हितासाठी

त्याला (न्यायालयाला) आवश्यक वाटतील अशा इतर शर्तीही लादील.)

(४) पोट कलम (१) किंवा (२) खाली कोणत्याही व्यक्तीची जामिनावर सुटका करणारा अधिकारी किंवा न्यायालयात तसे करण्याची आपली कारणे किंवा विशेष कारणे देखील नमूद करील.

(५) ज्या कोणत्याही न्यायालयाने पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) खाली एखाद्या व्यक्तीची जामीनावर सुटका केली असेल, ते न्यायालय त्याला तशी जरुरी वाटली तर अशा व्यक्तीला अटक करण्यात यावी, असा निदेश देऊन तिला कारावासात पाठवू शकेल.

(६) दंडाधिकाऱ्याने संपरिक्षा करण्याजोग्या कोणत्याही खटल्यात जर कोणत्याही बिंजमिनी अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्तीची संपरीक्षा त्या खटल्यात साक्षीपुरावा घेण्यासाठी नियत केलेल्या पहिल्या दिनांक पासून साठ दिवसाच्या कालावधीत समाप्त झाली नाही तर अशा व्यक्तीला संपूर्ण उक्त कालावधीत तो कैदेत असल्यास दंडाधिकाऱ्याच्या समाधाना पुरेसा होईल अशा जामिनावर सोडले जाईल मात्र तशीच काही कारणे असल्यास ती नमूद करून दंडाधिकाऱ्यांनी अन्यथा निदेश दिला तर गोष्ट

वेगळी.

(७) जर बिनजमिनी अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्तीची संपरिक्षा समाप्त झाल्यानंतर व न्यायनिर्णय दिला जाण्यापूर्वी कोणत्याही वेळी आरोपी अशा कोणत्याही अपराधाबद्दल दोषी नाही असे समजण्यास वाजवी कारणे आहेत असे न्यायालयाचे मत झाले तर, आरोपी कैदेत असल्यास त्यांने न्यायनीय ऐकण्यासाठी आपण उपस्थित राहण्याबाबत जमीनदारवीना बंधपत्र निष्पादित करून दिले की, न्यायालय त्याची सुटका करील.

(४९). वसाहतकाळात वॉरनं हेस्टिंगच्या कारवयांबद्दल महाभियोग चालविण्याचा प्रयत्न करताना सर एडमूंड बर्क यांनी ब्रायन, विल्यम जिनिंग यांनी लिहिलेल्या 'द फेमस'ओरेशन्स' मध्ये खालील प्रसिद्ध विधान केले, जे न्यूयॉर्क फंक अँड वागनल्स कंपनी १९०६ द्वारे प्रकाशित.::

> “कायदा आणि मनमानी सत्ता हे शाश्वत शत्रुत्वात आहे. मला मॅजिस्ट्रेट चे नाव द्या आणि मी मालमत्तेचे नाव देईन, मला शक्तीचे नाव द्या आणि मी संरक्षणाचे नाव देईन, कोणत्याही माणसाची मनमानी सत्ता असू शकते असे म्हणणे हि विसंगती आहे, ही धर्मविडंबना आहे आणि तो राजकारणातील दृष्टपणा आहे.

कार्यालयाच्या प्रत्येक पेटंट मध्ये कर्तव्याचा समावेश आहे. मॅजिस्ट्रेट आणखी कशासाठी अस्तित्वात आहे.? सत्तेसाठी समजा, हा कल्पनेतील मूर्खपणा आहे. न्यायधीशांना न्यायच्या शाश्वत कायद्यांद्वारे मार्गदर्शन आणि नियंत्रित केले जाते, ज्याच्या आपण सर्व अधीन आहोत. जर आपणास वाटले तर आपण आपल्या साखळ्या मोडू शकतो, परंतु आपल्याला स्वतःची ओळख करून दिली जाईल आणि शिकवले जाईल की मनुष्य कायद्याने शासित होण्यासाठी जन्माला आला आहे ; आणि जर त्याने त्या जागी इच्छेला च जागा दिली तर तो देवाचा शत्रू ठरेल."

५०. संहितेचे कलम ४३७ ही उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय व्यतिरिक्त इतर न्यायालयाद्वारे अजामीन पात्र गून्ह्याच्या बाबतीत जामिनाशी संबंधित तरतूद आहे. इथे पुन्हा जामीन हा नियम आहे, पण अपवाद तेव्हा येईल जेव्हा न्यायालय जीवा न्यायालयाचे समाधान होईल की, आरोपी मृत्युदंड किंवा जन्मठेपेच्या शिक्षेच्या गुन्ह्यात दोषी आहे याची वाजवी कारणे आहेत. त्याचप्रमाणे संबंधित व्यक्तीला मृत्युदंड किंवा जन्मठेपेची शिक्षा किंवा सात वर्ष किंवा त्याहून अधिक मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा यापूर्वी दोन किंवा अधिक वेळा दोषी ठरविण्यात आले असेल तर आरोपीला दंडाधिकाऱ्याकडून जामिनावर सोडता येणार नाही.

५१. कलम ४३७ मधील परंतुक असा आदेश देते की, आरोपी सोळा वर्षांपेक्षा कमी वयाचा असेल, आजारी असेल किंवा दुर्बल असेल किंवा महिला असेल तर त्याची दखल घेणे आवश्यक आहे. साहजिकच आरोपी व्यक्ती आजारी किंवा दुर्बल आहे, यावर न्यायालयाला स्वतःचे समाधान करावे लागते. महिलांची संबंधित प्रकरणात न्यायालयाने काही संवेदनशीलता दाखवणे अपेक्षित असते. दखलपात्र गुन्हा करणाऱ्या अनेक स्त्रिया गरीब आणि निरीक्षर असतात, याची आपण आधीच दखल घेतली आहे. बऱ्याच प्रकरणांमध्ये लहान असताना त्यांना काळजी घेण्यासाठी मुले असतात आणि मुलांना तुरुंगात राहावे लागते अशी अनेक उदाहरणे आहेत. या आकडेवारीनुसार १००० हून अधिक मुले त्यांच्या आईसह तुरुंगात राहत आहेत, ही अशी एक बाब आहे ज्याची न्यायालयाने दखल घेण अपेक्षित आहे, कारण यात आरोपीचे हितच नाही तर तुरुंगात जाण्याची अपेक्षा नसलेल्या मुलांचाही समावेश असेल. त्यांना केवळ दारिद्र्याचाच नव्हे तर गुन्हेगारीचाही वारसा मिळण्याचा गंभीर धोका आहे.

५२. कलम ४३७ अन्वये अधिकार वापरताना न्यायालयाचे अधिकार खूप मोठे आहेत. आम्ही चर्चा केलेल्या सामान्य तत्वा व्यतिरिक्त विशेष कारणांवर जामीन मंजूर करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. संहितेच्या कलम ४१ आणि ४१ अ लक्षात घेऊन या अधिकाराचा वापर करावा लागेल. तपास यंत्रणांनी किंवा न्यायालयाकडून अधिकारांचा योग्य वापर केल्यास विचाराधीन कैद्यांच्या बहुसंख्य समस्येकडे लक्ष दिले जाईल.

५३. कलम ४३७ चे परंतूक मृत्युदंड, आजीवन कारावास किंवा सात किंवा अधिक

वर्षाचा करावासाच्या शिक्षेच्या गुन्ह्याचा विचार करताना न्यायालय त्या बाबतीत सरकारी अभियोकत्याला आपली बाजू मांडण्याची संधी मिळवून देते. जरी ही तरतूद कलम ४३७ (१) मध्ये समाविष्ट असलेल्या मुख्य तरतुदींच्या विरुद्ध असल्याचे दिसले तरी, जे सकारात्मक दिशानिर्देशाने दंडाधिकाऱ्याला मृत्यूदंड किंवा आजीवन करावासाच्या शिक्षेस पात्र असलेल्या गून्ह्यासाठी दोषी व्यक्ती सोडण्यास प्रतिबंधित करते. हे जुने आहे की परांतूकांचा विचार मुख्य तरतुदींच्या प्रतिकूल परिस्थितीत करण्यात यावा. कलम ४३७ (१) (i) वेगवेगळ्या क्षेत्रात उपयोगात येते. याचा हेतू केवळ सत्र न्यायालयाद्वारे न्यायचौकशी योग्य गुन्हा वगळणे हा आहे. अशा प्रकारे, एखाद्याला संहितेच्या कलम ४३७ आणि ४३९ च्या एकत्रित वापराद्वारे ही तरतूद समजून घ्यावी लागेल कारण नंतरच्या तरतुदीत किंवा सत्र न्यायालयाद्वारे संपरिक्षा करण्यायोग्य गुन्ह्यासाठी विद्वान दंडाधिकारी वगळण्याच्या वरील तरतुदीचा पुनरुच्चार केला गेला आहे. स्थिती स्पष्ट करण्यासाठी ज्या गुन्ह्यासाठी जास्तीत जास्त शिक्षा एकतर जन्मठेप किंवा मृत्यूदंड आहे अशा गुन्ह्याचा खटला चालविण्याचा अधिकार दंडाधिकाऱ्याला मिळाला असेल तर, तसे अधिकार विद्वान दंडाधिकाऱ्यांना प्रदान केलेला असेल, तेव्हा आरोपीला कथित गून्ह्यासाठी जामीनावर सोडण्याच्या अधिकाराही वापरता येतात. या न्यायालयाने प्रल्हाद सिंग भटी वि. ए सिटी, दिल्ली, (२००१) ४ एससीसी २८०असा निर्णय दिला आहे की,

"७. जामीन मंजूर करण्याच्या अर्जावर सुनावणी करताना दंडाधिकाऱ्याचे

अधिकार ज्या गुन्ह्यात जामीन मागितला जातो त्या गुन्ह्यासाठी विहित केलेल्या शिक्षिद्वारे झाले विनियमित केले जातात. सर्वसाधारणपणे विहित केलेली शिक्षा जन्मठेपेची किंवा मृत्यूदंडाची शिक्षा असेल आणि गुन्हा केवळ सत्र न्यायालयाद्वारे संपरीक्षा करणेयोग्य असेल तर संहितेच्या कलम ४३७ मध्ये संलग्न तरतुदींद्वारे हे प्रकरण समाविष्ट केल्याशिवाय दंडाधिकाऱ्यांना जामीन देण्याचा अधिकार नाही. दंडाधिकऱ्यानच्या अधिकारतेला मर्यादा घालणाऱ्या परिसीमा या उघड आणि स्पष्ट आहेत. अर्जावर सुनावणीसाठी विचारात घेण्याची अधिकारीता गृहीत धरणे हे अधिकारतेच्या वापरापेक्षा वेगळे आहे."

५४. आम्ही मुंबई उच्च न्यायालयाच्या **बाळासाहेब सातभाई मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड विरुद्ध महाराष्ट्र राज्य आणि इतर, २०११ एससीसी ऑनलाईन बॉम. १२६१** मधील न्यायनिर्णयावर विश्वास ठेवू इच्छितो.

"१३. या टप्प्यावर "अंबारिश रंगशी पटनिगेरे विरुद्ध महाराष्ट्र राज्य" संदर्भित सुप्रा मधील या न्यायालयाचे निरीक्षण उद्दृत करणे उपयुक्त ठरेल, जे असे वाचावे -

"१७. येथे हे लक्षात घेण्यासारखे आहे की, हस्तक्षेपकर्त्याच्या विद्वान वकिलांनी असा युक्तिवाद केला की, जामीन देण्याचे अधिकार दंडाधिकाऱ्यांना नाही कारण कलम ४६७ आणि ४०९ भा.द.वी. अंतर्गत गुन्ह्यांमध्ये जन्मठेपेची शिक्षा होऊ शकते. विद्वान वकिलांच्या म्हणण्यानुसार जर गुन्ह्याची शिक्षा मृत्युदंड किंवा

जन्मठेपेचे शिक्षा असेल, तर त्यात विशेष कारणे नमूद केल्याशिवाय दंडाधिकारी कलम ४३७ (१) फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत जामीन देऊ शकत नाहीत. त्यांनी या संदर्भात प्रल्हाद सिंग भाटी वि. एनसीटी दिल्ली आणि इतर, जेटी २००१ (४) च्या एससीसी २८० यासह काही प्राधिकरणांवर विश्वास ठेवला आहे. त्या प्रकरणात कलम ३०२ अन्वये गुन्हा होता, ज्याला फाशीची शिक्षा किंवा जन्मठेपेची शिक्षा आहे आणि केवल सत्र न्यायाद्वारे न्त्रायचौकशी योग्य आहे. कलम ४०९ अन्वये गुन्ह्यासाठी जन्मठेप किंवा १० वर्ष कारावास आणि दंड अशी शिक्षा आहे. त्याचप्रमाणे कलम ४६७ अन्वये गुन्ह्यासाठी जन्मठेप किंवा १० वर्ष करावास आणि दंडाची शिक्षा देखील आहे. फौजदारी दंड संहिता मध्ये जोडलेल्या अनुसूचीच्या भाग १ नुसार जास्तीत जास्त शिक्षा जरी जन्मठेपेची असली तरी, हे दोन्ही गुन्हे प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकाराद्वारे चौकशीयोग्य आहेत. असे दिसून येते की, दंडासहिता १८६० मधील कलम ३२६ खालील गुन्ह्यासह अनेक गुन्हे आहेत ज्यामध्ये जन्मठेप किंवा कमी कालावधीसाठी तुरुंगवासाची शिक्षा देण्यात येऊ शकते आणि अशा गुन्ह्याची न्यायचौकशी प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी द्वारे केली जाते. जर दंडाधिकाऱ्याला खटला चालवण्याचा आणि न्ययनिर्णय आणि दोषसिद्धीचा किंवा दोषमुक्तीचा आदेश देण्याचा अधिकार असेल तर अशा प्रकरणांमध्ये तो जामीन मंजूर करण्याचा आदेश, जो वादकालीन स्वरूपात आहे, का देऊ शकत नाही? हे समजणे कठीण आहे.

वास्तविक फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ (१) अन्वये हे अशा गुन्ह्यांच्या संदर्भात आहे ज्यांना मृत्युदंड किंवा जन्मठेपेची पर्यायी शिक्षा होऊ शकते. जर गुन्हा जन्मठेप किंवा इतर कोणत्याही कमी शिक्षेस पात्र असेल आणि दंडाधिकाऱ्याद्वारे खटला चालविण्यायोग्य असेल तर, असे म्हणता येणार नाही की, जामीन अर्जावर विचार करण्याचे अधिकार दंडाधिकाऱ्यांना नाहीत. हे मत मांडताना तुलाराम आणि इतर वि.एम्परर २७ क्री.एल.जे. १९२६ पान १०६३, या नागपूर न्यायिक आयुक्त न्यायालयाच्या जुन्या न्यायनिर्णयाचा आणि केरळ उच्च न्यायालयाच्या सत्यान विरुद्ध राज्य १९८१ क्री. एल.जे. १३१३ मधील न्यायनिर्णयाचा मला पाठिंबा आहे, ज्यात केरळ उच्च न्यायालयाने अनेक पूर्वीच्या निकालांचा विचार केला आणि परिच्छेद ७ आणि ८ मध्ये असे निरीक्षण केले :-

"७. विद्वान दंडाधिकाऱ्यांच्या मते, जर एखाद्या व्यक्तीने फाशीची शिक्षा किंवा जन्मठेपेची शिक्षा होऊ शकेल असा गुन्हा केला आहे, असे मानण्यास वाजवी कारणे असतील तर त्याला जमिनीवर सोडण्याचा अधिकार कलम ४३७ (१) त्यांना प्रदान करत नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर विद्वान दंडाधिकाऱ्याने कलम ४३७(१) मधील "मृत्युदंड किंवा जन्मठेपेची शिक्षा होऊ शकेल असा गुन्हा" या संज्ञेचा अर्थ लावला आहे, ज्यात सर्व गुन्ह्याचा समावेश आहे जेथे

शिक्षा जन्मठेपेपर्यंत वाढू शकते. फौजदारी प्रक्रिया संहिता १८९८ मधील कलम ४९७ मधील वाक्यरचना "मृत्यू किंवा आजीवन कारावासासह शिक्षापात्र गुन्हा" चा अर्थ लावताना ही कारणमिमांसा नि:संशयपणे जुन्या रंगून प्रकरण एच. एम. बौडविले विरुद्ध एम्परर, एआयआर १९२५ १२९ : (१९२५) २६ फौ.एलजे ४२७ मधून अवलंबलेला दिसत आहे. परंतु ते प्रकरण मोहम्मद युसुफ वि. एआयआर वि. एम्परर १९२६ रंगून ५१ (१९२६) २७ क्री.एलजे च्या पासून असहमती होती. रंगून उच्च न्यायालयाने असे म्हटले आहे की, जामीन देण्यास मनाई अशा प्रकरणांपुरती मर्यादित आहे जिथे शिक्षा एक तर मृत्यू किंवा पर्यायी आजीवन करावास आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर जुन्या संहितेच्या कलम ४९७ मधील "मृत्युदंड किंवा आजीवन कारावास" हे वाक्य केवळ आजीवन करावासाच्या शिक्षापत्र गुन्ह्यापर्यंत नाही, उपरोक्त निकालपत्रामधील खाली नमूद परिच्छेदांची नोंद घेणे महत्त्वाचे ठरेल.

> "निव्वळ प्रायोगिक तत्त्वापेक्षा, जन्मठेपेची शिक्षा असलेल्या गुन्ह्यांना दीर्घ कारावासाची शिक्षा असलेल्या गुन्ह्यांपासून कोणत्या तत्त्वाने वेगळे करावे हे पहाणे अवघड आहे ; उदा. चोरी करण्याच्या उद्देशाने घरात घुसेकोरी केल्याचा आरोप असलेल्या स्थानबद्ध आरोपीला, ज्या गुन्ह्यासाठी १४ वर्षाचे शिक्षा आहे अशा आरोपीला, चोरीची मालमत्ता अप्रमाणिकपणे

मिळवलेल्या व्यक्तीच्या तुलनेत, जी मालमत्ता दरोडाद्वारा प्राप्त केली आहे याची माहिती असताना प्राप्त केली आहे, ज्याकरता आजीवन कारावासाची शिक्षा होऊ शकते, त्याला विशेष अनुकूलता का देण्यात यावी. संभाव्य शिक्षेच्या हुकुमातील तुलनेने थोडासा फरक असल्याने अटक करण्यात आलेली व्यक्ती दुसऱ्या प्रकरणापेक्षा एका प्रकरणात हजर राहण्याची शक्यता नैतिकदृष्ट्या कमी होईल असा युक्तिवाद गांभीर्याने केला जाऊ शकत नाही. दुसरीकडे आजीवन कारावास आणि मृत्युदंड यातील फरक इतका मोठा आहे की तो मोजता येणार नाही. त्यामुळे विवेकी कायदेमंडळ मॅजिस्ट्रेटसी प्रकरणे (दंडाधिकारी समक्ष) प्रकरणांचे (न्यायविवेक बुद्धीपासून माघार). ज्यात जर गुन्हा होण्याची शक्यता असेल तर त्यातून माघार घेईल, कारण अत्यंत धैर्यवान माणूस ही भौतिक किंमत, कितीही महाग असली तरीही आजन्म मोजण्यासाठी इच्छा बाळगू शकतो.,"

तुलाराम विरुद्ध एम्परर, (एआयआर १९२७ नाग. ५३) : (१९२६) २७ क्री. एलजे १०६३) ज्या प्रकरणात नागपूर उच्च न्यायालयाने वरील निर्णयाचे पालन केले आहे.

“८. "मृत्युदंड किंवा जन्मठेप शिक्षापात्र गुन्हा" या वाक्याचा अर्थ लावताना कारणमिमांसा (तर्क) समान शक्तीने लागू होतो, जोपर्यंत कलम ३२६ अंतर्गत गुन्हा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी द्वारा संपरीक्षा योग्य

आहे तोपर्यंत त्याला वेगळ्या दृष्टीने कलम ४२० भारतीय दंड संहिता अंतर्गत गुन्ह्यात जामीन मंजूर करण्याच्या प्रकरणात वेगळ्या पद्धतीने पाहण्याचे कारण नाही, ज्या गुन्ह्यात ७ वर्षांपर्यंत कारावास वाढू शकतो किंवा इतर कोणत्याही अजामीनपात्र गुन्ह्यासाठी ज्याची शिक्षा कारावासाची मुदत आहे."

असे म्हणणे अतार्किक आणि अनाकलनीय नाही असे ठरेल की, जो दंडाधिकारी कलम ३२६, ४०९, ४६७ इ. अन्वये गुन्ह्यांमध्ये जन्मठेपेची किंवा त्यापेक्षा कमी कारावसाची शिक्षा होऊ शकणाऱ्या गुन्ह्यासाठी खटला चालवू शकतो आणि दोषसिद्धी किंवा दोषमुक्तीचा आदेश देऊ शकतो, अशा गुन्ह्यांमध्ये तो जामीन अर्जावर विचार करू शकत नाही. वास्तविक असे दिसून येते की, कलम ४३७(१) (अ) अंतर्गत निर्बंध केवळ अशा प्रकरणांना लागू आहे ज्यांना पर्यायी शिक्षा म्हणून मृत्युदंड किंवा जन्मठेपेची शिक्षा आहे. हे लक्षात घेतले पाहिजे की प्रल्हाद सिंग भाटी (सुप्रा) मधील परिच्छेद ६ मध्ये सर्वोच्च न्यायालयानी असे म्हटले आहे की, एखाद्या गून्ह्यासाठी अटक केलेल्या व्यक्तीचा जामीन मंजूर करण्याच्या अर्जावर विचार करण्यास दंडाधिकाऱ्याला कोणताही कायदेशीर अडथळा नसला तरीही, अशी प्रकरणे जी केवळ सत्र

न्यायालयाद्वारा चालवली जातात,अशा प्रकरणात दंडाधिकारी आरोपी व्यक्तीला जामीनमुक्त होण्याकरता सत्र न्यायालयत जाण्याचे निर्देश देतात, हे योग्य आणि समुचित ठरेल. हे बऱ्याच प्रकरणांना लागू होऊ शकते ज्यात केवळ जन्मठेपेची नाही तर असे गुन्हे जे केवळ सत्र न्यायालयाद्वारा संपरिक्षायोग्य आहे उदा. कलम ३०६, ३०८, ३१४, ३१५,३१६,३९९,४०० आणि ४५० अंतर्गत शिक्षायोग्य गुन्ह्यांमध्ये दिल्या जाणारा शिक्षेच्या गुन्ह्यांच्या प्रकरणांना लागू होऊ शकते. कायदेशीर स्थितीचा विचार करता हस्तक्षेपकर्त्यांचे विद्वान वकील श्री. भट यांच्या युक्तीवादात मला कोणतेही तथ्य आढळत नाही की, केवळ गुन्हा भा.दं.सं. कलम ४०८आणि ४६७ अंतर्गत आहे म्हणून न्यायदंडाधिकाऱ्यांना सुनावणी आणि जामीन मंजूर करण्याचा अधिकार नाही.

१४. ईशान वसंत देशमुख विरुद्ध महाराष्ट्र शासन, संदर्भित सुप्रा मधील या न्यायालयाच्या निरीक्षणांचा संदर्भ घेणेदेखील उपयुक्त ठरू शकेल, जे खालील प्रमाणे आहे.

"सर्वोच्च न्यायालयाचे निरीक्षण जे सर्व साधारणपणे सांगावयाचे तर,जर निर्धारित केलेली शिक्षा जन्मठेपेची किंवा मृत्युदंडाची असेल तर आणि गुन्हा केवळ सत्र न्यायालयाद्वारा चालवणे योग्य असेल तर दंडाधिकाऱ्यास, सहितेच्या कलम ४३७ ला असलेल्या परंतुका मधील येणाऱ्या प्रकरणाशिवाय, जामीन मंजूर करण्याचा

अधिकार नाही. अशाप्रकारे गुन्हा केवळ जन्मठेप शिक्षापात्र आहे, म्हणून तो दंडाधिकाऱ्यास जामीन मंजूर करण्याचा अधिकार नाही या गोष्टीचे पालन करतो जोपर्यंत गुन्हा सुद्धा केवळ सत्रन्यायालयद्वारा संपरिक्षायोग्य (चालविण्यायोग्य) आहे तोपर्यंत. यावरून असे अभिप्रेत आहे की, दंडाधिकाऱ्यास केवळ त्याच्याद्वारा संपरीक्षायोग्य प्रकरणात जामीन मंजूर करण्याचा अधिकार असेल जरी विहित केलेली शिक्षा जन्मठेपेपर्यंत वाढू शकते. प्रल्हाद सिंह भाटी प्रकरणातील सदर न्यायनिर्णय महाराष्ट्र राज्य वि. राजकुमार कुंदास्वामी ज्या न्यायाधीशाने निर्णित केली आहे त्या न्यायाधीशांसमोर मांडण्यात आला नाही. जर हा निर्णय निकाल देणाऱ्या माननीय न्यायमूर्तींनी प्रकरणात निर्णय देताना लक्षात घेतला असता तर त्यांनी कदाचित असे निरीक्षण मांडले नसते की, दंडाधिकारी जामीन अर्जावर निर्णय देऊ शकत नाही, जर गुन्हा जन्मठेपेच्या शिक्षापात्र असेल तर. प्रल्हाद सिंग भाटी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने केलेली निरीक्षणे लक्षात घेत आहे स्पष्ट आहे की, जे. एच भाटिया (न्या.) द्वारा अंबरीश रंगशाही पटनिगरे विरुद्ध महाराष्ट्र राज्य २०१०, एएलएल एम.आर. (क्री.) २७७५ मध्ये प्रसिद्ध प्रकरणात घेतलेला दृष्टीकोन सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी सुसंगत आहे आणि म्हणून दंडाधिकाऱ्यास जामीन मंजूर करण्याचा अधिकार असेल.

५५. अशाप्रकारे आम्ही उपरोक्त स्थितीचा पुनरुचार करू इच्छितो, जेणेकरून ज्या न्यायदंडाअधिकाऱ्यांना जास्तीत जास्त जन्मठेपेची किंवा मृत्युदंड्याची शिक्षा देण्याची तरतूद असलेल्या फौजदारी खटल्याचा खटला चालवण्याचा अधिकार आहे, अशा न्यायदंडाधिकाऱ्यांना जामिनावर सुटण्याचा विचार करण्यासाठी पुरेसे अधिकारक्षेत्र आहे.

<u>संहितेचे कलम ४३९</u>

"४३९. जामिनाविषयी उच्च न्यायालयाचे किंवा सत्र न्यायालयाचे विशेष अधिकार .

(१) उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय :

(अ) एखाद्या अपराधाच्या आरोपावरून जो हवांलतीत असेल अशा व्यक्तीची जामिनावर सुटका करावी असा निदेश देऊ शकेल, आणि अपराध कलम ४३७ च्या पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाचा असेल तर, त्या पोटकलमात नमूद केलेल्या प्रयोजनांसाठी त्याला जरुरीची वाटेल अशी कोणतीही शर्त लादू शकेल.

(ब) कोणत्याही व्यक्तीची जामीनावर सुटका करताना दंडाधिकाऱ्याने लादलेली एखादी शर्त रद्द करावी किंवा तीत फेरफार करावीअसा निदेश देऊ शकेल.

परंतु, केवळ सत्र न्यायालयाने संपरीक्षा करणायोग्य किंवा याप्रमाणे संपरीक्षायोग्य नसला तरी जो आजीव कारावासाच्या शिक्षेस पात्र आहे अशा अपराधाचा आरोप असलेल्या एखाद्या व्यक्तीला जामीन मंजूर करण्यापूर्वी उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय सरकारी अभियोक्त्याला जमिनीच्या अर्जाची नोटीस देईल, मात्र अशी नोटीस देणे व्यवहारी नाही असे त्याचे मत असल्यास ते त्याची कारणे लेखी नमूद करील.

(२) उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय ज्या कोणत्याही व्यक्तीला या प्रकरणाखाली जामिनावर सोडण्यात आले असेल तिला अटक करण्यात यावी असा निदेश देऊन तिला हवालतीत पाठवू शकेल.

५६. कलम ४३९ उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालयाला जमीनाबाबत अधिकार प्रदान करते. या अधिकाराचा वापर संहितेच्या कलम ४३७ अन्वये अधिकार वापरणाऱ्या न्यायदंडाअधिकाऱ्याच्या आदेशाविरुद्ध किंवा विशेषतः सत्र न्यायालयाने चालविण्यायोग्य प्रकरणात करावयाचा आहे. पूर्वीच्या प्रकरणांच्या संचामध्ये, आम्ही केलेली निरीक्षणे कलम ४३९ अन्वये अधिकाराच्या वापरावरही लागू होतील.

५७. विशेष म्हणजे कलम ४३९ च्या दुसऱ्या परंतुकात, त्या अंतर्गत नमूद केलेल्या गुन्ह्यांचा संचाकरिता सरकारी अभियोक्त्यावर १५ दिवसांच्या कालमर्यादेत अर्जाची नोटीस बजावणी विहित केले आहे. त्याचप्रमाणे उपकलम (१)(अ) च्या परंतुकान्वये जामीन अर्जाची नोटीस, सरकारी अभियोक्ता तसेच खबर देणारा किंवा त्याच्या द्वारा

अधिकृत व्यक्तीस जामीनावर सुनावणीच्या वेळी देणे बंधनकारक आहे. हे कायद्याचे आदेश असल्याने त्याची पूर्तता होते आहे की नाही हे उच्च न्यायालय आणि सत्र न्यायालयाने पहावे.

५८. संहितेचे कलम ४३७ केवळ सत्रा न्यायालयाद्वारे जन्मठेपेची किंवा मृत्यूदंडाची शिक्षा होऊ शकणाऱ्या गुन्ह्याचा अपवाद वगळता जामीनासाठीच्या अर्जावर विचार करताना सर्व गुन्ह्यातील प्रकरणे हाताळण्याचा अधिकार दंडाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. या आधी चर्चा केल्यानुसार, पहिल्या परंतुकान्वये जर आरोपी १६ वर्षांपेक्षा कमी वयाचा असेल किंवा एक महिला असेल किंवा आजारी किंवा दुर्बल असेल तर त्याला सशर्त जामीनावर सोडण्याची न्यायालयाला सुविधा देते. हा एक कल्याणकारी कायदा असला तरी, परंतुकाद्वारे जरी तो आणला गेला असला तरी, सत्र न्यायालय किंवा उच्च न्यायालयाकडून जामीनावर सुटण्याचा विचार करताना प्रकरणानुसार लागू करावा लागतो. संहितेच्या कलम ४३९ मधील शक्तीचा वापर जामीन अर्ज फेटाळण्याच्या आदेशाविरुद्ध आणि विशेषतः सत्र न्यायालयाने दिलेल्या गून्ह्याविरुद्ध केला जातो. कलम ४३९ अंतर्गत अधिकाराचा वापर करताना कलम ४३७ च्या परंतुकांच्या अंतर्गत असलेला अर्ज विभाजित करता येणार नाही. कल्याणकारी कायदे हाताळताना, गरजू व्यक्तीला फायदा मिळवून देणारा हेतूपूर्ण अर्थ लावणे, ही न्यायालयाची भूमिका आहे. आम्ही हे सांगू इच्छित नाही की या परंतुकांच्या सर्व प्रकरणांमध्ये अनुकूलपणे विचार केला गेला पाहिजे, कारण अर्ज त्यातील तथ्ये आणि परिस्थितीवर अवलंबून आहे. इतर घटकांसह

या परंतुकांचा न्यायालयाद्वारे पूर्णपणे विचार करणे आवश्यक आहे.

संहितेचे कलम ४४०

"४४०. बंधपत्राची रक्कम व ती कमी करणे.

(१) या प्रकरणाखाली निष्पादित केलेल्या प्रत्येक बंधपत्राची रक्कम प्रकरणाच्या परिस्थितीचा योग्य तो विचार करून नियत केली जाईल व ती अत्याधिक असता कामा नये.

(२) पोलीस अधिकाऱ्याने किंवा दंडाधिकाऱ्याने आवश्यक केलेला जामीन कमी करावा असे उच्च न्यायालय किंवा सत्र न्यायालय निदेशित करू शकेल.

(५९) कलम ४४० च्या मागचा उद्देश हाताळण्यासाठी युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका मध्ये अवलंबलेली काही पूर्वोदाहरणे आणि कायदे लक्षात घेणे आवश्यक आहे.

६०. इलिनॉय राज्यात जामीन मंजूर करताना वॉरंटच्या अंमलबजावणीतील मुख्य घटक म्हणून आवश्यक खर्चाची अट काढून टाकण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेण्यात आला, कारण अशी अट स्वातंत्र्याचा अपमान आहे आणि त्यामुळे अटक केलेल्या व्यक्तीच्या मूलभूत अधिकारांवर परिणाम होतो. जर एखाद्या व्यक्तीला त्याच्या नियंत्रणा बाहेरच्या परिस्थितीमुळे अटींचे पालन करण्यास सक्षम नसेल आणि अशा प्रकारे त्याला दिलेल्या जामीनाची फळ उपभोगणे अशक्य होत असेल तर हे नक्की अन्यायाचे कृत्य आहे.

जामीन मंजूर करण्यामागील उद्देश हा लादलेल्या अटीनपेक्षा वेगळा आहे. इलिनॉय राज्याने या गोष्टीची नोंद घेतली की, कैद्याला परिवर्धनाकरता रोख रक्कम भरण्याची पूर्व अटीची पूर्तता करण्यास भाग पाडू शकत नाही आणि त्यामुळे ती काढून टाकण्यात आली.

६१. जेव्हा अशा कठीण स्थितीला या आधारावर आव्हान दिले गेले की, ते आर्थिक क्षमता नसलेल्या व्यक्तीच्या श्रेणीवर परिणाम होतो, त्यांना तात्पुरती सवलत देण्यात आली असूनही त्यांना तुरुंगवासात राहण्यास भाग पाडले जाते, ज्यामुळे त्यांना स्वातंत्र खटला चालविण्यास सक्षम केले जाते. इन रे केनेथ हमफ्रे एस २४७२७८; ४८२ पी ३ डी १००८ (२०२१) मध्ये कॅलिफोर्नियाच्या सर्वोच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले की, हे उद्दिष्ट गमावले गेले आहे आणि त्याचा परिणाम बचावाच्या तयारीत होईल, कारण न्यायालयाचे असे मत होते की अशा कठीण परिस्थिती कायद्याच्या नजरेत टिकू शकत नाहीत. निवाड्याचे संबंधित परिच्छेद येथे पुन्हा सादर केले आहेत.

चार

..... खटलापूर्व सुटका आणि अटक यातील निवड करताना आम्ही हे ओळखतो की, निरपेक्ष निश्चितता - विशेषतः खटलापूर्व टप्प्यावर जेव्हा खटला दोषी किंवा निर्दोष ठरविण्यासाठी प्रलंबित असेल, त्यातून सर्व अशक्य सिद्ध होईल. हे निर्णय घेणाऱ्या न्यायालयाने सार्वजनिक किंवा पिडीतांच्या सुरक्षितेला किंवा

न्यायालयीन प्रक्रियेच्या अखंडतेला असलेल्या जोखमीवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. (पहा स्टॅक विरुद्ध बॉयल (१९५१) ३४२ यू.एस. १,८ (conc.opn. सजॅक्सन जे चे)(" जामीन मंजूर करण्याच्या प्रक्रियेत आरोपी पलायन करण्याची जोखीम नेहमीच असते, ही एक गणना केलेली जोखीम आहे. ज्याची किंमत म्हणून आपल्या न्यायप्रणालीची किंमत म्हणून घेतो) cf सेलेनो सुप्रा ४८१ यु एस पृष्ठ ७५१ वर (अटक केलेल्या व्यक्तीच्या " एखाद्या व्यक्तीला किंवा समुदायाला ओळखल्या जाणारा या आणि संभाव्य धोक्याची चर्चा करणे)

जरी जामीन निर्धाराने वरील पूर्व अटींची पूर्तता केली तरीही न्यायालयाने विचार केला पाहिजे की, खटलापूर्व अटकेच्या आदेशामुळे स्वतंत्र्यापासून वंचित राहणे, विशेषतः जामीनाकडे लक्ष देणाऱ्या राज्य वैधानिक आणि संविधानिय कायद्याशी सुसंगत आहे की नाही - हा प्रश्न येथे सोडविण्यात आला नाही -आणि कायद्याच्या प्रक्रियेनुसार- आणि योग्यप्रक्रिये सह. योग्य प्रक्रिया सरकारला खटल्याच्या आधी अटकेचा आदेश देण्यासाठी स्पष्टपणे प्रतिबंधित केले जात नाही, तरी हे खरे आहे की "(१) आपल्या समाजात स्वातंत्र हा आदर्श आहे आणि खटल्यापूर्वी किंवा खटल्याशिवाय स्थानबद्धतेत ठेवणे हा काळजीपूर्वक मर्यादित अपवाद आहे." (सालेमो, सूप्रा ,४८१ यू. एस. पृष्ठ ७५५ वर)

पाच

अत्यंत महत्त्वाच्या बाबतीत, कॅलिफोर्नियाचा कायदा फेडरल राज्यघटनेची सुसंगत आहे. "स्वातंत्र्य हा आदर्श आहे आणि खटल्यापूर्वी किंवा खटल्याशिवाय ताब्यात ठेवणे हा काळजीपूर्वक मर्यादित अपवाद आहे." (सालेनो, सुप्रा ४८१ यु. एस. पृष्ठ ७५५ वर). जोपर्यंत न्यायालयाने वैयक्तिकरित्या निर्धार केला नाही तोपर्यंत, अटक केलेल्या व्यक्तीला खटला प्रलंबित असेपर्यंत कोठडीत ठेवता येणार नाही. (१) अटक केलेल्या व्यक्तीकडे पैसे देण्याची आर्थिक क्षमता आहे, परंतु तरीही जामीनाची रक्कम भरण्यात अयशस्वी ठरला, जी सक्तीच्या सरकारी हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी न्यायालयाला आवश्यक वाटते किंवा (२) बळी किंवा सार्वजनिक सुरक्षेचे रक्षण करण्यासाठी किंवा उत्तरवादीचे स्वरूप सुनिश्चित करण्यासाठी ताब्यात घेणे आवश्यक आहे आणि कोणताही कमी प्रतिबंधात्मक पर्याय त्या हितसंबंधांना वाजवीपणे पुष्टी देणार नाही याचा स्पष्ट आणि खात्रीलायक पुरावा आहे. (हम्प्रे सुप्रा १९ कॅल.ऍप.पाचवा पृष्ठ १०२६ वर पहा). पीडित आणि सार्वजनिक सुरकक्षेच्या कारणास्तव विशिष्ट आणि विश्वासार्ह संवैधानिक मर्यादेच्या अधीन राहून पूर्व सुनावणी कैदेत ठेवणे हे आमच्या फौजदारी न्यायव्यवस्थेचे मुख्य घटक आहे. प्रतिवादी त्या अटींची पूर्तता करू शकतो की नाही किंवा कमी प्रतिबंधात्मक पर्यायाद्वारे राज्याच्या हिताची पूर्तता केली जाऊ शकते की नाही, याचे कधीही मूल्यांकन न करता अटक केलेल्याच्या आर्थिक संसाधनांवर अशा अटकेची अट घालणे हे योग्य नाही.

६२. कलम ४४० अन्वये प्रकरण 33 अंतर्गत निष्पादित केलेल्या प्रत्येक बंधपत्राची रक्कम प्रकरणाच्या परिस्थितीचा योग्य तो विचार करून निश्चित केली जाईल आणि ती अत्याधिक असता कामा नये. ही एक हितावाह तरतूद आहे जी लक्षात ठेवली पाहिजे. लादलेल्या अटी सर्व बाबतीत यांत्रिक आणि एक समान नसतील. खटल्यातील परिस्थिती विचारात घेणे आणि त्याचा अतिरिक होत नाही याचे स्वतःचे समाधान करणे हे न्यायालयाचे अनिवार्य कर्तव्य आहे. ज्याचे पालन करणे अशक्य आहे अशी अट लादणे म्हणजे सुटकेच्या उद्देशालाच पराभूत करणे होय. यासंदर्भात आम्ही इतकेच म्हणू की, संहितेचे कलम ४३६, ४३७, ४३८ आणि ४३९ हे सुसंगतपणे वाचावयाचे आहेत. बंधपत्र आणि जमीन यांची वाजवीता ही अशी गोष्ट आहे ज्याचा जेव्हा जेव्हा आग्रह धरला जातो तेव्हा कोर्टाने लक्षात ठेवावे आणि म्हणून संहितेच्या कलम ८८ नुसार अधिकार वापरताना ही वस्तुस्थिती लक्षात ठेवली पाहिजे. या न्यायालयाने **हुसेननारा खातून आणि इतर विरुद्ध गृहसचिव, बिहार राज्य** १९८०(१) एस सीसी ८१ मध्ये असा निर्णय दिला आहे की :

> ८. खटल्याच्या प्रतीक्षेत असलेल्या कैद्याला जामिनीवर सोडण्याच्या किंवा जामीन न घेता त्याच्या उपस्थितीकरिता, वैयक्तिक मुचलक्यावर सोडण्याच्या न्यायालयीन अधिकाराच्या वापरासंदर्भात मला हे थोडक्यात सांगावे लागेल. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या विद्यमान तरतुदींमध्ये या संदर्भात भरपूर अधिकार आहेत आणि ते वापरताना त्यांच्या विवेकबुद्धीचे स्वरूप आणि मर्यादेची पूर्णपणे

ओळख करून देणे न्यायालयाचे काम आहे अधिकाराचा यांत्रिक प्रयोग करणे आता शक्य नाही, असे मला वाटते. बंधपत्रात कितपत सुरक्षा हवी किंवा आर्थिक दायित्व किती असावे अशा अनेक घटकांचा काळजीपूर्वक विचार करण्याची गरज आहे. संपूर्ण उद्देश किंवा विचाराधीन कैदी पळून जाऊ नये किंवा खटल्यापासून लपून राहू नये हीच आहे. या प्रश्नाच्या निर्णयात येणारे सर्व समर्पक विचार विचारात घेतले पाहिजेत. (कलम ४४०, फौ. प्र. सं.) विचार काय असू शकतात याची संक्षिप्त कल्पना १९६६ च्या युनायटेड स्टेट बेल रिफॉर्म अधिनियम मधील खालील तरतुदींवरून काढता येईल.

> सुटकेच्या कोणत्या अटींमुळे हजर राहण्याची खात्री होईल हे ठरविताना, न्यायालयीन अधिकारी उपलब्ध माहितीच्या आधारे, आरोप केलेल्या गुन्ह्याचे स्वरूप आणि परिस्थिती, आरोपी विरुद्धच्या पुराव्यांचे वजन, आरोपीचे कौटुंबिक संबंध, रोजगार, आर्थिक संसाधने, चारित्र्य आणि मानसिक स्थिती, समाजातील त्याच्या वास्तव्याचां अवधी विचारात घेईल, त्याच्या शिक्षेची नोंद आणि खटला टाळण्यासाठी किंवा न्यायालयीन कामकाजात हजर राहण्यात अपयश हे ठरवण्यासाठी न्यायालयीन कामकाजात किंवा खटल्यापासून परागंदा किंवा न्यायालयीन कार्यवाहीतून हजर राहण्यास कसूर याची नोंद (१८ यूएस एस ३१४६

(बी)).

सुरक्षेची किंवा आर्थिक दायित्वाची रक्कम निश्चित करताना हे विचार लक्षात घेतले पाहिजेत. कदाचित असे केल्यास भारतातील खटलापूर्व सुटकेच्या प्रचलित पद्धतीवरील अनुपस्थिती टाळता येतील किंवा कोणत्याही परिस्थितीत खूप कमी होऊ शकतील. पहा मोतीराम वि. म. प्र. राज्य ((१९७८) ४ एससीसी ४७)"

<u>प्रवर्ग अ आणि ब</u>

६३. आम्ही आधीच संबंधित तरतुदी हाताळल्या आहेत ज्यात अ आणि ब प्रवर्गाची काळजी घेतली जाईल. पुनरावृत्तीच्या किमतीवर, आम्ही हे सांगू इच्छितो की, प्रवर्ग अ मध्ये आरोपीच्या बाजूने न्यायालयाच्या विवेकबुद्धीचा अधिक चांगला वापर अपेक्षित आहे. ब वर्गात आल्यावर कायद्याचे सर्वसाधारण तत्व आणि तरतुदी लक्षात घेऊन आमच्या द्वारे चर्चा केल्याप्रमाणे ही प्रकरणे पुन्हा प्रकरण निहाय तत्वावर हाताळावे लागतील.

<u>विशेष कायदे प्रवर्ग क</u>

६४.आता आपण प्रवर्ग (क) मध्ये येउ. प्रत्येक विशेष कायद्यामागे एक उद्दिष्ट असते, मागे लादलेली कठोरता असते म्हणून आम्ही वैयक्तिक कायद्यांना सामोरे जाऊ इच्छित नाही. विलंबाचे सामान्य तत्व या प्रवर्गांनाही लागू होईल. संहितेच्या कलम ४३६ अ मधील तरतुदी कोणत्याही विशिष्ट तरतुदी अभावी विशेष अधिनियमांनाही लागू होतील,

हे स्पष्ट करण्यासाठी. उदाहरणार्थ, एनडीपीएस कायद्याच्या कलम ३७ अन्वये दिलेली कठोरता अशा प्रकरणात आड येणार नाही कारण आपण एखाद्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा विषय हाताळत आहोत. आम्हाला असे वाटते की, जेवढी कठोरता असेल, तितका निर्णय लवकर व्हायला हवा. शेवटी, या प्रकारच्या प्रकरणांमध्ये साक्षीदारांची संख्या खूपच कमी असेल आणि खटला लंबविण्याकरिता कोणतेही समर्थन असू शकत नाही. कदाचित या प्रक्रियेला गती देण्यासाठी आणि संहितेच्या कलम ३०९ चे काटकरपणे पालन करण्यासाठी या न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करण्याची आवश्यकता आहे.

<u>पूर्वीदाहरणे</u> :

***भारत संघ वि. के.एन. नजीब (२०२१) 3 एससीसी ७१३ :**

"१५. या न्यायालयाने अनेक निकालांमध्ये स्पष्ट केले आहे की, घटनेच्या भाग ३ ने दिलेले स्वातंत्र्य केवळ योग्य प्रक्रिया आणि निष्पक्षताच नव्हे तर न्याय आणि जलद सुनावणीसाठी प्रवेश देखील आपल्या संरक्षणात्मक कक्षेत समाविष्ट करेल. सर्वोच्च न्यायालयात विधी सहाय्य समिती (न्यायचौकशीअधीन कैद्यांचे प्रतिनिधत्व) वि. भारत संघ (सर्वोच्च न्यायालय कायदेशीर सहाय्यता समिती) (न्यायचौकशीअधीन कैद्यांचे प्रतिनिधित्व) विरुद्ध भारत सरकार, (१९९४) ६ एसएससी ७३१, परिच्छेद १५ : १९९५ एससीसी (क्री) ३९) यात असा निर्णय दिला गेला की, न्यायचौकशीअधीन कैद्यांना खटला होईपर्यंत अनिश्चित

काळासाठी ताब्यात ठेवता येणार नाही. आदर्शपणे, तटस्थ लावादासमोर त्याचे कृत्य सिद्ध झाल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला त्याच्या कृत्याचे प्रतिकूल परिणाम भोगावे लागू नयेत. तथापि, प्रभावी खटला चालविण्यासाठी आणि संभाव्य गुन्हेगार खटला प्रलंबित असताना परागंदा झालेला असेल तर, समाजाला होणारा धोका कमी करण्यासाठी, वास्तविक जीवनातील व्यावहारिकतेमुळे एखाद्या व्यक्तीला खटला प्रलंबित असेपर्यंत सोडावयाचे की नाही हे ठरविण्याची जबाबदारी न्यायालयांवर आहे. वेळेवर खटला चालविणे शक्य होणार नाही आणि आरोपीला बराच काळ तुरुंगवास भोगावा लागला आहे, हे स्पष्ट झाल्यानंतर त्यांना जामीनावर वाढविणे न्यायालयांना बंधनकारक असेल.

*__सर्वोच्च न्यायालय विधी सेवा समिती वि. भारत संघराज्य (१९९४) ६ एससीसी ७३१ :__

"१५. ...वस्तुतः, याचिकाकर्त्याने आता विनंती केली आहे की, कायद्यांतर्गत कोणताही गुन्हा किंवा गुन्हे घडल्यामुळे दोन वर्षाहून अधिक कालावधीसाठी तुरुंगात असलेल्या सर्व न्यायचौकशी अधीन कैद्यांना त्यांची पुढील स्थानबद्धता बेकायदेशीर आणि अवैद्य ठरवून ताबडतोब तुरुंगातून सोडण्यात यावे आणि या मोठ्या मुद्द्यावर या न्यायालयाचा निर्णय प्रलंबित आहे. त्यांना कोणत्याही परिस्थितीत जामीनावर सोडण्यात यावे हे सत्य आहे आणि कायद्याच्या कलम ३६(१) एकच्या साध्या भाषेतून हे स्पष्ट होते की, या कायद्यांतर्गत कोणताही गुन्हा

घडल्याबद्दल खटला चालविणाऱ्यांच्या खटल्याला गती देण्यासाठी विधिमंडळाने विशेष न्यायालयांच्या निर्मितीचा विचार केला. संहितेच्या कलम ३०९ चा उद्देशही असाच आहे, हेही तितकेच खरे आहे. अनुच्छेद १४,१९ आणि २१ एकमेकांना टिकवून ठेवतात आणि त्यांचे सहाय्य करतात. यावर या न्यायालयाने अनेक निर्णयांमध्ये भर दिला आहे आणि एखाद्या व्यक्तीला वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित ठेवणार या कोणत्याही कायद्याने न्यायी, रास्त आणि वाजवी, म्हणजे जलद खटल्याला प्रोत्साहन देणारी प्रक्रिया निश्चित केली पाहिजे, हे देखील खरे आहे. पहा हुसेनारा खातून (चार) वि. गृहसचिव, बिहार राज्य (१९८०) १ एससीसी ९८: १९८० एससीसी (क्री) ४०) रघुबिर सिंग विरुद्ध बिहार राज्य (१९८६) ४ एससीसी ४८१ : १९८६ एससीसी (क्री.) ५११) आणि काद्रा पहाडिया विरुद्ध बिहार राज्य (१९८३) २ एससीसी १०४ : १९८३ एससीसी (क्री.) ३६१) फक्त काही उद्दृत करण्यासाठी. कायद्याच्या कलम ३६ (१)चे उद्दिष्ट हेच आहे. परंतु राज्य सरकारने बृहन्मुंबईत पुरेशा संख्येने विशेष न्यायालये स्थापन करण्यास विलंब केल्याने हा प्रशंसनीय उद्देश फसला. पहिल्या दोन विशेष न्यायालयांच्या स्थापनेची प्रक्रिया ४/१/१९९१ रोजी कलम ३६(१) अन्वये अधिसूचना काढून आणि ६/४/१९९१ रोजी कलम ३६ (२) अन्वये सुमारे दोन वर्षांनीअधिसूचना काढून सुरू झाली, जेव्हा दुरुस्ती कायदा १९८९ चा २ प्रभावी झाला. या कायद्यांतर्गत गुन्ह्यांच्या सुनावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या न्यायालयांची

संख्या पुरेशी नसल्याने आणि या न्यायालयांच्या देखरेखीसाठी न्यायाधीशांच्या नियुक्ती लांबनीवर पडल्याने खटले वाढले आणि जामिना वरील मुदतवाढी संदर्भातील तरतुदी कडक असल्याने गुन्हेगारांना खटल्याअभावी तुरुंगात राहावे लागत आहे. या कायद्याच्या कलम ३७ नुसार प्रत्येक शिक्षापत्र गुन्हा दाखलपात्र व अजामीनपात्र ठरतो आणि अशी तरतूद आहे की पाच वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक कालावधीसाठी दंडनीय गुन्ह्यातील कोणत्याही आरोपीला जामीनावर सोडता येणार नाही जोपर्यंत (१) सरकारी अभियोक्त्याला जामीनाला विरोध करण्याची संधी मिळाली नाही आणि (२)विरोध झाल्यास, तो गुन्ह्यात दोषी नाही आणि तत्सम कृत्यात सामील होण्याची शक्यता नाही. यावर विश्वास ठेवण्यास वाजवी कारणे आहेत याबद्दल न्यायालय समाधानी झाल्यास या तरतुदीच्या कठोर भाषेमुळे या कायद्यातील काही गुन्ह्यातील आरोपी असलेला फारच कमी व्यक्तींना जामीन मिळू शकला आता एकीकडे जामीन नाकारणें आणि दुसरीकडे खटल्याची सुनावणी लांबनिवर टाकने हे स्पष्टपणे अन्यायकारक आणि अवाजवी आणि कायद्याच्या कलम ३६(१) , संहितेच्या कलम ३०९ आणि अनुच्छेद १४, १९ आणि २१ च्या तत्त्वांच्या विरुद्ध आहे. वैधानिक तरतुदीला कायद्याच्या कलम ३७ मध्ये स्थान मिळण्यासाठी आम्ही जागरूक आहोत. ज्यात विहित अटींची पूर्तता या कायद्यांतर्गत गुन्ह्यात आरोपी असलेल्या व्यक्तीची सुटका होण्यापूर्वी करावी लागेल. खरं तर आम्ही न्यायनिर्णयाच्या आधीच्या

भागात या कलमाचा उल्लेख केला आहे. कर्तार सिंग विरुद्ध पंजाब राज्य (१९९४) ३ एससीसी ५६९ व १९९४ एससीसी (क्री.) ८९९ या घटनापीठाने टाडा कायद्याच्या कलम २० मध्ये तत्सम तरतुदींवर ठेवलेला अर्थही आम्ही लक्षात घेतला आहे. ही तरतूद असूनही आम्ही प्रामुख्याने अनुच्छेद २१ च्या मागणीनुसार वरीलप्रमाणे निर्देश दिले आहेत, कारण जलद सुनावणीच्या अधिकारासाठी काही प्रकरणांमध्ये फौजदारी खटला पूर्णपणे रद्द करण्याची आवश्यकता असू शकते, जसे या न्यायालयाच्या घटनापिठाने ए.आर.अंतुलेविरुद्ध आर.एस. नायक ,(१९९२) १ एससीसी २२५:१९९२ एससीसी (क्री.) ९३ मध्ये म्हटले आहे. जामिनावर सुटका जी जलद सुनावणीच्या अधिकारात अंतर्भूत मानली जाऊ शकते, काही प्रकरणांमध्ये कलम २१ ची मागणी असू शकते. खटला रद्द करणे आणि ज्या आरोपींच्या खटल्याना आधीच नमूद केलेल्या कारणास्तव वाजवी वेळेपेक्षा जास्त उशीर झाला आहे, त्यांची सुटका करणे ही टोकाची विनंती मान्य करण्यास आम्हाला स्वारस्य वाटत नसल्याने जलद सुनावणीची खात्री केल्याशिवाय वैयक्तिक स्वातंत्र्याचे उल्लंघन करणे देखील कलम २१ ने दिलेल्या अधिकाराशी सुसंगत नाही, असे आम्हाला वाटले आहे. अर्थात अशा प्रकरणांमध्ये काही प्रमाणात वैयक्तिक स्वातंत्र्याची गळचेपी टाळता येत नाही, परंतु जर गळचेपिचा कालावधी खटला प्रलंबित असणाऱ्या कालावधीपेक्षा अनावशकपणे लांबला तर कलम २१ ने आश्वासन

दिलेल्या निष्पक्षतेला धक्का बसेल. यामुळेच आम्हाला असे वाटले आहे की, आरोपींना तुरुंगवास भोगावा लागल्यानंतर जे जास्तीत जास्त शिक्षेच्या निम्मी आहे यापुढे वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित राहणे हे कलम २१ ने कल्पिलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन ठरेल, ज्याला कलम १४ ने दिलेल्या अधिकाराशी जोडले गेले पाहिजे ,ज्याद्वारे प्रक्रियात्मक बाबींमध्ये न्यायाची, निष्पक्षतेची आणि वाजवीपणाची हमी दिली जाते. मग उपाय काय? या कायद्यातील गुन्हे गंभीर आहेत आणि म्हणूनच आम्ही याचिकाकर्त्यांच्या विद्वान वकिलांच्या युक्तिवादाशी सहमत नाही की आम्ही खटले रद्द करावेत आणि ज्या आरोपींच्या खटल्यांना वाजवी वेळेपेक्षा जास्त उशीर होतो त्यांना मुक्त करावे. पर्यायाने, त्यांनी असे मत मांडले की, ज्या आरोपींच्या खटल्यांना वाजवी वेळेपेक्षा जास्त उशीर झाला आहे आणि त्यांना आणखी उशीर होण्याची शक्यता आहे , अशा आरोपींना अशा अटीवर जामिनावर सोडण्यात यावे जी न्यायालयाद्वारा त्यांच्यावर लादणे योग्य वाटेल. ही सूचना आमच्यासाठी कौतुकास्पद आहे. त्यानंतर अतिरिक्त विशेष न्यायालय स्थापन करण्यात आली आहे असे महाराष्ट्र राज्याच्या विद्वान वकिलांनी आम्हाला सांगितले होते, परंतु राज्यात अशा खटल्यांची संख्या मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याने अशा प्रकरणांच्या प्रचंड ढिगाऱ्याला याचा फारसा फरक पडण्याची शक्यता नाही, अशी आम्हाला भीती वाटते म्हणून आम्ही खालील प्रमाणे निदेश देतो.

(१) जर न्यायचौकशीअधीन कैद्यावर कायद्यानुसार पाच वर्ष किंवा त्यापेक्षा कमी करावास आणि दंडाची शिक्षा असलेल्या गुन्ह्याचा आरोप असेल, तर अशा न्यायचौकशीअधीन कैद्याला जामीनवर सोडण्यात यावे, जर तो ज्या गुन्हासाठी तरतूद केलेल्या शिक्षेच्या निम्म्यापेक्षा कमी कालावधीसाठी तुरुंगात असेल आणि जिथे त्याच्यावर एकापेक्षा जास्त गुन्हे दाखल असतील, सर्वाधिक शिक्षा देणारा गुन्हा ज्या गुन्ह्यात त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, त्या गुन्ह्यात जास्तीत जास्त दंडाची तरतूद असेल, तर जामिनाची रक्कम त्या रकमेच्या ५० टक्के असेल आणि तेवढ्याच रकमेसाठी दोन जामीनदार असतील. जास्तीत जास्त दंड निश्चित न केल्यास, संबंधित विशेष न्यायाधीशांची खात्री होईल इतक्या रकमेसाठी दोन जामीनदार असतील.

(२) जेथे न्यायचौकशीअधीन आरोपीवर कायद्यानुसार पाच वर्षांपेक्षा जास्त शिक्षा आणि दंडाची तरतूद असलेल्या गुन्ह्याचा आरोप असेल तर अशा न्यायचौकशीअधीन कैद्याची वरील (१) मध्ये नमूद केलेल्या मुदतीवर जामिनावर सुटका केली जाईल, परंतु त्याची जामिनाची रक्कम कोणत्याही परिस्थितीत रुपये ५०,०००/- पेक्षा कमी नसेल आणि तेवढ्याच रकमेसाठी दोन जामीनदार असतील.

(३) जेथे न्यायचौकशीअधीन आरोपीवर कमीत कमी दहा वर्ष तुरुंगवास आणि किमान एक लाख रुपये दंडाची तरतूद असलेल्या गुन्ह्याचा आरोप असेल, तर असा न्यायचौकशीअधीन आरोपी पाच वर्षांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधी करिता तुरुंगात राहिल्यास, त्याने एक लाख रुपयांच्या रकमेसह तेवढ्याच रकमेच्या दोन जामीनदार दिल्यास, त्याची सुटका केली जाईल.

(४) कायद्याच्या कलम ३१ आणि ३१ अ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या न्यायचौकशीअधीन आरोपीवर गुन्हा दाखल असेल तर अशा न्यायचौकशीधीन आरोपीची या आदेशाच्या आधारावर सुटका होऊ शकणार नाही.

वरील खंड (१), (२) आणि (३) मधील निदेश सामान्य अटींच्या अधीन असतील.

(१) जामीनावर सुटका होण्यास पात्र असलेल्या न्यायचौकशीअधीन आरोपींनी आपला पासपोर्ट संबंधित विशेष न्यायालयाच्या विद्वान न्यायाधीशांकडे सादर करावा आणि जर त्यांच्याकडे आणि पासपोर्ट नसेल तर तो त्या संदर्भातील प्रतिज्ञापत्र विद्वान विशेष न्यायाधीशांनी विहित केलेल्या नमुन्यात सादर करेल. नंतरच्या प्रकरणात, विद्वान विशेष न्यायाधीश जर त्यांना विधानाच्या अचूकतेबद्दल शंका घेण्याची कारण

असेल तर, निवेदनाची पडताळणी करण्यासाठी संबंधित पासपोर्ट अधिकाऱ्याला पत्र लिहितील आणि पासपोर्ट अधिकारी त्याच्या अभिलेखाची पडताळणी करतील आणि तीन आठवड्यांच्या आत उत्तर पाठवतील. जर त्याने दिलेल्या मुदतीत उत्तर दिले नाही तर, विद्वान विशेष न्यायाधीशाना न्यायचौकशीअधीन आरोपीच्या जबाबावर कारवाई करण्याचा अधिकार असेल.

(२) न्यायचौकशीअधीन आरोपिने खंड (१)अंतर्गत समाविष्ट असलेल्यांच्या बाबतीत महिन्यातून किमान एकदा खंड (२) अंतर्गत समाविष्ट असलेल्यांच्या बाबतीत पंधरवड्यात एकदा आणि खंड (३) मध्ये समाविष्ट असतील त्यांच्या बाबतीत आठवड्यातून एकदा खटला चालवणाऱ्या पोलीस ठाण्यात जामिनावर सुटका झाल्यावर जोपर्यंत संबंधित विशेष न्यायाधीशांकडून अनुपस्थितीची रजा आगाऊ मिळत नाही, तोपर्यंत स्वतःला हजर करावे.

(३) कलम (२) आणि (३) मधून निदेशांचा लाभ अशा आरोपींना मिळणार नाही जे विद्वान विश्वेश न्यायाधीशांच्या मते लेखी स्वरुपात नमूद केलेल्या कारणांसाठी पुराव्यांशी छेडछाड करण्याची किंवा सरकारी

साक्षीदारांवर प्रभाव पडण्याची शक्यता आहे.

(४) न्यायचौकशीअधीन आरोपी जे परदेशी व्यक्ती आहेत, त्यांच्या बाबतीत विशेष न्यायाधीश त्यांचे पासपोर्ट अवरुद्ध करण्याव्यतिरिक्त परदेशी -आरोपी ज्या देशाचा आहे त्या देशाचा दूतावास /उच्चायुक्तांकडून आश्वासन प्रमाणपत्राचा आग्रह धरतील की संबंधित आरोपी देश सोडणार नाही आणि आवश्यकतेनुसार विशेष न्यायालयासमोर हजर होईल

(५) न्यायचौकशीअधीन आरोपी विद्वान विशेष न्यायाधीशांच्या परवानगीशिवाय, विशेष न्यायालयाची स्थापना ज्या क्षेत्राशी निगडित आहे, त्या क्षेत्राबाहेर जाऊ शकणार नाही.

(६) न्यायचौकशीअधीन आरोपीला जामिनाच्या रकमेइतकी रोख रक्कम त्यानें जमा करून जामीन दिला जाऊ शकतो.

(७) वरीलपैकी कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास किंवा जामीन रद्द करण्याचा खटला अन्यथा तयार झाल्यास विशेष न्यायाधीशांना जामीन रद्द करण्याचे स्वतंत्र असेल, आणि

(८) या आदेशानुसार न्यायचौकशीअधीन आरोपीची सुटका झाल्यानंतर,

ज्या न्यायचौकशीअधीन आरोपींची सुटका करण्यात आलेली नाही आणि ते तुरुंगात आहेत, त्यांच्या प्रकरणांना प्राधान्य दिले जाईल आणि विशेष न्यायालय संहितेच्या कलम ३०९ मधील तरतुदीनुसार त्यांच्यावर कार्यवाही करेल.

१६. आम्ही असे सांगू शकतो की, ज्या प्रकरणांमध्ये आरोपी व्यक्ती तुरुंगात आहेत आणि त्यांच्या खटल्यांना विलंब होत आहे, अशा प्रकरणांमध्ये एका वेळेचे हे निर्देश म्हणून वरील अटी उपयोगात आणण्याचा उद्देश आहे. अधिनियमाच्या कलम ३७ अन्वये जामीन देण्याच्या विशेष न्यायालयाच्या अधिकारात हस्तक्षेप करण्याचा त्यांचा हेतू नाही. प्रलंबित खटले निकाली काढण्यात अमर्याद दिरंगाई होत असल्याच्या तक्रारी लक्षात घेऊन विशेष न्यायालय त्या अधिकाराचा वापर करण्यास मोकळे असेल. विशेष न्यायालयाने निर्देश दिले असले तरी आरोपी त्याचा गैरवापर करत असल्याचे आढळल्यास आणि जामीन रद्द करण्याचे कारण उपलब्ध असल्यास जामीन रद्द करण्याचे कारण उपलब्ध असल्यास, जामीन रद्द करण्यास मोकळे असेल, शेवटी या आदेशाच्या अंमलबजावणीत काही अडचण असल्यास अर्ज करण्याचे स्वातंत्र्य आम्ही देतो.

(६५) आम्ही संहितेच्या कलम १७० च्या अर्थउकलावर असलेल्या एका पैलूवर

स्पष्टीकरण देऊ शकतो. आम्ही इतर गुन्ह्यासाठी केलेली आमची चर्चा या प्रकरणांनाही लागू होईल. ही भूमिका स्पष्ट करण्यासाठी आपण असे म्हणू शकतो की, जर एखादा आरोपी आधीच तुरुंगात असेल तर तो सुरूच राहील आणि म्हणूनच विशेष कायद्यातील तरतुदी त्यानंतर लागू होतील असे म्हणणे व्यर्थ आहे. ज्या प्रकरणात आरोपीला सरकारी पक्षाकडून जाणीवपूर्वक अटक केली जात नाही किंवा अटक करून जामीनावर वाढवले जात नाही, अशा प्रकरणात न्यायालयाच्या सांगण्यावरून आणखी अटकेची गरज नसते. तसेच आम्ही हे सुद्धा अधिक सांगतो की समान प्रकरण अस्तित्वात आहे किंवा संहितेच्या कलम १६७(२) सारख्या तरतुदी विशेष अधिनियमाच्या खालील तरतुदींच्या सुद्धा आरोपीला अनिवार्य जमिनीच्या अधिकारासारखा परिणाम होईल येथेही न्यायालयाला संहितेच्या कलम ४४० अन्वये समाधान मानावे लागणार आहे.

<u>आर्थिक गुन्हे (श्रेणी ड)</u>

६६. आता आपल्यासाठी आर्थिक गुन्ह्याची चर्चा करणे बाकी आहे. त्याला स्वतःचा वर्ग मानायचं की नाही, हा विचार करण्याजोगा प्रश्न आहे. पी. चिदंबरम् विरुद्ध अंमलबजावणी संचलनालय, (२०२०)१३ एससीसी ७९१ या खटल्यात न्यायालयाने या क्षेत्रातील पूर्वीच्या निर्णयांची दखल घेऊन हा मुद्दा आधीच हाताळला आहे. शिक्षेच्या कालावधीसह गुन्ह्यांचे गांभीर्य, विशेष कायद्याचा उद्देश आणि उपस्थित परिस्थिती हे लक्षात घेण्यासारखे काही घटक आहेत. शेवटी आर्थिक गुन्ह्यांचे असे वर्गीकरण केले जाऊ शकत नाही, कारण त्यात विविध क्रियाकलापांचा समावेश असू शकतो आणि एका

प्रकरणापासून दुसऱ्या प्रकरणात भिन्न असू शकतो. त्यामुळे सर्व गुन्ह्यांचे एकाच गटात वर्गीकरण करून त्या आधारे जामीन नाकारने न्यायालयाच्या दृष्टीने योग्य नाही. खालील निर्णयांमध्ये नमूद केल्याप्रमाणे कायदा या क्षेत्राचे नियमन करेल हे सांगणे पुरेसे आहे :-

<u>पूर्वीदाहरण</u>

*** पी चिदंबरम वि. अंमलबजावणी संचलनालय (२०२०) १३ एसीसी ७९१ :**

२३. अशा प्रकारे, या न्यायालयाच्या घटनापीठाने दिलेल्या निर्णयांसह दोन्ही बाजूने उद्धृत केलेल्या निकालांचे एकत्रित अवलोकन केल्यावर असा अनुमान काढता येईल की, जामीनाच्या संबंधित मूळ न्यायतत्त्वशास्त्र समान आहे कारण जामीन मंजूर करणे हा नियम आहे आणि नकार हा अपवाद आहे. जेणेकरून आरोपीला निष्पक्ष, सुनावणीची संधी मिळेल याची खात्री होईल. तथापि याचा विचार करताना गुन्ह्यांचे गांभीर्य ही एक बाजू आहे जी न्यायालयाने लक्षात घेणे आवश्यक आहे. या उद्देशाची गांभीर्य प्रत्येक प्रकरणात निर्माण होणाऱ्या वस्तुस्थिती आणि परिस्थितीवरून गोळा करावे लागेल. आर्थिक गैरव्यवहाराच्या बाबतीत समाजावर होणारे परिणाम लक्षात घेऊन आर्थिक गुन्हेही गंभीर गुन्ह्याच्या श्रेणीत येतील आणि अशा परिस्थितीत अशा प्रकरणांमध्ये जामिनाच्या अर्जावर विचार करताना आरोपीवर करण्यात आलेला आरोपाच्या स्वरूपाबाबत न्यायालयाला संवेदनशील राहून त्यास सामोरे जावे लागेल, असे मत व्यक्त

करण्यात आले आहे. आरोपीवर करण्यात आलेल्या आरोपाचे स्वरूप, गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेण्याची परिस्थिती म्हणजे आरोपीने केलेल्या होण्यासाठी निश्चित केलेली शिक्षेची मुदत गुन्ह्याच्या गांभीर्याच्या संदर्भात असा विचार हा एक घटक आहे जो सामान्यतः लागू केल्या जाणाऱ्या ट्रिपल चाचणी किंवा ट्रायपॉड चाचणी व्यतिरिक्त आहे. त्या संदर्भात असेही प्रमाणबद्ध स्वरूपात ठेवणे आहे की, आरोप गंभीर आर्थिक गुन्ह्यांसंबंधी जरी असले तरीही, हा नियम नाही की प्रत्येक प्रकरणात जामीन नाकारण्यात यावा, कारण की विधीविधान द्वारा संमत संबंधित कायद्यात असे निर्बंध निर्माण केला नाही किंवा जामीन न्यायतत्वशास्त्रातही तशी तरतूद नाही. त्यामुळे अधोरेखित निष्कर्ष असा आहे की, आरोपीचे स्वरूप आणि गांभीर्य काहीही असो, केवळ दुसऱ्या प्रकरणाचे पूर्वोदाहरण हा जामीन देण्यात किंवा नाकारण्यास आधार ठरणार नाही, जरी त्याचा तत्वतः परिणाम होऊ शकतो, पण शेवटी विचार हा प्रकरणनिहाय त्यात समाविष्ट तथ्यांवर आणि खटल्याला सामोरे जाण्यासाठी आरोपीची उपस्थिती निश्चित करण्यावर करावा लागेल.

*** संजय चंद्रा वि. सीबीआई २०१२ एसएससी ४०**

“३९. सध्याच्या प्रकरणातील वस्तुस्थितीचा विचार करता, दोन्ही न्यायालयाने दोन कारणांवरून जामीन मंजूर करण्याची विनंती फेटाळून लावली आहे. प्राथमिक कारण म्हणजे आरोपींवरील आरोप अत्यंत गंभीर आहे ज्यामध्ये सखोल

नियोजनाचा समावेश आहे, ज्यामध्ये सरकारी तिजोरीचे मोठे आर्थिक नुकसान होते. दुय्यम कारण म्हणजे आरोपी साक्षीदारांशी छेडछाड करण्याच्या शक्यतेचा. सध्याच्या प्रकरणात फसवणूक आणि अप्रामाणिकपणे मालमत्तेचे वितरण करण्यास प्रवृत्त करणे आणि बनावट दस्तावेज खरा म्हणून वापरून फसवणुकीच्या हेतूने फसवणूक केल्याचा आरोप आहे. या गुन्ह्यासाठी सात वर्षांपर्यंत वाढू शकणाऱ्या कारावासाची शिक्षा आहे. आरोपाचे स्वरूप महत्त्वाचे असू शकते, यात शंका नाही, पण त्याचवेळी पक्षकार ज्या शिक्षेसाठी पात्र असतो त्यात दोषी ठरल्यास पक्षकराला जी शिक्षा होऊ शकते, तीही या मुद्द्यावर अवलंबून असते. त्यामुळे जामीन मंजूर करायचा की नाही हे ठरवताना आरोपाचे गांभीर्य आणि शिक्षेची तीव्रता या दोन्ही बाबी विचारात घ्यायला हव्यात.

४०. जामीन मंजूर करणे किंवा नाकारणे हे न्यायालयाच्या स्वेच्छानिर्णयावर आहे. देणे किंवा नाकारणे हे मोठ्या प्रमाणात हे प्रत्येक विशिष्ट प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थितीनुसार नियंत्रित केले जाते. पण त्याचवेळी केवळ आरोपी विरोधात समाजाच्या भावनांमुळे जामीन मिळण्याचा अधिकार नाकारता येत नाही. फौजदारी खटल्यातील जामीनाचे प्राथमिक उद्दिष्ट म्हणजे आरोपीला तुरुंगवासातून मुक्त करणे, न्यायचौकशी प्रलंबित असेपर्यंत त्याला ठेवण्याच्या ओझ्यापासून राज्याला मुक्त करणे, खटला प्रलंबित ठेवणे आणि त्याचवेळी

आरोपीला शिक्षा होण्यापूर्वी किंवा नंतर न्यायालयाच्या ताब्यात ठेवणे आणि जेव्हा जेव्हा त्याची उपस्थिती आवश्यक असेल तेव्हा तो न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात हजर राहील याची खात्री देणे.

४६. आरोपीवर मोठ्या प्रमाणात आर्थिक गुन्हे दाखल आहेत, याची आम्हाला जाणीव आहे. आरोप केलेले गुन्हे सिद्ध झाल्यास देशाची अर्थव्यवस्था धोक्यात येऊ शकते, याचीही आम्हाला जाणीव आहे. त्याचवेळी तपास यंत्रणेने आधीच तपास पूर्ण केला आहे आणि सीबीआय, नवी दिल्लीच्या विशेष न्यायाधीशांसमोर आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे, ही गोष्ट आपण दृष्टीआड करू शकत नाही. त्यामुळे पुढील तपासासाठी त्यांची कोठडीत उपस्थिती आवश्यक नाही. सीबीआयने व्यक्त केलेली भीती दूर करण्यासाठी याचिकाकर्त्यांना कठोर अटींवर खटला प्रलंबित असेपर्यंत जामीन मंजूर करण्याचा अधिकार आहे, असे आमचे मत आहे.

<u>न्यायालयाची भूमिका</u>

६७. भारतात फौजदारी खटल्यांमध्ये शिक्षा होण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. जामीन अर्जावर नकारात्मक अर्थाने निर्णय घेताना हा घटक न्यायालयाच्या मनावर भार टाकतो, असे आपल्याला दिसते. न्यायालयांना असे वाटते की, शिक्षा दुर्मिळ होण्याच्या जवळ

जाण्याची शक्यता, जामीन अर्ज कायदेशीर तत्वांच्या विरोधात काटेकोरपणे निर्णय घ्यावा लागेल. दंडात्मक स्वरूपाच्या जामीन अर्जाचा विचार आपण खटल्याच्या माध्यमातून संभाव्य निर्णयाशी मिसळू शकत नाही. याउलट कोठडीत राहून अंतिम निर्दोष मुक्तता करणे, हा घोर अन्याय ठरेल.

६८. सर्वसाधारणपणे फौजदारी न्यायालय आणि विशेषतः न्यायचौकशी न्यायालय हे स्वातंत्र्याचे संरक्षण देवदूत आहेत नाही ते अंतर्भूत असलेल्या स्वातंत्र्याचे जतन, संरक्षण आणि अमलबजावणी फौजदारी न्यायालयाने केली पाहिजे. फौजदारी न्यायालयाकडून जाणीवपूर्वक अपयश आल्यास ते स्वातंत्र्याचा आव्हान ठरेल. घटनात्मक मूल्ये आणि लोकाचाराचे रक्षण करण्यासाठी आवेशाचे रक्षण करणे आणि सातत्यपूर्ण दृष्टी ठेवणे, हे फौजदारी न्यायालयाचे पवित्र कर्तव्य आहे. फौजदारी न्यायालयाने महापूरोहिताप्रमाणे वागून त्यांच्यावर जबाबदारी सोपवून घटनात्मक जोर कायम ठेवला पाहिजे. न्यायालयाने **अर्णब मनोरंजन गोस्वामी वि. महाराष्ट्र राज्य (२०२१) २ एससीसी ४२७** मध्ये असे निरीक्षण केले आहे की,

> ६७. मानवी स्वातंत्र्य हे एक मौल्यवान घटनात्मक मूल्य आहे, जे निःसंशयपणे विधिमंडळाने वैधरित्या लागू केलेल्या नियमनाच्या अधीन आहे. त्यामुळे नागरिक फौजदारी कायदा आणि प्रक्रियेच्या आदेशाच्या अधीन असतो. कलम ४८२ फौ. प्र. सं. च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा कोणत्याही न्यायालयाच्या प्रक्रियेचा गैरवापर रोखण्यासाठी किंवा अन्यथा न्यायाचे उद्दिष्ट

सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक ते आदेश देण्याचा उच्च न्यायालयाचा अंगभूत अधिकार मान्य करतो. या न्यायालयाच्या निर्णयानुसार कलम ४८२ अन्वये त्यांना देण्यात आलेल्या अधिकार क्षेत्राचा वापर करताना, उच्च उच्च न्यायालयांनी सावधगिरीने काम करणे आवश्यक आहे उच्च न्यायालयाने संयमितरित्या या अधिकाराचा वापर केला पाहिजे, यावर भर देताना आरोपींनी युक्ती आणि डाव पेचांचा आधार घेऊन फौजदारी कायद्यांच्या योग्य अंमलबजावणीत अडथळा आणू नये, या मूलभूत तत्वावर या न्यायालयाचे निर्णय आधारलेले आहेत. उच्च न्यायालयाच्या अंगभूत अधिकाराचा सावधगिरीपणे वापर करण्याची खात्री करून गुन्ह्यांचा योग्य तपास करण्याची खात्री देऊन जनहिताचे रक्षण केले जाते. ते खरोखरच कक्षेचे एक आणि एक महत्त्वपूर्ण टोक आहे. या कक्षेचे दुसरे टोकही तितकेच महत्त्वाचे आहे. प्रक्रियेचा दुरुपयोग रोखण्यासाठी किंवा न्याय सुरक्षित ठेवण्यासाठी उच्च न्यायालयास असलेल्या अंगभूत शक्तीस कलम ४८२ द्वारे दिलेली मान्यता ही स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी एक बहुमूल्य संरक्षक उपाययोजना आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता १८९८ विधिमंडळाने लागू केली होती, जी घटनात्मक अधिकार आणि मर्यादेच्या अधीन नव्हती तरीही तिने कलम ५६१ अ मधील अंगभूत अधिकाराना मान्यता दिली. स्वातंत्र्यानंतर संसदेने उच्च न्यायालयाच्या अंगभूत अधिकाराला दिलेली मान्यता चे (सीआरपीसी कलम ४८२, १९७३) स्वातंत्र्याची घटनात्मक मूल्ये जतन करण्यासाठी मदत मानली

पाहिजे. स्वातंत्र्याची रिट राज्यघटनेच्या चौकटीतून चालते. गून्ह्याचा निष्पक्ष तपास सुनिश्चित करण्याची गरज ही निःसंशयपणे महत्त्वाची आहे, कारण त्यामुळे एकीकडे पीडितेच्या अधिकारांचे रक्षण होते आणि अधिक मूलभूत पातळीवर गुन्ह्याचा तपास कायद्यानुसार केला जाईल आणि हाताळला जाईल याची खात्री करण्यासाठी सामाजिक हित. दुसरीकडे फौजदारी कायद्याचा गैरवापर ही बाब अशी आहे की ज्या बाबत देशातील उच्च न्यायालय आणि कनिष्ठ न्यायालये सक्रिय असणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरनात एप्रिल २०२० पासून घडत असलेल्या घटनांच्या मालिकेचा एक भाग म्हणून आपल्याला लक्ष्य केले जात आहे. या याचिकाकर्त्याने उपस्थित केलेल्या विशिष्ट कारणाची उच्च न्यायालयाला जाणीव झाली नसती अपील करताना विशिष्ट प्रकरण असे आहे की, त्याच्या दूरचित्रवाणी वाहिनीवरील त्याची मते प्राधिकरणाच्या दृष्टीने असमाधानकारक आणि अयोग्य आहेत आणि म्हणून त्याला लक्ष केले गेले आहे. जेव्हा कार्यवाही सूचीबद्ध होते तेव्हा अपीलकर्त्याने आणि एफआयआर रद्द करण्यासाठी प्रकरण सिद्ध केले आहे की नाही यावर उच्च न्यायालय आपले अंतिम मत नोंदवेल, परंतु आमचे स्पष्ट मत आहे की एफआयआर चे प्रथमदर्शनी मूल्यमापन करण्यात अपयशी ठरल्याने उच्च न्यायालयाने आपले घटनात्मक कर्तव्य आणि स्वातंत्र्याचे रक्षक म्हणून कार्य केले नाही. फौजदारी कायद्याच्या योग्य अंमलबजावणीत अडथळा येणार नाही, याची काळजी घेण्यासाठी सार्वजनिक हिताचे रक्षण

<u>करण्याच्या गरजेबाबत न्यायालयांनी सक्रिय राहिले पाहिजे. गुन्ह्याचा निष्पक्ष तपास हा त्याला सहाय्यकारी आहे. त्याचप्रमाणे फौजदारी कायदा नागरिकांच्या निवडक छळवणुकीचे हत्यार बनणार नाही, याची काळजी घेणे हे जिल्हा न्यायपालिका, न्यायालये आणि सर्वोच्च न्यायालय या सर्व न्यायालयाचे कर्तव्य आहे. एकीकडे फौजदारी कायद्याची योग्य अंमलबजावणी होण्याची आवश्यकता आणि दुसरीकडे कायदा हा लक्षित छळवणुकीचा डावपेच बनू नये, याची काळजी घेण्याची गरज या दोन्ही टोकांसाठी न्यायालयाने सक्रिय असणे आवश्यक आहे. मानवीयुगातील स्वातंत्र जितके सूक्ष्म असू शकते तितकेच सूक्ष्म आहे. आपल्या नागरिकांच्या सतर्कतेने, प्रसार माध्यमाच्या आवाजाने आणि न्यायालयाच्या धुळीने माखलेल्या मार्गात कायद्याचे राज्य (आणि कायद्याने नव्हे) जिवंत राहिल्याने स्वतंत्र टिकून राहते. तरीही अनेकदा यापैकी एखाद्या घटका अभावी स्वातंत्र्याचे नुकसान होते.</u>

<u>६९.</u> आम्ही युनायटेड किंगडम आणि अमेरिकेच्या विविध राज्यांमध्ये प्रचलित जामीन अधिनियमांच्या स्वरूपात विशेष अधिनियमांच्या अस्तित्वाची नोंदणी इच्छितो. या कायद्यांमध्ये तपास यंत्रणां आणि न्यायालय या दोघांसाठी पुरेशी मार्गदर्शक तत्वे विहित करण्यात आली आहेत. आता आपण १९७६ च्या कलम जामीन कायद्याच्या कलम ४(१) ची नोंद घेऊ.

युनायटेड किंग्डम

आरोपी व्यक्ती आणि इतरांना जामीनाचा सामान्य अधिकार.

४. - (१) ज्या व्यक्तीला हे कलम लागू होईल त्याला या कायद्याच्या अनुसूची १ मधील तरतूद अपवाद वगळता जामीन मंजूर केला जाईल.

(७०) उपरोक्त तरतुदी व्यतिरिक्त कायद्यात कायद्याच्या तत्त्वांचा विचार केला गेला आहे ज्यावर आम्ही निर्दोषपणाने जामीन मंजूर करणे ही हक्काची बाब असल्याचे गृहीत धरले आहे.

(७१) न्यायालयाच्या निर्णयांमध्ये एकरूपता आणि निश्चितता हा न्याययोजनेचा पाया आहे. एकाच गुन्ह्यातील आरोपींना एकाच न्यायालयाकडून किंवा समान किंवा वेगवेगळ्या न्यायालयाद्वारे कधीही वेगळी वागणूक दिली जाणार नाही. न्यायालयीन असूनही स्वेच्छानिर्णयाचा वापर करून अशी कृती करणे हे भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ आणि १५ चा गंभीर अवमान ठरेल.

७२. युनायटेड किंग्डमचा जामीन कायदा विविध घटकांचा विचार करतो. साध्या पद्धतीचा अवलंब करून जामीनांबाबत व्यापक कायदा करण्याचा हा प्रयत्न आहे. हा अधिनियम कारागृहांची न्यायचौकशी अधीन कैद्यांनी अत्यंत दाटीनी भरलेली तुरुंग, वॉरंट जरी करण्याची प्रकरणे, दोषी ठरण्यापूर्वी आणि नंतर जामीन मंजूर करणे, तपास यंत्रणा आणि न्यायालयाकडून अधिकाराचा वापर करणे, जामीन अटींचे उल्लंघन करणे,

गृहीतकाच्या निर्विवाद तत्वावरील जामीनदार आणि बंधपत्राची अंमलबजावणी आणि जामीन मिळण्याचा अधिकार या सर्व बाबी विचारात घेतो. गुन्ह्याचे स्वरूप आणि सलगता यासह विविध आकस्मिकता आणि घटकांशी निगडित अनुसूची १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अपवाद तयार केलेले आहेत. त्यामध्ये विशेष कायद्यांचाही समावेश आहे आपल्या देशातही अशाच प्रकारच्या कायद्याची तातडीची गरज आहे, असे आम्हाला वाटते. कायदा जो विनिर्दिष्टपणे जामीन मंजूर करण्यासाठी युनायटेड किंगडम सारख्या इतर विविध देशात बनविलेला आहे, तो आणण्यासाठी भारत सरकारने विचार करावा, याखेरीज आम्ही केलेल्या निरीक्षणाकडे काही बोलू इच्छित नाही. आज अस्तित्वात असलेली संहिता त्याच्या बदलांसह स्वातंत्र्यपूर्वी पासून चालत आलेली आहे, या कारणास्तव देखील आम्हाला अशी आशा आणि विश्वास आहे की, भारत सरकार केलेल्या सूचनांकडे योग्य प्रकारे लक्ष देईल.

सारांश / निष्कर्ष

७३. शेवटी आम्ही काही निर्देश जारी करू इच्छितो. हे निर्देश तपास यंत्रणासाठी आणि न्यायालयांसाठीही बनविलेले आहेत. त्यानुसार आम्ही खालील निर्देश जारी करणे योग्य मानतो, जे राज्य दुरुस्तीच्या अधीन असू शकतात.

(क) भारत सरकार जमीन कायद्याच्या स्वरूपात स्वतंत्र कायदा आणण्याचा विचार करू शकते, जेणेकरून जामीन मंजूर करणे सुव्यवस्थित होईल.

(ख) संहितेच्या कलम ४१ आणि ४१ अ चे आदेश आणि अर्नेश कुमार (सुप्रा) प्रकरणात या न्यायालयाने जारी केलेल्या निर्देशांचे पालन करण्यासाठीं तपास यंत्रणा आणि त्यांचे अधिकारी यांचे कर्तव्यबद्ध आहेत. त्यांच्याकडून होणारा कोणताही कर्तव्यचुतीपणा न्यायालयाने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिला पाहिजे आणि त्यानंतर योग्य ती कारवाई केली पाहिजे.

(ग) संहितेच्या कलम ४१ आणि ४१ अ च्या पालनावर न्यायालयांना स्वतःचे समाधान करावे लागेल. कोणतेही पालन न केल्यास आरोपी जामीन मंजूर होण्यास पात्र असेल.

(घ) २०१७ ची रिट याचिका (सी) क्रमांक ७६०८ मधील दिल्ली उच्च न्यायालयाच्या दिनांक ०७.०२. २०१८ च्या आदेशाची आणि दिल्ली पोलिसांनी जारी केलेल्या स्थायी आदेशाची म्हणजेच २०२० चा स्थायी आदेश क्रमांक १०९ ची दखल घेत संहितेच्या कलम ४१ आणि ४१ अ अन्वये अनुसरण करण्यात येणाऱ्या प्रक्रियेसाठी संहितेच्या कलम ४१ अ च्या आदेशाचे पालन करण्यासाठी स्थायी आदेश उपलब्ध करून देण्याचे निर्देश सर्व राज्य सरकारी आणि केंद्रशासित प्रदेशांना देण्यात आली आहेत.

(ङ) संहितेच्या कलम ८८, १७०, २०४ आणि २०९ अन्वये अर्जावर विचार करताना जामीन अर्जाचा आग्रह धरण्याची गरज नाही.

(च) सिद्धार्थ (सूप्रा) प्रकरणी या न्यायालयाच्या न्यायनिर्णयात दिलेल्या आदेशाचे काटेकोरपणे पालन होणे आवश्यक आहे.

(छ) विशेष न्यायालयाच्या स्थापने संदर्भात या न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन राज्य व केंद्र सरकारला करावे लागणार आहे. उच्च न्यायालयाने राज्य सरकारशी सल्लामसलत करून विशेष न्यायालयांची गरज यासाठी प्रयत्न हाती घेतले पाहिजेत. विशेष न्यायालयातील पिठासन अधिकारी दर्जाची पदे शिघ्रतेने भरावी लागतील.

(ज) जामिनाच्या अटींचे पालन करण्यास सक्षम नसलेल्या न्यायचौकशीअधीन कैद्याचा शोध घेण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश उच्च न्यायालयांना देण्यात येत आहेत. असे केल्यावर संहितेचे कलम ४४०च्या आधारे सुटका सुलभ करण्यासाठी योग्य ती कारवाई करावी लागेल.

(झ) जामिनासाठी आग्रह धरताना संहितेच्या कलम ४४० चे आदेश लक्षात ठेवावे लागतील.

(ञ) या आधी या न्यायालयाने भीमा सिंग (सुप्रा) मध्ये दिलेल्या निर्देशाप्रमाणे आणि त्यानंतरच्या उचित आदेशाप्रमाणे संहितेच्या कलम ४३६ अ च्या आदेशाचे पालन करण्यासाठी जिल्हा न्यायसेवा स्तरावर आणि उच्च न्यायालयाने अशाच प्रकारे प्रयत्न केला पाहिजे.

(ट) जर तरतुदीनुसार अन्यथा बंधनकारक असेल तेव्हा हस्तक्षेप अर्जाचे अपवाद वगळता, जमिनीचा अर्ज दोन आठवड्याच्या कालावधीत निकाली काढण्यात आला पाहिजे. अटकपूर्व जामीनाचे अर्ज हस्तक्षेप अर्जाचा अपवाद वगळता सहा

आठवड्यांच्या आत निकाली काढणे अपेक्षित आहे.

(ठ) सर्व राज्य सरकारे, केंद्रशासित प्रदेश आणि उच्च न्यायालयाना चार महिन्याच्या कालावधीत प्रतिज्ञापत्र/ स्थिती अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

७४. रजिस्ट्रीला या न्यायनिर्णयाची प्रत भारत सरकार आणि सर्व राज्य सरकारे /केंद्रशासित प्रदेशांना पाठविण्याचा निर्देश देण्यात येत आहे.

७५. अशाप्रकारे २०२१ चा कि. अ. १८४९ उपरोक्त बाबींच्या अधीन निकाली काढण्यात येत आहे. २०२२ चा ह.अ. क्रमांक ५१३१५, हस्तक्षेपासाठी अर्ज मंजूर करण्यात येत आहे. २०२१ चा ह. अ. क्रमांक १६४७६१ आणि ह.अ. २०२१ चा १४८४२१, २०२१ चा. कि. अ. डायरी क्र २९१६४ (२०२१ चा. ह. अ. क्रं. १५४८६३), स्पष्टीकरणासाठी/ निदेशासाठी अर्ज देखील निकाली काढण्यात आले आहेत. आज पासून चार महिन्यांच्या कालावधीनंतर परिपूर्तीसाठी सूचिबद्ध करण्यात यावे.

....

न्या. संजय किशन कौल,

......,......................

न्या. एम.एम. सुंद्रेश

नवी दिल्ली

जुलै ११, २०२२

x-x-x-x

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x